ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम

---

योजनांची देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापन परिणामकारकरित्या करणे.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन निर्णय क्र. ग्रापापु-१०९५/सीआर-१०८२/९६-अ,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक: १ डिसेंबर, १९९५

**प्रस्तावना:**

राज्यामध्ये राबविण्यात येत असलेल्या पिण्याचे पाणी पुरवठा कार्यक्रमाचा आढावा घेऊन सदर कार्यक्रम हा आणखी परिणामकारकरित्या राबविण्यासाठी कोणत्या उपाययोजना करणे आवश्यक आहे, याचा आढावा घेण्यासाठी व त्याअनुषंगाने योग्य धोरण ठरविण्यासाठी शासनाने सदर प्रश्नावर श्वेतपत्रिका काढली होती. श्वेतपत्रिकेच्या अनुषंगाने एक विस्तृत प्रस्ताव तयार करुन तो मंत्री मंत्रीमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. सदर कार्यक्रमाची परिणामकारकरित्या अंमलबजावणी न होण्यामध्ये सर्वात महत्वाचे कारण म्हणजे मोठ्या प्रमाणावर खर्च करुन ज्या योजना तयार करण्यात आलेल्या आहेत त्यांची देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापन योग्य प्रकारे व वेळेवर न होणे हे आहे, असे निदर्शनास आले आहे व त्यामुळे या कार्यक्रमाचा लाभ जनतेस योग्य त्या प्रमाणात मिळत नाही, असे दिसून आले आहे. कार्यक्रमाची परिणामकारकता वाढविण्यासाठी योजनांच्या देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापनाकडे विशेष लक्ष देणे गरजेचे होते व त्या अनुषंगाने प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय:-**

प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे वस्तुस्थिती लक्षात घेता ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापन योग्य प्रकारे व परिणामकारकरित्या व्हावे यासाठी शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे:-

**(१) जिल्हास्तरीय "देखभाल व दुरुस्ती निधीत" राज्य शासनाकडून देण्यात येणाऱ्या अनुदानात वाढ:-**

जिल्ह्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल व दुरुस्ती योग्य प्रकारे व वेळीच होण्यासाठी हातभार लागावा म्हणून शासन आदेश क्र. ग्रापापु-१०८५/सीआर-७८०३/३१, दि. १७ नोव्हेंबर, १९८६ अन्वये प्रत्येक जिल्हास्तरावर देखभाल व दुरुस्ती निधी स्थापन करण्यात आला आहे. सदर निधीमध्ये राज्य शासनाकडून राज्य तरतुदीच्या ५% निधी दरवर्षी देण्यात येतो. राज्यातील योजनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली असून योजनांच्या देखभाल व दुरुस्तीवर स्थानिक स्वराज्य संस्थांना मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो व यासाठी जास्त प्रमाणात निधीची गरज भासते. जिल्ह्यातील पाणी पुरवठा योजनांची देखभाल व दुरुस्ती योग्य प्रकारे होण्यासाठी अधिक निधी जिल्हास्तरावर उपलब्ध व्हावा, याकरीता शासन असा निर्णय घेत आहे की, ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत राज्य स्तरावर करण्यात येत असलेल्या योजनांतर्गत तरतुदीच्या १०% निधी जिल्हास्तरीय "देखभाल व दुरुस्ती" निधीकडे दरवर्षी देण्यात यावा. सदर निर्णयाची अंमलबजावणी सन १९९६-९७ या आर्थिक वर्षापासून करण्यात यावी.

**(२) जिल्हास्तरीय देखभाल व दुरुस्ती निधीत जिल्हा परिषदेने जमा करावयाची रक्कम:-**

वर उल्लेखित जिल्हास्तरीय देखभाल व दुरुस्ती निधीमध्ये केंद्र शासन व राज्य शासनाकडून काही प्रमाणात निधी दिला जातो व जिल्हा परिषदांनी त्यांच्या एकूण उत्पन्नाच्या किमान २०% रक्कम सदर निधीत टाकणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. जिल्ह्यातील पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी जास्त प्रमाणात निधी उपलब्ध व्हावा याकरिता या संदर्भात शासन असा निर्णय घेत आहे की, सदर २०%

..२

रक्कम देखभाल व दुरुस्ती निधीत भरण्यासाठी जिल्हा परिषदेचे एकूण उत्पन्न काढताना एकूण उत्पन्नात पिण्याच्या पाण्यावरील पाणीपट्टी व त्या अनुषंगाने वसूल केलेल्या रक्कमेचा अंतर्भाव करु नये, पिण्याच्या पाण्यावरील पाणीपट्टी व त्याअनुषंगाने जमा होणारी रक्कम वगळून जो उर्वरित निधी असेल त्याच्या २०% रक्कम जिल्हास्तरीय देखभाल व दुरुस्ती निधीत जमा करावी, त्याचप्रमाणे पिण्याच्या पाण्यासंबंधातील पाणी पट्टी व त्या अनुषंगाने जमा होणारी संपूर्ण रक्कम व विंधण विहिरीच्या देखभाल व दुरुस्तीकरिता ग्रामपंचायतीकडून वसूल करण्यात येणारी वर्गणी ही संपूर्ण रक्कम जिल्हास्तरीय देखभाल व दुरुस्ती निधीत जमा करावी, या करीता महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील कलम १३१, पोट कलम १(अ)(ब), खाली काढण्यात आलेले आदेश क्रमांक ग्रापापु-१०८५/सीआर-७८०३/३१, दि. १७ नोव्हेंबर, १९८६ मध्ये आवश्यक सुधारणा करण्यात येईल,

**(३) योजनांची देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापन खाजगी यंत्रणा/कंत्राटदार यांचेकडून करुन घेण्यास मुभा :-**

ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजना पूर्ण झाल्यानंतर व यशस्वी चाचणी घेतल्यानंतर योजना एका गावांची असल्यास संबंधित ग्राम पंचायतीकडे व ती दोन वा त्यापेक्षा जास्त गावांची असल्यास, संबंधित जिल्हा परिषदेकडे पुढील देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापनासाठी सोपविली जाते व तशी कायद्यात तरतूदही करण्यात आलेली आहे, मात्र शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, अनेक स्थानिक स्वराज्य संस्था या योजनांची देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापन योग्य प्रकारे करीत नाहीत, या संदर्भात संबंधित स्थानिक संस्थांकडे योजना चालविण्यासाठी कुशल व अनुभवी कर्मचारी नसल्याचे कारण सांगण्यात येते, त्याचप्रमाणे स्थानिक जनतेकडून योग्य प्रमाणामध्ये पाणीपट्टी वसूल करुन त्यातून योजनेची देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापन करणे बऱ्याच स्थानिक संस्थांना शक्य नाही असेही दिसून आलेले आहे, सदर बाब लक्षात घेऊन स्थानिक संस्थेने संबंधित नळ पाणी पुरवठा योजनेची देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापन खाजगी यंत्रणा/कंत्राटदार यांचेकडून करुन घ्यावयाची झाल्यास तशी मुभा खालील अटींना अधीन राहून देण्यात येत आहे, -

अ) योजना खाजगी यंत्रणा किंवा कंत्राटदाराकडे सोपविण्यासाठी संबंधित स्थानिक संस्थेच्या प्रशासकीय प्रमुखाने त्याबाबतचे करारपत्र करावे,

ब) करारपत्रात कोणत्या बाबींची जबाबदारी, किती कालावधीसाठी व कोणत्या अटींस अधीन राहून खाजगी संस्थेकडे वा कंत्राटदाराकडे देण्यात आलेली आहे याचा स्पष्ट उल्लेख असावा,

क) योजना चालविण्यासाठी लागणाऱ्या खर्चाचा कोणताही अतिरिक्त भार शासनावर पडणार नाही याची दक्षता घेण्यात यावी,

**(४) योजनांच्या देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापनाची जबाबदारी माजी सैनिकांच्या संस्थांकडे सोपविणे, :-**

वरील निर्णय (३) मध्ये नमूद केलेली वस्तुस्थिती लक्षात घेऊन जर स्थानिकस्तरावर माजी सैनिकांच्या संस्था वा माजी सैनिक योजनेच्या देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापनाचे काम करण्यास तयार असतील तर, त्यांना, वरील अटींच्या अधीन राहून योजना देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापनेसाठी सोपविण्यासाठी प्राधान्य देण्यात यावे,

**(५) देखभाल, दुरुस्ती करीता स्वतंत्र अर्थसंकल्प तयार करणे :-**

योजनांच्या देखभाल दुरुस्ती करीता पंचायत राज संस्था त्यांच्या अर्थसंकल्पात ढोबळ मानाने रक्कम दाखवितात, मात्र देखभाल व दुरुस्ती करीता वेगळा अर्थसंकल्प सादर करीत नाहीत, पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापनासाठी पुरेसा निधी उपलब्ध व्हावा व याकडे लक्ष देता यावे यासाठी योजनांच्या देखभाल व दुरुस्ती करीता योजनानिहाय सविस्तर अर्थसंकल्प तयार करण्यात यावा,

..३

६. सदर शासन निर्णय नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.सीआर-८०६/व्यय-१५, दिनांक २७.११.१९९५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

दा.रा.जानु

(दा.रा.जानु)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.राज्यपालांचे सचिव,
मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव,
मा.मंत्री, राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिस्सारण मंडळ, एक्सप्रेस टॉवर, नरीमन पॉईंट मुंबई,
मुख्य अभियंता (ग्रामीण), महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिस्सारण मंडळ, श्रेयस चेंबर्स, ४था मजला, १७५ , एम.रोड, मुंबई (७० अतिरिक्त प्रतिसह) संबंधित अधीक्षक अभियंता/कार्यकारी अभियंता यांना पाठविण्यासाठी,
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, महाराष्ट्र शासन, पी.एम.टी. बिल्डींग, स्वार गेट, पुणे,
भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे सर्व उपसंचालक, (प्रत्येकी ६ अतिरिक्त प्रतिसह त्यांच्या क्षेत्रातील वरिष्ठ भूवैज्ञानिकांना पाठविण्यासाठी)
महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई
महालेखापाल, लेखा परीक्षा, महाराष्ट्र-१, मुंबई
महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२, नागपूर
महालेखापाल, लेखा परीक्षा, महाराष्ट्र-२, नागपूर
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा (२५ अतिरिक्त प्रतीसह त्यांच्या क्षेत्रातील संबंधितांना पाठविण्यासाठी)
नियोजन विभाग,
वित्त विभाग,
नगर विकास विभाग,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग (जलसंधारण)
पाटबंधारे विभाग,
महसूल व पुनर्वसन विभाग,
संचालक, पी.पी.एम.यु. तथा उप सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
विशेष कार्य अधिकारी (श्री.माने), ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
ग्राम विकास विभागातील कार्यासने ३२, ३८, ३९, ४०, ४०-अ, ४०-ब, ४१, ४१-अ, ४१-ब, ४२, ४२-अ व ४३
निवड नस्ती, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, का.क्र.३९-अ,

...

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम
ग्रामीण नळ योजनांसाठी दरडोई खर्चाची प्रमाणके.

महाराष्ट्र शासन,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
शासन निर्णय क्रमांक:ग्रापापु-१०९५/सीआर-२१२४/पा.पु.०७,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. दिनांक: १८ मे, १९९६.

वाचा :- [१] शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र. ग्रापापु-१०९२/सीआर-४४५/३९-अ, दिनांक ३ नोव्हेंबर, १९९२.

[२] शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र. ग्रापापु-१०९५/सीआर-२०७५/३९-अ, दिनांक १३ नोव्हेंबर, १९९५.

[३] शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक:डॉविका-१०८९/प्र.क्र.६६/योजना-१९, दिनांक २३ नोव्हेंबर, १९९०.

[४] शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक:डॉविका-१०९४/प्र.क्र.३६/का. १४५५, दिनांक २७ सप्टेंबर, १९९४.

प्रस्तावना:- अनुक्रमांक-१ येथे नमूद केलेल्या दिनांक ३ नोव्हेंबर, १९९२ च्या शासन निर्णयानुसार राज्यस्तरावरील तसेच स्थानिक स्तरावरील मंजूर करावयाच्या ग्रामीण नळपाणी पुरवठा योजनांच्या दरडोई खर्चाची प्रमाणके विहित करण्यात आली होती. त्यानंतर अ.क्र. २ येथे नमूद केलेल्या शासन निर्णयान्वये दररोज/दरडोई ४० लिटर याप्रमाणे करण्यात येणा-या पाणी पुरवठ्यात दररोज/दरडोई ५५ लिटर पर्यंत वाढ करण्यात आली आहे. तसेच दरम्यानच्या कालावधीत ग्रामीण नळ योजनांसाठी लागणारी साहित्य सामुग्री व मजुरीच्या दरात आलेली भाववाढ लक्षात घेता उपरोक्त [१]प्रमाणे ३ नोव्हेंबर, १९९२ मध्ये विहित केलेली दरडोई खर्चाची प्रमाणके सुधारित करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :- ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत माणशी/दिवशी ५५ लिटर या प्रमाणात ग्रामीण नळपाणी पुरवठा योजना आखण्यात व या योजनांमध्ये गावातील जास्तीत जास्त ३० टक्के पर्यंत घरांना खाजगी जोडण्या द्याव्यात. खाजगी नळ जोडणी धारकांना दररोज/दरडोई ७० लिटर प्रमाणे व उर्वरित ७० टक्के घरांना दररोज/दरडोई ४० लिटर प्रमाणे सार्वजनिक नळस्थांड्यांव्दारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात यावा, या शासनाच्या निर्णयानुसार दरडोई खर्चाची प्रमाणके या निर्णयाच्या दिनांकापासून खाली निर्देशिल्याप्रमाणे राहतील, असे आदेश शासन देत आहे :-

२. ही उपाययोजना आपल्या जिल्हयात ज्या ठिकाणी कार्यान्वित करणे शक्य आहे त्या ठिकाणी ती राबविण्याचे दृष्टीने त्याचे नियोजन तातडीने करावे.या योजनेसंबधीची माहिती दर्शविणारी टिप्पणी सोबत जोडली आहे. त्यानुसार योजनेची अंदाजपत्रके तयार करावीत. सध्या ही योजना रायगड, सातारा, औरंगाबाद, नाशिक, सिंधुदुर्ग, रत्नागिरी व जळगाव या जिल्हयांमध्ये राबविली जात आहे. या योजनेबाबतचा अधिक तपशील हवा असल्यास त्या जिल्हयाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद यांच्याकडून तो घेण्यात यावा.व कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(रु.न.देशमुख)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१.सर्व विभागीय आयुक्त.
२.सर्व जिल्हाधिकारी.
३.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.
४.जिल्हा पाणी पुरवठा तथा अधीक्षक अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सर्व.
५.पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व अधिकारी.

## अपारंपारिक पाणी योजना

### पावसाच्या पाण्याची साठवण

**१] प्रास्ताविक :-**

पाणी हे जीवन आहे. मानवी जीवनांत पाण्याला अतिशय महत्व आहे. सर्वांना विविध कारणासाठी पाण्याची जरुरी भासते. त्यापैकी पिण्यासाठी लागणारे पाणी हे सर्व गरजामध्ये प्रथम प्राधान्याची गरज आहे. पिण्यायोग्य पाण्याच्या मुख्य नैसर्गिक स्त्रोत म्हणजे पाऊस व भुगर्भातील साठे साठलेले पाणी पावसाचे पाणी नदी नाल्याव्दारे समुद्रात जाते व काही प्रमाणात जमिनीचे खाली भुगर्भात झिरपले जाते. दिवसेंदिवस शेतीसाठी औद्योगिक कारखान्यासाठी व ईतर कारणासाठी व पिण्यासाठी, पाण्याचा वापर वाढत चालल्याने, नैसर्गिक रित्या साठलले पाणी [भूपृष्ठावरील व भूपृष्ठाखालील] कमी पडू लागले आहे. धरण व इतर मार्गांनी पाणी साठवले जात आहे. परंतु वाढती गरज यामुळे भागू शकत नाही, म्हणून विविध उपाययोजनाव्दारे पाणी साठवून गरज भागविण्याचा प्रयत्न केला जात आहे.

ता. २९. १२. ९७ रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली "टँकरमुक्त महाराष्ट्र" बाबत आढावा बैठक घेण्यात आली व त्या बैठकीत असे सूचविण्यात आले की, राज्यातील प्रत्येक जिल्हयातील ज्या गावे/वाडयांचा प्रश्न पारंपारिक उपाययोजनेव्दारे सोडविणे शक्य होणार नाही, अशा गावांची/वाडयांची जिल्हानिहाय माहिती तयार करण्यात यावी व अशाच गावे/वाडयामध्ये कोणत्या उपाययोजनेव्दारे पिण्याचे पाण्याची समस्या सोडविता येईल, याबाबत शासनास कळविण्यात यावे. आवश्यकतेनुसार अपारंपारिक उपाययोजनापैकी छपरावर पाणी गोळा करण्याचे तंत्रज्ञानाचा देखील प्रयोग करावा.

**[२] अपारंपारिक उपाययोजना पावसाचे पाणी साठविणे :-**

ज्या गावांना/वाडयांना/वस्तींना जवळपास पाण्याचा स्त्रोत नाही, पाणी पुरवठा योजना करणे अशक्य प्राय/फार खर्चाचे आहे व दैनंदिन देखभालीस परवडण्यासारखे नाही. जवळपास नदी नाले नाहीत व भुगर्भातील पाण्याचे साठे नाहीत, अशा ठिकाणी करावयाच्या अपारंपारिक उपाययोजनेत पावसाचे पाण्याची जागेवरच साठवण [इन सिटू हार्वेस्टींग] करणेचे पध्दतीचा एक प्रकारे विचार करता येईल, डोंगराळ आणि अति पर्जन्यमान होत असलेल्या क्षेत्रात छपरावरील पन्हाळीव्दारे पाणी संचय करणे शक्य होईल. तसेच

...२/-

राजस्थान सारख्या वाळवंटी प्रदेशात जेथे भुजल उपलब्धी खुपच कमी असते अशा ठिकाणी पावसाचे पाणी साठवून ठेवण्याशिवाय पर्यायच नसतो. महाराष्टातील कांही भागात जेथे इतर कोणत्याही उपाययोजनेव्दारे पाणी पुरवठा करणे अशक्य आहे तेथे/तसेच आदिवासी दुर्गम भागात कोकण भागा-सारख्या डोंगराळ भागांत, या अपारंपारिक उपाययोजनेव्दारे पावसाचे पाणी साठवून, पिण्याचे पाण्यासाठी उन्हाळयात व इतर महिन्यामध्ये [पावसाळा सोडून] उपयोग करता येणे शक्य आहे. पावसाचे पाणी, भूमिगत पाण्याची टाकीत किंवा जमिनीवरील पाण्याचे टाकीत साठविता येईल.

२.१]छपरावरील पन्हाळीव्दारे पाणी संचय [रूफ वॉटर हार्वेसिंग] :-

ज्या विभागात पर्जन्यमान बऱ्या प्रमाणात असून काही कालावधीमध्ये टिकून असते, परंतु पुढील ७/८ महिने पाणी कमी पडते, व पाण्याची टंचाई भासते अशा ठिकाणी छपरावर पडणाऱ्या पावसाचे पाणी साठवून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविता येईल.

या पध्दतीत घरांची छपरे ही जस्ताची [जी आयशीट] पत्रे, अल्युमिनीयम, मातीची कौले, असबेस्टास पत्रे किंवा सिमेंट कॉंकीटची असतात, छपराच्या खालच्या निमुळत्या टोकाशी पाणी एकत्रित करण्याकरीता नळी बसविण्यात येऊन त्यास साधारण उतार जमिनीवरील साठवण टाकीत सोडलेल्या उभ्या नळीकडे दिला जातो. ही नळी जी.आय. पत्रा/बांबू/पीव्हीसी पाईप किंवा स्थानिक उपलब्ध सामुग्रीतून बनवली जाते. साठवण टाकीस जोडलेली उभी नळी साधारणत: १०० मि.मी. व्यासाची ठेवून त्याच्या शेवटच्या खालील टोकास २० मेश तारेची जाळी बसविण्यास येते. जेणे करून झाडाची वाकलेली पाने, तसेच इतर कचरा/अनावश्यक वस्तु अडविल्या जाऊन स्वच्छ पाणी साठवण टाकीत जमा करता येईल.

पर्जन्यमान नसलेल्या कालावधीत छपरावर जमा झालेली धूळ, पक्ष्यांनी टाकलेली विष्ठा वगैरे पहिल्या पावसामध्ये धूवून जाते, ती सरळ साठवण टाकीत जाऊ नये याकरीता अ] साठवण टाकीकडे येणारी उभी नळी छपरावरून स्वच्छ पाणी येईपर्यंत बाजूला ठेवली जाते किंवा पहिले पाणी वाहून जाण्यासाठी वेगळी तोटी बसविली जाते. ब] उभी नळी व साठवण टाकीच्या

दरम्यान पहिले अस्वच्छ पाणी साठविण्याची सोय केली जाते. साठवण टाकी जमिनीखाली किंवा जमिनीवर बांधता येईल, ती ठरत उतरत्या [illegible] त्याच्या बाजू जलभेदक आवरणाच्या असतात, जमिनीवरील टाकी सी. आय. पत्रा आर. सी. सी/प्लॅस्टिक किंवा फेरोसिमेंटची बनविलेली असते. जमिनीखाली साठवण टाकी असलेस पाणी काढण्यास हातपंपाची आवश्यकता असते. वरचेवर विरंजक चूण वापरून टाकीतील पाणी स्वच्छ व पिण्यास जंतुविरहीत योग्य ठेवता येते.

पुरेशी काळजी घेतली असता अ टाकीतील पाणी दीर्घकाळ [१ वर्षी] निर्जंतुक व स्वच्छ पिण्यायोग्य राहते. जमिनीवर टाकी असलेस, टाकीचा टप प्राणी पक्षी व वनस्पती यांच्या संपर्काशिवाय व स्वच्छ रहावा यासाठी टाकीच्या टपावर जाळी लावणे, टाकीला कुंपण करणे योग्य होईल. टाकीच्या आतून शेवाळी प्रतिबंधक रंग देणे आवश्यक आहे. पाणी पिण्यासाठी वापरण्याआधी गाळून व क्लोरिनचे योग्य प्रमाणात थेंब घालावेत.

३] टाकीचे डिझाईन :-

एका घरातील व्यक्तीसाठी, पाणी टंचाईचे काळात पिण्यासाठी पाणी उपलब्ध करून देणेसाठी, टाकीचे आकरमान, कुटूंबातील व्यक्तीचे संख्येनुसार ठरविता येईल. त्याचप्रमाणे काही घरांचे समुहाकरीता [ ५ ते १०] जागा उपलब्ध असलेस, सामुहिक टाकी जमिनीवर करता येईल. वैयक्तिक घराचे टाकीला, घराचे छपरावरून येणारे पाणी गोळ करून, टाकीत घेणेचे असलेने कमी खर्चात होऊ शकेल सामुहिक टाकीला मात्र टाकीच्या छपराचा पृष्ठभाग त्याप्रमाणे डिझाईन करून उतरता, पाणी गोळा करणेचे दृष्टीने बनवावा लागेल.

३.१] अ] वैयक्तिक घरासाठी :- एका कुटूंबातील व्यक्ती, ५ धरून व माणशी प्रती, दिन पिण्यासाठी २ लिटर पाणी धरलेस टंचाईचा कालावधी ८ महिने - २४० दिवस होईल व पाण्याचा साठा ५ x ३ x २४० = ३६०० लिटर्स लागेल.

बाष्पीभवन १०% धरून ३९६० लि. म्हणजे ४००० लिटर्स
४ क्यू. मीटर्स

८ महिने कालावधीपेक्षा ६ महिनेच पाणी वापर लागलेस माणशी प्रतिदिन ४ लिटरप्रमाणे पाणी मिळेल.

३.१.१.] फार्म्युला :-

क्यू = ए x आय x आर
क्यू = पाणी साठा क्यूबिक मिटर
ए = क्षेत्रफळ स्वेक्अर मीटर मध्ये
आय = सरासरी पाऊस मिटरमध्ये
आर = रन ऑफ फॅक्टर

= भूपृष्ठाचे रचनेप्रमाणे, ०.८ उतरत्या कौलाचे छपरासाठी [सरासरी वार्षिक ५०० मि.मी. पाऊस धरल्यास = $\frac{५००}{१०००}$ = ०५ मि.

४.०० क्यू.मि. = अे x ०.५ x ०.८

अे = $\frac{४.००}{०.४}$ = १० स्वे. मिटर.

छपराचे क्षेत्रफळ = १० स्वे. मि. कमीतकमी हवे.

= ३.३ x ३.३ लांबी रुंदीचे

यापुमाणे ३.३ x ३.३ मी क्षेत्रफळ असलेले जागेमधून लागणारा पाणी साठा गोळा होऊ शकेल.

पाण्याची टाकीचा आकार ४ क्यू. मिटर, उंची १.२ व्यास २.३० मि. ठेवल्यास आकरमान ४.१५० क्यू. मि. मिळेल म्हणजेच ४१५० लिटर्स पाणी साठविता येईल.

पाण्याची टाकी फेरोक्रीट/सिंटेक्स बसविता येईल.

३.२ [ब] सामुहिक टाकी :- ५ घराकरीता करावयाची [२५ माणसासाठी]

झालेस क्षेत्रफळ -क्यू लागणारा पाणी साठा = ए x आय x आर

क्यू = ५ x ५ x ३ x २४०

= १८००० लिटर्स म्हणून क्षमता २०,००० लि

बाष्पीभवन = १०% धरुन = २००००लिटर्स/म्हणजे २० क्यु. मि.

= २० = ए x ०.५ x ०.८

ए = ५० स्वे. मि.

क्षेत्रफळ ५० स्वे. मि. पाणीसाठी होणेस लागेल. टाकीचा वरचे क्षेत्रफळ ५० स्वे. मि.

... ५/-

होण्यासाठी टाकीचा व्यास ८ मि. लागेल. उंची १.२० मी. ठेवलेस यांनी सोबत नकाशा [ ४ ] मध्ये टाकीची रचना दाखविली आहे. टाकी फेरोक्रीटची करावी किंवा सिंटेक्सच्या ३ टाक्या ठेवण्यात.

४] अंदाजपत्रक :-

घरगुती एका कुटूंबास ४००० लिटर्सची टाकी फेरोसिमेंटची केलेस ६०००/-रु. अंदाजे खर्च येईल व पाईप्स वगैरे धरुन खर्च, ६,६००/- पर्यंत येईल टाकी लोखंडी किंवा आरसीसी केलेस सामुहिक टाकी सुमारे १८,६०० रु. येईल. ५ कुटूंबाकरीता, २५ माणसे धरलेस २०,००० लिटर्स पाणी साठयासाठी फेरोसिमेंट रु. ३०,०००/- येईल व आरसीसी सिमेंट कॉंक्रीट ६०,०००/- रु. येईल. टाकीच्या क्षमतेप्रमाणे किंमत बदलून जाईल.

शासकीय अनुदान वैयक्तिक किंवा सामुहिक योजनेकरीता [ ७५% मिळाल्यास योजना कार्यान्वीत होऊ शकेल.

५] घरगुती मालकासाठी मार्गदर्शन सूचना :-

१] छताच्या पृष्ठभाग व पाण्याची पन्हाळ यावर पक्षाची शीट, धुरळा माती, पालापाचोळा असता कामा नये. छप्पर व पन्हाळ स्वच्छ ठेवल्यास छपरावरुन वहात येणा-या पाण्याची प्रत व दर्जा टिकून राहतो.

२] पाणी वहात येणारे पन्हाळ व नाले वरचेवर साफ करुन, त्यात साठविलेले पालापाचोळा घाण काढून टाकावा.

३] टाकीतील पाणी ज्या तोटीतून बाहेर पडते त्या तोटीच्या तोंडावर एक पातळ जाळीदार फडके बांधा म्हणजे त्यातून डास आत जाणार नाहीत.

४] पाण्याची टाकी स्वच्छ ठेवा.

५] पाणी काळजीपूर्वक पिण्यासाठीच वापरा वाया जाऊ देऊ नका.

६] पाण्याचा दर्जा तपासावा व त्यात सूक्ष्मजंतू वाढत नाहीत, याची खात्री करावी.

७] विरंजक/टी.सी.एल. पावडर पाणी पिण्यासाठी घेतांना/टाकीत टाकावे.

...६/-

६] वार्षिक देखभाल :-


१] उन्हाळयात कोरडा मोसम संपत येतो, तेव्हा साठवण टाकी रिकामी होत जाते, अशावेळी टाकीची साफसफाई व दुरुस्ती, देखभालीचे कामे करावीत. टाकीचा आतला भागही गाळ काढून स्वच्छ करावा.

२] पाणी टाकीपर्यंत आणणारे पाईप्स/छपरावरील पन्हाळी, पत्रे स्वच्छ करावेत.

३] टाकीच्या भिंतीतून गळती होत असेल तरताबडतोब दुरुस्ती, प्लॅस्टर करुन करावी.

४] पाण्याचे सुक्ष्मजंतू तपासणी करुन घ्यावी.


-------//------





छताच्या माध्यमातून
पर्जन्यजल एकत्रीकरण

आ.क्र.२७


छतावरील पर्जन्यजल साठवणीसाठी रचना





आ क्र २८




**पावसाचे पाणी साचवण्याच्या टाकीची रचना.**





१) छप्पर
२) पन्हाळ
३) पाणी वाहून नेणारा नळ
४) वाहक टाकी
५) वाळू गाळणी संयंत्र
६) साचवण टाकी


पर्जन्यजल पुनर्भरण प्रकल्प
संकल्पचित्र
छत
नाली
बंद नळ
पहिल्या पर्जन्य जलाची निकामी
फेरो सिमेंटची वरची झडप
फेरो सिमेंटची टाकी
१८००
१५००
४५
उपसा निकासी मार्ग
पाणी स्वच्छता नळ
बिटूमेन भराव
१००
विटांचा टेकू
सिमेंट बांधकामातील किंवा चुनखडीतील दगडी बांध
९००
६०० x ६००
जमीनी वरील भाग
उपस्या करता झडप
६०० x ६००
३० फेरो सिमेंटची वरील झडप
जमीन
३००
४५
१८००
१५००
१००
पी.सी.सी. १:४:८
५०
जमीनीखालील भाग
छतावर पडणाऱ्या पर्जन्यजल साठविण्यासाठी रचना

आ.क्र. २७

# अपारंपारिक पाणी योजना

## पावसाचे पाण्याची साठवणूक




पाण्याची टाकी

क्षमता – २०,००० लि.

उंची -- 1.20 मीटर

व्यास :- ८ मीटर

पाण्याची टाकी – फेरोसिमेंट

पावसाच्या पाण्याच्या साचवणूकी बाबतचे

# प्रवर्तकासाठी मार्गदर्शन साहित्य

# प्रवर्तकांसाठी मार्गदर्शन साहित्य

आपण शुद्ध पाणी हातपंप, नळ, आरोग्यपूर्ण विहीरी व पाऊस मिळवू शकतो. छपरावरुन वहात येणारे पागोळयातले पावसाचे पाणी टाक्यांमध्ये साठवून ठेवून वर्षभर वापरता येते. पिण्यासाठी पावसाचे पाणी पुढील प्रकारच्या परिस्थितीत वापरतात


१) जेव्हा भूगर्भातील पाणी, भूजल उपलब्ध नसते किंवा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसते किंवा पिण्यायोग्य नसते
२) भूगर्भाच्या स्थानिक स्थितीमुळे विहीर खोदणे, बोअरिंग करणे कठीण असते

**छतावरील पाण्याच्या साठवणूकीचे फायदे पुढील प्रमाणे आहेत.**

१) जेव्हां पाणी भरपूर प्रमाणात उपलब्ध असते तेव्हां पाण्याचा संचय होतो व टंचाईच्या काळात त्याचा उपयोग होतो
२) वस्तीच्या केंद्रभागी किंवा किंवा व्यक्तिगत कुटुंबाच्या घराजवळ साचवणूक झाल्यामुळे त्याचे पुनर्वाटप सोयीस्कर व सोपे जाते
३) अविकसित अशा परपरागत राचयनातून मिळणाऱ्या पाण्यापेक्षा या पाण्याची प्रत अधिक उच्च दर्जाची असते.

**पावसाच्या पाण्याचे चक्र** - जलचक्र

भूपृष्ठावरच्या पाण्याचे बाष्पीभवन होऊन त्याची वाफ बनते. ही वाफ हलकी असल्यामुळे वर वर जाते. वातावरणाच्या प्रती उंच स्तरात पोहोचल्यावर ही वाफ गोठते तिचे ढग बनतात. गोठलेली वाफ जड असल्याने पुन्हा पावसाच्या रूपाने ती भूपृष्ठावर पडते



## पालकांसाठी मार्गदर्शन तत्वे

छताचा पृष्ठभाग व पाण्याची पन्हाळ यावर पक्षांची शीट, धुरळा, माती, पालापाचोळा असता कामा नये. छप्पर व पन्हाळ स्वच्छ ठेवल्याने छप्परावरून वहात येणाऱ्या पाण्याची प्रत व दर्जा टिकून राहतो.

पाणी वहात येणारे पन्हाळ व नाले वारंवार, नियमितपणे साफ करून त्यातील पालापाचोळा व साचलेली इतर घाण काढून टाकावी. यामुळे नाले व पन्हाळ वाहूनआलेल्या वस्तूने तुंबून जाऊन साचवणूकीच्या टाकीत पाणी पडण्यास अडथळा निर्माण होणार नाही.

टाकीतले पाणी ज्या तोटीतून बाहेर पडते त्या तोटीच्या तोंडावर एक पातळ जाळीदार फडके बांधा म्हणजे त्यातून डास आत जाणार नाहीत

पाण्याचा खाडा (टाकी) अगदी स्वच्छ ठेवा नाहीतर डास निर्मितीचे एक आगर होईल.

पाणी काळजीपूर्वक वापरा. पाणी वाया जाऊ देऊ नका.

पाण्याचा दर्जा दर महिन्यातून एकाद तरी तपासून त्यात सुक्ष्मजंतू वाढत नाहीत ना याची खात्री करून घ्या. क्लोरीन टाकण्याचा उपाय सुक्ष्मजंतू आढळल्यास लगेच करा.

## वार्षिक देखभाल

उन्हाळयाचा कोरडा मोसम संपत येतो तेंव्हा साचवणूकीची टाकी जवळ जवळ रिकामी होत येते अशावेळी वार्षिक साफसफाई व डागडुजीची अशी देखभालीची कामे केली जातात.

१) पाणी गाळण्याचा संभाग बाहेर काढा त्यास स्वच्छ धुवून कोरडे करा. गरज वाटल्यास पुन्हा बसवण्यापूर्वी संपूर्ण गाळणयंत्र बदला. टाकीची स्थिती तपासा व गरज वाटली तर टाकी बदला.

२) टाकीचा आतला भाग व तळ भरपूर घासा. त्यावर बसलेला गाळ स्वच्छ पाण्याने धूवून काढा. त्यावर बसलेला गाळ स्वच्छ पाण्याने धूवून काढा. बाहेर जाणाऱ्या पाण्याच्या नळावर बोळा ठेवून सफाईचे पाणी बाहेर काढून टाका.

३) छताचा पृष्ठभाग, पाणी वाहून आणणारी पन्हाळ, पन्हाळ बांधलेले खिळे तपासा व गरज वाटल्यास दुरूस्त करा.

४) पाणी टाकीपर्यंत आणणाऱ्या गटाराच्या बाजू तपासा.त्यातले खड्डे व गळती दुरूस्त करा.

आधीच्या ओल्या मोसमात ज्या ज्या गळतीच्या जागा लक्षात आलेल्या असतील त्या सर्व दुरूस्त करायलाच हव्यात. भिंतीवर जेथे जेथे ओलसर डाग असतील त्यांच्या जागी आतल्या बाजूने पाणी व सिमेटच्या मिश्रणाने डागडुजी करा(१ भाग सिमेंटला २ भाग पाणी घालून कालवणे व लिंपण करणे) जर गळती होत आहे हे स्पष्ट आहे पण तरीही भिंतीवर ओले डाग नाहीत अशी स्थिती असेल तर साचवणाचा तळभाग सिमेंट व पाण्याच्या मिश्रणाने लिंपून काढा व मग त्यावर प्लॅस्टर करा.(१ भाग वाळू २भाग रिमेट ४भाग पाणी यांचे मिश्रण).

## सुक्ष्मजंतू (बॅक्टेरिया) परिक्षा


) कल्चर मिडीया असलेल्या बाटल्या उपलब्ध करून दिल्या जातात.(माध्यम).


) खुण,निशाणी असलेल्या पातळी पर्यंत बाटली भरा.

) शरीराच्या तपमाना इतक्या तपमानास ही बाटली १२ ते १८ तास ठेवा.


) रंगात काहीही बदल झाला नाही तर पाण्यात सुक्ष्मजंतू नाहीत असे समजावे.

पाण्यास काळा रंग आल्यास पाणी अशुध्द आहे असे समजावे.






पावसाचे पाणी साचवण्याच्या टाकीची रचना.




१) छप्पर
२) पन्हाळ
३) पाणी वाहून नेणारा नळ
४) वाहक टाकी
५) वाळू गाळणी संयत्र
६) साचवण टाकी

प्रपत्र-१.१

नळ पाणी पुरवठा योजनांचे सर्वेक्षण :- जिल्हयाचे नांव :-

I) सर्वसामान्य माहिती :-

१) योजनेचे नाव :-

२) योजनेचा प्रकार (स्वतंत्र/प्रादेशिक) :-

३) संबंधित गावे/वाड्याची नांवे :-

४) संबंधित ग्रामपंचायतींची नांवे :-

५) पंचायत समितीचे नाव :-

६) योजनेच्या कार्यान्वयन यंत्रणेचे नांव :-

७) योजनेचे काम :-

अ) सुरु झाल्याचा दिनांक (कार्यादेशाच्या तारखेनुसार) :-

ब) पूर्ण झाल्याचा दिनांक (पर्णत्वाच्या दाखल्यावरील तारखेनुसार) :-

८) योजना हस्तांतरणाचा दिनांक :-

९) योजनेचा प्रकल्पित कालावधी :-

१०) अ) योजनेची संकल्पित लोकसंख्या :-

ब) योजनेशी संबंधित गावांची/वाडयांची वर्तमान लोकसंख्या :-

११) अ) योजना क्षेत्रातील घरांची संख्या :-

ब) घर जोडण्या दिलेल्या एकूण घरांची संख्या :-

१२) अ) योजनेच्या संदर्भात आकारण्यात येणारी :-'

(i) सामान्य पाणीपट्टी :-

(ii) विशेष पाणीपट्टी :-

ब) पाणीपट्टीतून मिळणारे एकूण उत्पन्न :-

क) योजना चालियण्याचा व देखभालीचा सरासरी वार्षिक खर्च:-

(II) योजनेच्या उद्भवाची माहिती :-

१)' उद्भवाचा प्रकार :- एका पेक्षा जास्त उद्भव असल्यास उद्भवनिहाय माहिती द्यावी.

२) योजनेतून दरदिवशी दरडोई होणारा पाणी पुरवठा (लिटरमध्ये)

अ) संकल्पित :-

ब) प्रत्यक्ष :-

(i) सर्वसाधारण कालावधीत

(ii) उन्हाळ्यात

३) अ) उद्भव योग्य स्थितीत आहे काय

ब) नसल्यास, त्यांची सर्वसाधारण कारणे

(i) उद्भवाची क्षमता कमी होणे.

(ii) उद्भवाच्या बांधकामातील बिघाड

(iii) उद्भवाच्या पाण्याचे प्रदूषण (सविस्तर तपशिल द्यावा)

क) उद्भवाच्या बांधकामातील नादुरुस्तीचे तपशील

ड) नादुरुस्तीमुळे उद्भवातील पाण्याचे प्रदुषण होण्याची शक्यता आहे काय ?

इ) असल्यास,प्रस्तावित दुरुस्तीचे स्वरुप

फ) उद्भवाच्या दुरुस्तीतील अंदाजित खर्च

(टिप :- नळ योजनेला एका पेक्षा जास्त उद्भवापासून पाणी मिळत असल्यास (अ) ते (फ) पर्यंतची माहिती सर्व उद्भवाबाबत देण्यात यावी.)

४) १) अ) उद्भव पुरेसा आहे काय ?

ब) नसल्यास, वर्षातून किती महिने पुरेसे पाणी मिळत नाही.

क) उद्भव वाढ करण्यासाठी गरज आहे काय ?

ड) असल्यास, प्रस्तावित उद्भव वाढीचा तपशील

इ) उद्भव वाढीवरील अंदाजित खर्च

२) अ) पूरक उद्भव घेण्याची गरज आहे काय ?

ब) असल्यास,पूरक उद्भवाचे स्वरुप

क) पूरक उद्भवावरील अपेक्षित खर्च

III) विद्युत पंपाबाबतची माहिती

अ) विद्युतपंपाची संख्या

ब) पंपाची लिटर प्रतितास मध्ये क्षमता

१) अपेक्षित

२) प्रत्यक्ष

क) पंपिंगचे तास

ड) विद्युत पंपाचा प्रकार

इ) विद्युतपंपाची अश्वशक्ती

१) पंप घराजवळ प्रेशरगेज मधील पाण्याचे दाब (पंप चालू असताना)

२) सारखा दाब अपेक्षेप्रमाणे आहे काय

फ) विद्युतपंपात बिघाड आहे काय

ग) असल्यास बिघाडाचे स्वरुप

ह) पंपाच्या दुरुस्तीवरील अपेक्षित खर्च

IV) रायजिंग मेनची माहिती

अ) रायजिंग मेनची लांबी

ब) स्टॅटिक लिफ्टची उंची

क) रायजिंग मेन व्यवस्थितरित्या कार्यरत आहे काय ?

१) रायजिंग मेन मधील एअर व्हाल्व,स्लेस व्हाल्व कार्यरत आहेत काय

२) टाकीच्या ठिकाणी मिळणारे पाणी अपेक्षेप्रमाणे आहे काय ?

ड) नसल्यास, बिघाडाचे स्वरुप

इ) बिघाडाचे दुरुस्तीवरील अपेक्षित खर्च



SWSU/bhosale/pc-1
पीएम-११०१(500-12-98)7-अ

V) उंचावरील/ जमिनीवरील टाकी

अ) टाकीची धारणाशक्ती
ब) टाकी योग्य स्थितीत आहे काय ?
क) नसल्यास, आवश्यक दुरुस्तीचे स्वरुप
ड) टाकीच्या दुरुस्तीवरील अंदाजित खर्च

VI) निर्जंतुकीकरण कायम स्वरुपी व्यवस्था कार्यरत आहे काय ?

VII) पाईपलाईनची माहिती

अ) पाईपलाईनची लांबी
ब) वापरलेल्या पाईप्सचा प्रकार
क) १) पाईपलाईनमधील पाणी गळती होते काय ?
   २) गळतीमुळे पाणी प्रदूषित होण्याची शक्यता आहे काय?
ड) असल्यास,पाईप लाईनच्या आवश्यक दुरुस्तीचे स्वरुप
इ) पाईप लाईन दुरुस्तीवरील अपेक्षित खर्च
ई) व्हाल्व गळती आहे काय व त्यामुळे पाण्याचे प्रदूषण होण्याची शक्यता आहे काय ?
फ) असल्यास,दुरुस्तीचे स्वरुप
ग) व्हाल्व दुरुस्तीवरील अंदाजित खर्च

VIII) सार्वजनिक नळ थांब्याची माहीती

अ) नळ थांब्याची संख्या
ब) नळथांबे लोकसंख्येच्या प्रमाणात पुरेसे आहेत काय?
क) नसल्यास,किती अधिक नळथांब्याची आवश्यकता आहे.
ड) नळथांबे देणे तांत्रिकदृष्टया शक्य आहे काय ?
इ) असल्यास त्यावरील अपेक्षित खर्च
फ) पूर्वी असलेल्या सार्वजनिक नळ थांब्याची दुरुस्ती आवश्यक आहे काय ?
ग) असल्यास, दुरुस्तीचे स्वरुप
ह) नळ थांब्यावरील दुरुस्तीचा अपेक्षित खर्च
र) नळ थांब्याभोवती सांडपाणी वाहून जाण्यासाठी गटारे बांधली आहेत काय?
ल) असल्यास,ती योग्य स्थितीत आहेत काय ?
व) नसल्यास,त्यांच्या दुरुस्तीचे स्वरुप व दुरुस्तीवरील अंदाजित खर्च
च) नळ थांब्याभोवती गटारे बांधली नसल्यास, ती बांधण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांचे स्वरुप.
छ) नवीन गटारे बांधण्यावरील अपेक्षित खर्च

## प्रपत्र १.२

**विंधण विहिरींचे सर्वेक्षण :-** जिल्हयाचे नांव :-

१) गाव/वाडीचे नांव

२) ग्रामपंचायतीचे नांव

३) पंचायत समितीचे नांव

४) विंधण विहिर खोदण्याचा महिना.

५) विंधण विहिरीची खोली

६) यशस्वी विधंण विहिरींची संख्या :- (एका पेक्षा जास्त विंधण विहिरी असल्यास प्रत्येक विहीरीस ओळख क्रमांक द्यावा)

७) विंधण विहिरीतील पाण्याची पातळी :- (ओळख क्रमांक देऊन विंधण विहिरी निहाय माहिती द्यावी)

  १) ऑक्टोबर

  २) एप्रिल

८) विंधण विहिरीवरील हातपंप/विद्युतपंपः- (ओळख क्रमांक देऊन विंधण विहिरी निहाय माहिती द्यावी)

  १) एप्रिल महिन्यात एक सारखा दोन तास चालू शकतो काय, नसल्यास किती वेळ.

९) हातपंपाची इनलेट लाईनची खोली :- (ओळख क्रमांक देऊन विंधण विहिरी निहाय माहिती द्यावी)

१०) विद्युत पंपाची इनलेट लाईनची खोली :- (ओळख क्रमांक देऊन विंधण विहिरी निहाय माहिती द्यावी)

११) विंधण विहिरींच्या उद्‌भवाची विहिरीनिहाय :- (ओळख क्रमांक देऊन विंधण विहिरी निहाय माहिती द्यावी)

  १) मूळ क्षमता (लिटर प्रति तास)

  २) उन्हाळयातील प्रत्यक्ष क्षमता (लिटर प्रति तास)

१२) विंधण विहिरींवर बसविण्यात आलेले विद्युतपंप किती व हातपंप किती. (ओळख क्रमांक देऊन विंधण विहिरी निहाय माहिती द्यावी)

  १) वरीलपैकी तात्पुरते बंद किती :-

  २) कायम बंद किती

१३) लघु नळ योजना असल्यास, पाण्याच्या टाकीची धारणाशक्ती :- (ओळख क्रमांक देऊन विंधण विहिरी निहाय माहिती द्यावी)

१४) १) विद्युतपंपाची पंपनिहाय :- (ओळख क्रमांक देऊन विंधण विहिरी निहाय माहिती द्यावी)

I) अश्वशक्ती

II) पाण्याची क्षमता (लिटर ताशी)

२) विद्युतपंप योग्य प्रकारे कार्यरत आहे काय,

३) नसल्यास बिघाडाचे स्वरुप

४) विद्युतपंपावरील दुरुस्तीचा अंदाजित खर्च

१५) अ)१) हातपंप योग्य प्रकारे कार्यरत आहेत काय (ओळख क्रमांक देऊन विंधण विहिरी निहाय माहिती द्यावी)

२) नसल्यास, बिघाडाचे स्वरुप

३) हातपंप दुरुस्तीवरील अंदाजित खर्च

ब) १) हातपंपासभोवती प्लॅटफॉर्म बांधले आहेत काय :- (प्लॅटफॉर्म बांधण्याचे वर्ष)

२) असल्यास, प्लॅटफॉर्म चांगल्या स्थितीत आहेत काय, नसल्यास दुरुस्तीचे स्वरुप व त्यावरील अपेक्षित खर्च

३) हातपंपाभोवती प्लॅटफॉर्म बांधले नसल्यास, प्लॅटफॉर्म बांधण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांचे स्वरुप व त्यावरील अपेक्षित खर्च.

क) १) हातपंपाभोवतीचे सांडपाणी वाहून जाण्यासाठी गटारे बांधली आहेत काय ?

२) असल्यास, ती योग्य स्थितीत आहेत काय

३) नसल्यास त्यामुळे प्रदूषणाची शक्यता आहे काय

४) असल्यास, सुस्थितीत नसलेल्या गटारांच्या दुरुस्तीचे स्वरुप व त्यावरील अपेक्षित खर्च

५) हातपंपाभोवती सांडपाणी वाहून जाण्यासाठी गटारे बांधली नसल्यास, ती बांधण्यासाठी करावयाच्या उपाययोजनेचे स्वरुप व त्यावरील अपेक्षित खर्च.

प्रपत्र १.३

सार्वजनिक साध्या विहिरींचे सर्वेक्षण — जिल्हयाचे नांव

१) गाव/वाडीचे नांव

२) ग्रामपंचायतीचे नांव

३) पंचायत समितीचे नांव

४) योजनेचे नांव

५) विहीरींची संख्या
(एकापेक्षा जास्त विहिरी असल्यास प्रत्येक विहिरीस ओळख क्रमांक द्यावा.)

६) विहिरीनिहाय विहीरींची खोली :- ( ओळख क्रमांक नमूद करतांना विहिरींनिहाय माहिती द्यावी)

७) विहिरीनिहाय विहीरींचा व्यास :- ( ओळख क्रमांक नमूद करतांना विहिरींनिहाय माहिती द्यावी)

८) विहिरींचे बांधकाम केव्हा पूर्ण करण्यात आले विहिरीनिहाय :- ( ओळख क्रमांक नमूद करतांना विहिरींनिहाय माहिती द्यावी)

९) विहिरींची किंमत (विहिरीनिहाय ) :- ( ओळख क्रमांक नमूद करतांना विहिरींनिहाय माहिती द्यावी)

१०)विहिरींवरुन दरदिवशी दरडोई किती पाणी पुरवठा होतो :- ( ओळख क्रमांक नमूद करतांना विहिरींनिहाय माहिती द्यावी)

११)विहिरीवरील कठडे :-

अ) विहिरींवर कठडे बांधले असल्यास,

१) विहिरींवरील कठडे योग्य स्थितीत आहेत काय,

२) नसल्यास,दुरुस्तीचे स्वरुप व त्यासाठी अपेक्षित खर्च.

ब) विहिरींवर कठडे बांधले नसल्यास,

१) कठडे बांधण्यासाठी करावयाच्या उपाययोजनेचे स्वरुप व त्यावरील अपेक्षित खर्च.

१२) विहिरींची खोली :-

अ) विहिरींची खोली वाढविणे आवश्यक आहे काय (विहिरीनिहाय माहिती द्यावी)

ब) असल्यास, किती (विहिरीनिहाय माहीती द्यावी)

क) खोली वाढविण्यासाठी अपेक्षित खर्च (विहिरीनिहाय माहीती द्यावी)

१३) विहिरींची रुंदी :-

अ) विहिरींची रुंदी वाढविणे आवश्यक आहे काय (विहिरीनिहाय माहीती द्यावी)

ब) असल्यास,किती (विहिरीनिहाय माहिती द्यावी)



-1101(500-12-98)9

क) रुंदी वाढविण्यावरील अपेक्षित खर्च (विहिरीनिहाय माहीती द्यावी)

१३) विहीरींचा गाळ काढणे.

अ) विहीरींचा गाळ काढणे आवश्यक आहे काय,

ब) असल्यास, त्यावरील अपेक्षित खर्च.

१४) विहीरींच्या बांधकामाची स्थिती

अ) विहिरींचे बांधकाम सुस्थितीत आहे काय,

ब) नसल्यास, दुरुस्तीचे स्वरुप व त्यावरील अंदाजित खर्च.

प्रपत्र - १.४

प्रदूषित पाणी पुरवठा होत असलेल्या नळ योजनांच्या दुरुस्तीवरील त्रैमासिक अहवाल.

जिल्ह्याचे नांव :-

| अ.क्र. | पंचायत समितीचे नांव | ग्रामपंचायतीचे नांव | गांवे/वाडीचे नांव | नळ योजनेचे नांव | सर्वेक्षणानुसार प्रदूषित पाणी होण्याची कारणे | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | उद्‌नवाच्या नियमित शुध्दीकरण अभावी | पाईप गळतीमुळे | व्हाल्व गळतीमुळे | इतर कारणे |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६ (अ) | ६ (ब) | ६ (क) | ६ (ड) |
| | | | | | | | | |

| त्रैमासिकाअंती करण्यात आलेल्या उपाययोजना | | | | त्रैमासिक अखेर करण्यात आलेला एकुण खर्च. |
|---|---|---|---|---|
| उद्‌नवाचे नियमित शुध्दीकरण | क्षतिग्रस्त पाईप बदलणे | व्हाल्वची दुरुस्ती | इतर दुरुस्त्या | |
| ७ (अ) | ७ (ब) | ७ (क) | ७ (ड) | ८ |
| | | | | |



Ws-01/bhcsale-1/pcl

प्रेस-1101(500-12-98)10-अ.

प्रपत्र - ३.५

प्रदुषित पाणी पुरवठा होत असलेल्या पिण्याच्या विहिरींच्या दुरुस्तीवरील त्रैमासिक अहवाल.

जिल्ह्याचे नांव :-

| अ.क्र. | पंचायत समितीचे नांव | ग्रामपंचायतीचे नांव | गांवे/वाडीचे नांव | पिण्याच्या विहिरीचे नांव/क्रमांक | सर्वेक्षणानुसार पाणी प्रदुषित होण्याची कारणे | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्लॅटफॉर्म चांगल्या स्थितीत नसल्यामुळे | प्लॅटफॉर्म बांधले नसल्यामुळे | सांडपाणी वाहून जाण्यासाठी गटारे बांधली नसल्यामुळे | गटारे साफ न केल्यामुळे | इतर |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६ (अ) | ६ (ब) | ६ (क) | ६ (ड) | ६ (इ) |
| | | | | | | | | | |

| त्रैमासिकाअंती करण्यात आलेल्या उपाययोजना | | | | | त्रैमासिक अखेर करण्यात आलेला एकुण खर्च. |
|---|---|---|---|---|---|
| प्लॅटफार्म दुरुस्ती | प्लॅटफार्म बांधणे | गटारे बांधणे | गटारांची साफसफाई | इतर दुरुस्त्या | |
| ७ (अ) | ७ (ब) | ७ (क) | ७ (ड) | ७ (इ) | ८. |
| | | | | | |

प्रपत्र - १३

पाणी प्रदूषण टाळण्यासाठी परिसर स्वच्छतेसंदर्भातील कार्यवाहीचे विवरण.

जिल्ह्याचे नाव - - - - - - - - - - -

त्रैमासिक अहवाल

| अ. क्र. | पंचायत समितीचे नाव | ग्रामपंचायतीचे नाव | गाव/ वाडीचे नाव | ज्या गावांमध्ये प्रदूषण परिसर स्वच्छतेची व्यवस्था नसल्यामुळे झाले आहे व ज्यासाठी परिसर स्वच्छतेची कामे हाती घ्यावयाची आहेत त्याचे विवरण | सर्वेक्षणानुसार पाणी प्रदूषित होण्याची कारणे | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | सांडपाणी वाहून जाण्यासाठी गटारे बांधली नसल्यामुळे | जुनी गटारे नादुरुस्त असल्यामुळे | जुन्या गटारांची साफसफाई न झाल्यामुळे |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ (अ) | ६ (ब) | ६ (क) |
| | | | | | | | |

| त्रैमासिकाअंती करण्यात आलेल्या उपाययोजना | | | उपाययोजनेवर करण्यात आलेला त्रैमासिक अखेर खर्च |
|---|---|---|---|
| नविन गटारे बांधणे | जुन्या गटारांची गुरुस्ती करणे. | जुन्या गटारांची साफसफाई | |
| ७ (अ) | ७ (ब) | ७ (क) | ८. |
| | | | |

प्रपत्र - १.७

पाणी प्रदुषण टाळण्यासाठी परिसर स्वच्छतेसंदर्भातील कार्यवाहीचे विवरण.

जिल्हयाचे नांव - - - - - - - - - - -

त्रैमासिक अहवाल

| अ. क्र | पंचायत समितीचे नांव | ग्रामपंचायतीचे नांव | गांवे/ वाडीचे नांव | ज्या योजनेचे प्रदुषण परिसर स्वच्छतेची व्यवस्था नसल्यामुळे शक्य आहे व ज्यासाठी परिसर स्वच्छतेची कामे हवी आहेत त्याचे विवरण | सर्वेक्षणानुसार पाणी प्रदुषित होण्याची कारणे | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | सांडपाणी वाहून जाण्यासाठी गटारे बांधली नसल्यामुळे | जुनी गटारे नादुरुस्त असल्यामुळे | जुन्या गटारांची साफसफाई न झाल्यामुळे |
| १ | २. | ३ | ४ | ५ | ६ (अ) | ६ (ब) | ६ (क) |
| | | | | | | | |

| त्रैमासिकाअंती करण्यात आलेल्या उपाययोजना | | | उपाययोजनेवर करण्यात आलेला त्रैमासिक अखेर खर्च |
|---|---|---|---|
| नविन गटारे बांधणे | जुन्या गटारांची गुरुस्ती करणे. | जुन्या गटारांची साफसफाई | |
| ७ (अ) | ७ (ब) | ७ (क) | ८. |
| | | | |



Ws-01/bhosale-1/pol

एच-1101(500-12-98)12.

# प्रपत्र – १.८

पूर्ण झालेल्या नळ पाणी पुरवठा योजनांसाठी हिस्ट्रीसीट

जिल्ह्याचे नांव - - - - - - - - -

| अ.क्र. | ग्रामपंचायतीचे नांव | संबंधित गांवे वाड्यांची नांवे | पंचायत समितीचे नांव | योजनेचा प्रकार | ज्या कार्यक्रमांतर्गत योजना करण्यात आली त्याचे लेखाशिर्ष निहाय तपशिल | संकल्पित लोकसंख्या | उद्भवाचा प्रकार | योजनेची किंमत | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | मूळ | सुधारित |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९ (अ) | ९ (ब) |
| | | | | | | | | | |

| कार्यान्वयन यंत्रणेचे नाव | योजना हस्तांतरणाचा दिनांक | योजनेचा प्रकल्पीत कालावधी | विद्युत पंपाचा प्रकार | विद्युत पंपाची अश्वशक्ती | टाकीचा प्रकार | टाकीची क्षमता | पाईपलाईनची लांबी (पाईपच्या प्रकारनुसार तपशील द्यावा | घरजोडण्याची संख्या व टक्केवारी (एकुण घरांच्या संख्येशी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १०. | ११. | १२. | १३. | १४. | १५. | १६. | १७. | १८. |
| | | | | | | | | |

एव-1101(500-12-98)12-अ.

## प्रपत्र-१.९

जिल्ह्याचे नाव --------

पूर्ण झालेल्या विंधण विहिरीवरील विद्युतपंप (हिस्ट्रीशिट)

| अ. क्र. | ग्रामपंचायतीचे नांव | गांव/वाडीचे नांव | पंचायत समितीचे नांव | विद्युतपंपाचे ओळख क्रमांक | योजनेचे नांव व अर्थसंकल्पीय शिर्ष | खोली | पंपाची वैशिष्टे | | | आवक प्रती लिटर/तास |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | प्रकार | हॉ.पॉ. | विसर्गक्षमता (नूळ) | |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८ (अ) | ८(ब) | ८(क) | ९ |
| | | | | | | | | | | |

| योजना पूर्ण झाल्याचा दिनांक | योजनेवर झालेला एकूण खर्च | कार्यकारी यंत्रणा | सद्याचा विसर्ग | दुरुस्तीचा वर्षनिहाय इतिहास | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | दुरुस्ती | खर्च |
| १०. | ११. | १२. | १३. | १४ (अ) | १४ (ब) |
| | | | | | |

प्रपत्र-१.१०

## पूर्ण झालेल्या विंधण विहिरीवरील हातपंप (हिस्ट्रीशिट)

जिल्ह्याचे नांव . . . . . . . . . .

| अ.क्र. | हातपंपाचा ओळख क्रमांक | गाव/वाडीचे नांव | ग्रामपंचायतीचे नांव | पंचायत समितीचे नांव | योजनेचे नांव व अर्थसंकल्पीय शिर्ष | योजना पूर्ण झाल्याचा दिनांक | एकुण झालेला खर्च | कार्यकारी यंत्रणा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | [illegible] |
| | | | | | | | | |

| खोली | आवक (लिटर/तास) | हातपंपाचा प्रकार | हातपंपचा विसर्ग | | दुरुस्तीचा वर्षनिहाय इतिहास | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Leam Season | Flush Season | वर्ष | दुरुस्तीचे स्वरुप | खर्च |
| १०. | ११. | १२. | १३ (अ) | १३ (ब) | १४ (अ) | १४ (ब) | १४ (क) |
| | | | | | | | |

## प्रपत्र-१.११

जिल्ह्याचे नांव ..........

### पूर्ण झालेल्या सार्वजनिक विहिरी (हिस्ट्रीशिट)

| विहिरीचा ओळख क्रमांक | ग्रामपंचायतीचे नांव | गांव/वाडीचे नांव | पंचायत समितीचे नांव | योजनेचे नांव व अर्थसंकल्पीयशिर्ष | पूर्ण झाल्याचा दिनांक | झालेला एकुण खर्च | कार्यकारी यंत्रणा | खोली व रुंदी | दुरुस्तीची वर्षनिहाय माहिती | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | वर्ष | दुरुस्तीचा प्रकार | खर्च |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७ | ८. | ९. | १० (अ) | १० (ब) | १० (क) |
| | | | | | | | | | | | |

एच-1101(500-12-98)14.

प्रपत्र-१.१२

जिल्ह्याचे नांव - - - - - - - - - - - -

नळ पाणी पुरवठा योजनेचा मासिक कामगिरी अहवाल.

| योजनेचे नांव | गांव/वार्डीचे नांवे | ग्रामपंचायतीचे नांव | पंचायत समितीचे नांव | समस्यांचा तपशिल | शिफारस | समस्या निवारणार्थ प्रस्तावित उपाय-योजना. | प्रस्तावित उपाययोजनांची अंदाज पत्रके तयार झाली असल्यास अंदाजित किंमत | प्रस्तावित उपाययोजनांसाठी प्रशासकीय मंजूरी मिळाली असल्यास त्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. |
| | | | | | | | | |

| प्रस्तावित उपाययोजनेचा कार्यारंभ झाला असल्यास त्याची तारीख | प्रस्तावित उपाययोजना पूर्ण होण्याची अपेक्षित तारीख | प्रस्तावित उपाययोजनेवरील अहवालाधिन महिन्यातील खर्च | अहवालाधीन महिनाअखेर एकुण खर्च | अहवालाधीन महिन्यात प्रस्तावित दुरुस्ती विषयक काम पूर्ण झाले असल्यास त्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| १०. | ११. | १२. | १३. | १४. |
| | | | | |

एच-1101(500-12-98)14-अ.

28

/bhosd/-Lpcl

प्रपत्र - २

प्र मा ण प त्र

प्रमाणित करण्यांत येते की, मौजे                    तालुका
जिल्हा                    येथील नळ पाणी पुरवठा योजनेच्या विशेष दुरुस्ती/पुनर्वसन काम कृति आराखड्यात समाविष्ट असून सदर काम जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधी तून निधी अभावी घेणे जिल्हा परिषदेस शक्य नाही तसेच सदर कामांचा टंचाई कृति आराखड्यात समावेश नाही. करीता सदर काम ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत राज्य योजनांतर्गत नळ योजनाकरीता जिल्ह्याकडे उपलब्ध असलेल्या तरतूदीतून घेण्यासाठी मंजूरी करीता प्रस्तावित करण्यांत येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद

दिनांक :-

## प्रपत्र-३

### ग्रामीण नळ पाणी योजनांच्या विशेष दुरुस्ती/पुनर्रचना संदर्भात द्यावयाची प्रशासकीय मंजूरी व कार्यवाही करणाऱ्या यंत्रणा

| अ.क्र. | नळ योजनेचा प्रकार | हस्तांतरीत/ अहस्तांतरीत | ज्या निधीतून कामे करावयाची आहेत त्याचा तपशिल | कामांना प्रशासकीय मंजूरी देणारे प्राधिकारी | कामे ज्या यंत्रणेमार्फत करावयाची आहे तिचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| १. | स्थानिकस्तर | हस्तांतरीत वा अहस्तांतरीत | १) जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून | जिल्हा परिषदेअंतर्गत सक्षम अधिकारी | जिल्हा परीषद |
| | | | २) नळ योजनासाठी जिल्ह्याकडे उपलब्ध असलेल्या राज्य योजनांतर्गत तरतुदीतून | जिल्हा परिषद (रुपये ५ लाखापर्यंत)<br>विभागीय आयुक्त (रु.५ लाखापेक्षा जास्त परंतू रु.१० लाखापर्यंत)<br>पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (रु.१० लक्षापेक्षा जास्त) | जिल्हा परीषद |
| २. | राज्यस्तर | हस्तांतरीत | १) जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून | जिल्हा परिषदेअंतर्गत सक्षम अधिकारी | जिल्हा परीषद |
| | | | २) नळ योजनासाठी जिल्ह्याकडे उपलब्ध असलेल्या राज्य योजनांतर्गत तरतुदीतून | जिल्हा परिषद (रु.५ लक्षापेक्षा पर्यंत)<br>विभागीय आयुक्त (रु.५ लक्षापेक्षा जास्त परंतु रु.१०.०० लक्षापर्यंत)<br>पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (रु.१० लक्षापेक्षा जास्त) | जिल्हा परीषद |



Ws-01/bhosale-1/pcl

एन-1101(500-12-98)15-अ.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३. | | अहस्तांतरीत | १) जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून<br>२) नळ योजनासाठी जिल्ह्याकडे उपलब्ध असलेल्या राज्य योजनांतर्गत तरतुदी | जिल्हा परिषदेअंतर्गत सक्षम अधिकारी<br>जिल्हा परिषद रु.५.०० लक्षापर्यंत<br>विभागीय आयुक्त (रु.५ लक्षापेक्षा जास्त परंतु १०.०० लक्षा पर्यंत)<br>पा.पु.व स्व.चि. (रु.१० लक्षापेक्षा जास्त) | संबंधित पं.स.स्तर शाखा अभियंता बांधकाम संबंधित परिसर अभियांत्रिकी बांधकाम विभाग. |

पत्र-1101(500-12-98)16.

प्रपत्र ४.१

## खाजगी नळ जोडणी देण्याची पध्दत

शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार ग्रामीण भागातील नळ योजना [illegible] दरडोई ५५ लिटर्स प्रमाणे पाणी पुरवठा होईल अशा प्रकारे आखावयाच्या असून [illegible] टक्के घरांना खाजगी नळ जोडण्या देण्याची तरतूद करण्यात आली आहे. खाजगी [illegible] दररोज दरडोई ७० लिटर्स प्रमाणे तर उर्वरित ७० टक्के घरांना सार्वजनिक नळ कोंडाळ्यावरून ४० लिटर्स प्रमाणे पाणी पुरवठा करावयाचा आहे. या बाबी लक्षात घेऊन गावाच्या लोकसंख्येप्रमाणे योजनेतील उद्‌भव, उद्‌भववाहीनी, पंपसामुग्री व ती चालविण्याचे तास साठवण टाकी, वितरण जलवाहिन्या याची रचना केलेली असते त्यामुळे योजनेव्दारे खाजगी नळ जोडणी देताना ग्रामपंचायतीनी ज्या यंत्रणेकडून नळ योजना पुर्ण करण्यात आली असेल त्या यंत्रणेचे संबंधित अभियंता यांच्या सल्ल्यानुसार आवश्यक त्या आकाराची व ३० टक्के पर्यंत नळ जोडण्या द्याव्यात, जेणेकरुन गावात सर्वत्र सुव्यवस्थित पाणी पुरवठा होऊ शकेल.

ज्या कुटूंबास अगर व्यावसायिकास घरगूती अगर व्यवसायासाठी खाजगी नळ जोडणी घ्यावयाची असेल त्याने विहित नमुन्यात स्वतःच्या सहीनशी ग्रामपंचायत कार्यालयातडे अर्ज करावा. अर्जाचा नमुना सोबत दिला आहे. अर्जाचा नमुना ग्रामपंचायत कार्यालयात योग्य ते शुल्क घेउन विकत देण्यात यावा. साधारणतः ग्रामीण नळ योजनेमधून १२ मि.मि. व्यासापेक्षा मोठ्या आकाराची नळ जोडणी मंजूर करण्यात येऊ नये. केवळ विशेष व्यवसायासाठी अथवा शैक्षणिक संस्थेसाठी २० मि.मि. व्यासाची नळ जोडणी मंजूर करण्यात यावी.

नळ जोडणी मागणी अर्ज ग्रामपंचायत कार्यालयास प्राप्त झाल्याच्या दिनांकाची अर्जावर नोंद घेऊन त्यावर ग्रामसेवकाने स्वतःची सही करावी. नळ जोडणीचा अर्ज [illegible] कोरा अर्ज विकत घेतल्यापासून एक महिन्याच्या आत भरुन ग्रामपंचायतीकडे सादर करावा. अन्यथा सदर अर्ज बाद समजण्यात यावा. को-या अर्जासाठी शुल्क आकारणी जास्तीत जास्त रुपये ५/- पर्यंत ठेवण्यात यावी. अर्ज विक्रीचा दिनांक ग्रामसेवकाने स्वतःच्या सहीशिक्क्यानिशी को-या अर्जावर वरच्या बाजूस नोंदवावा.

ग्रामपंचायत कार्यालयात अर्ज प्राप्त झाल्यापासून नळ जोडणी मंजूरीची प्रक्रिया ग्रामपंचायतीने १५ दिवसांत पूर्ण करावी. मंजूरी आदेश अर्जदारास लेखी पत्राने कळवून त्यात खालील उल्लेख स्पष्ट करावा.

१) नळ जोडणीचा मंजूर आकार.

२) बसविण्यात येणा-या नळ तोटयांची संख्या.

३) विशेष पाणी पट्टी आकारणीचा वार्षिक दर.

४) अर्जदाराने भरावयाची अनामत रक्कम रुपये

नळ जोडणी शुल्क रुपये ..... .....

ना परतावा एकुण रुपये ..... .....

एकुण रुपये

वरील प्रमाणे अर्ज मंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायत पाणी पुरवठा समितीच्या अध्यक्षाकडे राहील.



Ws01/bhosale/pc-1
एच-1101(500-12-98)16-अ.

नळ जोडणीचे काम अर्जदाराने स्वखर्चाने अनुभवी नळ जोडणा-याकडून करुन घ्यावे. घरातील नळ जोडणीचे काम सुव्यवस्थितपणे पूर्ण झाल्याची खात्री करुन घेऊन अर्जदाराने तसे ग्रामपंचायतीस लेखी कळवून वितरण नलिकेवर नळ जोडणी करुन देण्याविषयी विनंती करावी. ग्रामपंचायतीने त्वरीत वितरण नलिकेवर प्रत्यक्ष जोडणी करुन देऊन नळ वापर सुरु करुन द्यावा. ग्रामपंचायत वितरण नलिकेचे जोडणीसाठी लागणारे साहित्य उदा. बिडाचे अगर पी.व्ही.सी. सॅडल, ब्रास फेरुल (आवश्यकता असल्यास) स्वतःच्या शिल्लक साठ्यातून वापरावेत. तसेच मजूरीची रक्कम ग्रामपंचायतीने सोसावी. वितरण नलिकेवर सॅडल बसविण्यात आल्यावर त्यापुढील संपूर्ण नळ जोडणीचे काम अर्जदाराने स्वखर्चाने करावयाचे आहे.

ग्रामपंचायतीने नळ जोडणी शुल्क आकारणीचा दर सॅडलची व फेरुलची बाजारभावाने होणारी किंमत तसेच मजूरीचा दर या सर्व खर्चाचा विचार करुन ठरवावा.

ग्रामीण नळ योजनेसाठीचे नियम कसे असावेत याचा नमुना सोबत दिलेला आहे. आवश्यकतेनुसार त्यात बदल करावयाचा अधिकार ग्रामपंचायतीस आहे. हे नियम खाजगी नळधारकाला बंधनकारक राहतील.

नळ जोडणी धारकाकडून वसूल करण्यात येणारी अनामत रक्कम ग्रामपंचायतीने ठेवीच्या स्वरुपात ग्रामपंचायत खाती जमा करावी. मात्र अशा रकमेवर व्याज देऊ नये. अशा जमा झालेल्या अनामत रकमा बँकेत दीर्घ मुदतीची ठेव म्हणून ग्रामपंचायतीनी ठेवावी. व त्यावरील व्याजाचा विनियोग योजनेच्या देखभाल व दुरुस्तीसाठी करण्यात यावा. खाजगी नळ धारकाने काही कारणास्तव खाजगी नळ जोडणी बंद ठेवल्यास अनामत रक्कम परत करण्यात यावी. मात्र, ग्रामपंचायतीने सदरची नळ जोडणी दंडात्मक कारवाई म्हणून बंद केल्यास नळ धारकास अनामत रक्कम परत करण्यात येऊ नये. खाजगी नळ धारकाकडे कोणत्याही परिस्थितीत अनामत रकमेपेक्षा जास्त पाणी पट्टीची रक्कम थकीत राहू देऊ नये. तत्पुर्वी खाजगी नळ धारकास ताकीद देऊन, ताकिदीच्या दिवसापासून ३० दिवसांनंतर त्याचे नळ कनेक्शन बंद करण्यात यावे.

नळधारकाकडून घ्यावयाची " अनामत रक्कम " जास्तीत जास्त तीन वर्षाच्या विशेष पाणी दराऐवढी आकारण्यात यावी.

खाजगी नळ जोडणीचे प्रमाण ३० टक्के पेक्षा वाढल्यास नळधारकांकडून ज्यादाचे पाणी वापरले जाण्याची शक्यता विचारात घेता अन्य कुटूंबासाठी विहित प्रमाणात पाणीपुरठा करण्यात व्यत्यय या अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. या मुद्याचा विचार करता, ग्रामपंचायतीने ग्रामीण नळ योजनेतून एकूण लाभधारक कुटूंबसंख्येच्या जास्तीत जास्त ३० टक्के कुटुंबाना खाजगी नळ जोडणी मंजूर करण्याचे बंधन पाळावे. केवळ नळ योजनेचा वार्षिक देखभाल व दुरुस्ती खर्च व विशेष दुरुस्ती खर्च यांची तोंडमिळवणी करणे शक्य व्हावे एवढ्याच उद्देश खाजगी नळ जोडणीस मंजूरी देताना लक्षात घ्यावा.

ग्रामीण नळ योजना उभारणीचा संपूर्ण खर्च शासनामार्फत केला जात असतो. मात्र अशा योजना कार्यरत केल्या नंतर त्यांची देखभाल व दुरुस्ती खर्चापोटी शासनाकडून ग्रामपंचायतीस विज बिलावरील ५० टक्के सापेक्ष अनुदान व्यतिरिक्त इतर अनुदान मिळत नसल्याने अशा खर्चासाठी लागणारा निधी ग्रामपंचायतीने साधारण पाणीपट्टी व विशेष पाणीपट्टी दर आकारणीतून जमा होणा-या महसुलातून भागवावयाचा आहे. मोठे औद्योगिक व्यवसाय, दुग्धप्रक्रिया केंद्र, ज्यांना विपूल प्रमाणात पाण्याची गरज असते. अशा बिगर घरगुती व्यवसायांना देखील ग्रामीण नळ

योजनेतून पाणी पुरवठा करता येईल. मात्र याचा विपरीत परिणाम लोकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यावर होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

खाजगी नळ जोडणी मंजूर करण्यापुर्वी ग्रामसेवकाने अर्जदाराच्या घरातील सांडपाणी वाहून देणा-या व्यवस्थेची पाहणी आरोग्य विकास अधिका-यासह करावी. अस्तित्यातील व्यवस्था अपूरी असल्याचे निदर्शनास आल्यास अर्जदारास आवश्यक तशी सूचना देऊन सांडपाण्याचा निचरा व्यवस्थित करण्यास कळवावे व तशी व्यवस्था झाल्यावरच नळ जोडणी अर्जाचा विचार करावा.

खाजगी नळ जोडणीचे काम पूर्ण होऊन त्यातून पाणी पुरवठा ज्या दिवशी सुरु होईल त्या दिवशी अथवा त्यानंतर शक्य तेवढ्या लवकर खाजगी नळधारकाची नोंद तपासणीच्या नोंदवहीत करण्यात यावी. अशा नोंदवहीचा नमुना सोबत दिला आहे. या नोंदवहीतील माहितीचे आधारे अस्तित्यातील प्रत्येक नळ धारकाची माहिती एकत्रित रीत्या उपलब्ध होईल. या नोंदवहीतील नोंदीवरुन पाणीपट्टी महसूल जमा नोंदवहीत आवश्यक नोंदी घेणे सुलभ होईल. तसेच पाणीपट्टी महसुलाचे वार्षिक अंदापत्रक तयार करणे शक्य होईल.

पाणीपट्टी जमा महसूल नोंदवहीचा नमुना सोबत दिला आहे. एका नोंदवहीचा वापर सलग तीन वर्षापर्यंत करता यावा. अशा रितीने तिची रचना करण्यात यावी.

खाजगी नळ जोडणीस ग्रामपंचायतीने जी आय (मीडियम ड्युटी) पाईप वापरावेत. तसेच जलमापक यंत्र वापरणे ग्रामपंचायतीने मान्य केलेले असेल तर असे जलमापक यंत्र खाजगी नळधारकाने स्वखर्चाने आणुन बसवावे. जलमापक यंत्र बसविण्यापूर्वी त्याची चाचणी अहवाल मागवून घ्यावा. जलमापक यंत्र खाजगी नळ जोडणी धारकाने अंगणात अगर घराच्या जोत्याचे वर बसविण्यात यावे. आवश्यकतेनुसार त्यावर बिजागरी पेटी बसवून ते सुरक्षित राहील याची खात्री करुन घ्यावी.

घराच्या अंतर्गत भागात नळ जोडणीसाठी पी व्ही सी पाईप घेण्यात येऊ नये. ज्यावेळी नळ जोडणीसाठी रस्ता ओलांडून पाईप टाकणे आवश्यक असेल अशा ठिकाणी नळ जोडणीचा पाईप रस्त्याच्या पातळीच्या किमान ४५ सें.मी. खोलीवर चर खणून टाकण्यात यावा. पाईप टाकून झाल्यावर वर पूर्ववत भरून रस्ता दुरुस्त करण्याची जबाबदारी नळधारकावर टाकण्यात यावी. कुठल्याही परिस्थितीत नळ जोडणीचा पाईप उघड्या गटारातून अथवा त्यामधून टाकला जाणार नाही याची विशेष काळजी घेण्यात यावी.

विविध आकाराच्या वितरण व्यवस्थेवर जास्तीत जास्त किती नळजोडण्या देणे व्यवहार्य आहे, याची माहिती सोबतच्या तक्त्यास दिली आहे.

ग्रामीण नळ योजनेबाबतचे नमुना नियम सोबत दिले आहेत. त्यानुसार ग्रामपंचायतीनी ठराव करुन त्यांना सर्वसाधारण सभेत मंजुरी घेऊन त्या नियमानुसार कार्यवाही करावयाची आहे.

<u>प्रपत्र- ४.२</u>

## ग्रामीण नळ योजनेसाठी नमुना नियम

(सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्र. ३ मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे अधीन राहून तयार करण्यात आले)

- - - - - - - - - - - - - - - - - - - ग्राम पंचायत कार्यालय मु. पोष्ट - - - - - - - - - - - - - - - तालुका - - - - - - - - - - - - - - - जिल्हा - - - - - - - - - - - - ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनेचे अंदाजपत्रक - - - - - - - - - - - - - - - - - - ग्रामपंचायतीच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.- - - - - - - - - - दिनांक - - - - - - - - - - - - अन्वये खालीलप्रमाणे मंजूर केले असून त्यास - - - - - - - - - - - तालुका पंचायत समिती - - - - - - - - - - - - - यांचे कडून त्यांचे कडील पत्र क्र - - - - - - - - - - - - - - दिनांक - - - - - - - - - - - - - - अन्वये मान्यता घेण्यात आली आहे. - - - - - - - - - - - - - - - नळ पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र शासनाच्या परिसर अभियांत्रिकी बांधकाम विभाग - - - - - - - - - - - - - - - यांच्यामार्फत जिल्हा परिषदांमार्फत - - - - - - - - - - - - - - - रोजी पूर्ण करण्यात आली असून सदरील योजनेचा प्रत्यक्ष ताबा - - - - - - - - - - - - - - - ग्रामपंचायतीस दिनांक - - - - - - - - - - - - - - रोजी मिळाला. नळ योजना त्या दिवसांपासून ग्रामपंचायतीमार्फत कार्यान्वित करण्यात आली आहे. सदरील नळ योजनेमधून - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - ग्रामपंचायत हद्दीतील मुख्य गावठाण व - - - - - - - - - - - - - - वाड्या/वस्त्या/पाड्या/टोल्या यांना नळ पाणी पुरवठा करण्यात येत आहे. या योजनेतून केल्या जाणा-या पाणी पुरवठाबाबतचे खाली निर्देश केलेले नियम व त्या संबधीच्या अटी या अन्वये करण्यात आले आहेत. . सदरील नियम - - - - - - - - - - - - - ग्रामीण नळ पाणी पुरवठा नियम व अटी - - - - - - - - - - - - - - या शिर्षाखाली अंतर्भूत करण्यात आले असून सदरील नळ योजनेतून, घरगुती वा बिगर वापरासाठी पाणी वापरणा-या प्रत्येक कुटुंबास तसेच व्यावसायिक व्यक्तीस अगर व्यावसायिक संस्थेस लागू राहतील.

(१) संक्षिप्त नांव व लागू होण्याचा दिनांक

खालील नियम - - - - - - - - - - - - - - ग्रामीण नळ पाणी पुरवठा नियम व अटी - - - - - - - - - - - - - असे संबोधण्यात आले असून त्यांची अंमलबजावणी दिनांक - - - - - - - - - - - - पासून करण्यात आली आहे.

(२) संज्ञा :-

याबाबत एखादी विवक्षित अट व त्या अटीस कायदेशीर हरकत मान्य झाल्यास ती सोडून खालील अटी व संज्ञा ग्राह्य धरण्यात येईल.

(२.१) नियम व अटी मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५९ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारास अनुसरुन त्यांचे अर्थ व हेतू मर्यादित राहील व ते - - - - - - - - - - - - - ग्रामपंचायत हद्दीतील सर्व भाग व व्यक्तींना समान रुपाने (विवक्षित सवलती वगळता) लागू राहतील.

(२.२) तांत्रिक अधिकारी

गटविकास अधिकारी वा महाराष्ट्र शासन यांनी नेमलेल्या कुठलाही तांत्रिक अधिकारी [illegible] ग्रामपंचायतीस तांत्रिक सल्ला व सहाय्य देण्याचे अधिकार सोपविण्यात आले आहे, त्याला तांत्रिक सल्लागार म्हणून स्वीकार केला असून त्यांचे दिलेला तांत्रिक सल्ला हा आदेश म्हणून ग्राह्य समजण्यात येईल व त्यानुसार तांत्रिक स्वरुपाच्या तक्रारीचे निराकरण करणे आवश्यक.

(२.३) नळ जोडणी.

एखादी व्यक्ती, कुटुंब अथवा व्यवसायप्रमुख यांनी स्वतःच्या वा कुटुंबाच्या अथवा व्यवसायाच्या गरजेसाठी खाजगी नळ जोडणी मागितल्यास व ती मंजूर करुन त्यास नळ जोडणी दिल्यास, त्याचा उल्लेख नळ जोडणी असा केला जाईल.

(२.४) ग्रामपंचायत नळ वा वितरण व्यवस्था

मुळ योजनेव्दारा गावठाणामध्ये तसेच ग्रामपंचायतीच्या क्षेत्रातील वाड्या व वस्त्यायांमध्ये टाकलेले मुख्य पाणी पुरवठ्याचे नळ, ज्यांचा समावेश वितरण व्यवस्था याखाली संबोधण्यात आला आहे व त्यामधून एखाद्या विवक्षित भागास पाणी पुरवठा केला जातो, त्यास ज्यांची मालकी ही ग्रामपंचायतीकडे आहे, अशा नळास ग्रामपंचायत नळ वा वितरण व्यवस्था असे संबोधण्यात येईल.

ग्रामपंचायतीने स्वखर्चाने वा शासनाच्या मदतीने सध्याच्या नळामध्ये वा वितरण व्यवस्थेत भविष्यकाळात वाढ केल्यास, त्या सर्व वाढी व वितरण व्यवस्थेत ग्रामपंचायत नळ वा वितरण व्यवस्था म्हणून संबोधण्यात येतील.

(२.५) ग्रामपंचायतीचे गटार :-

ग्रामपंचायतीने ग्रामपंचायत हद्दीतील सांडापाणी वाहून त्याचा निचरा करण्यासाठी बांधलेल्या कच्च्या-पक्क्या गटारांचा उल्लेख ग्रामपंचायतीचे गटार अशा अर्थाने केला जाईल.

(२.६) नळ जोडणी ॲटॅचमेंट

एखादी व्यक्ती, कुंटूब वा व्यावसायिक यांनी त्यांच्या उपयोगासाठी घ्यावयाची नळ जोडणी ग्रामपंचायत नळ वा वितरण व्यवस्थेस जोडण्यासाठी तांत्रिक स्वरुपाची जी व्यवस्था केली जाते तीस नळ जोडणी ॲटॅचमेंट असे संबोधण्यात येईल.

(२.७) जागेचा नकाशा

एखादी व्यक्ती, कुटुंब वा व्यावसायिक यांनी जेव्हा त्याच्या उपयोगासाठी खाजगी नळाची योग्य त्या नमुन्यात अर्ज करुन मागणी केली असेल, त्या वेळी सोबत नकाशा काढून व त्यावर ग्रामपंचायत नळ, रस्ता व त्यांच्या व्यक्तिगत राहण्याचे घर वा व्यवसायाचे स्थळ दाखवून पाण्याचा वापर करण्याची जागा निर्देशित करावयाची आहे. त्यास जागेचा नकाशा असे संबोधण्यात येईल.

(२.८) सदरील नियम व अटी यातील वाक्यांचा व शब्दांचा अर्थ लावतांना या नियमांच्या हेतूस बाधा न आणता त्याचा योग्य तो अर्थ ग्रामपंचायतीने स्पष्ट केल्यास तो कायदेशीर व गृहीत धरण्यात येईल. मात्र अशा बाबतीत जर एखाद्या विवक्षित प्रकरणात न्यायालयाने वा जिल्हा परिषदेने काही बदल सुचविल्यास तो त्या विवक्षित संदर्भात लागू राहील अथवा आवश्यकता निर्माण झाल्यास संबंधीत नियमातील पोटनियमात योग्य तो फेरबदल केला जाईल.त्यासाठी ग्रामपंचायतीस बहुमताचा ठराव करणे बंधनकारक राहील.

(३) खाजगी नळ पाणी पुरवठा अर्ज :-

(३.१) ज्या वेळी एखाद्या व्यक्तीस वा कुटुंबास वा व्यावसायिकास तो रहात असलेल्या खाजगी अथवा घरात वा व्यवसायासाठी नळ जोडणी घ्यावयाची असेल त्यासाठी त्यांने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. को-या अर्जाचा नमुना ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामपंचायतीच्या कामाच्या वेळी ग्रामसेवकाकडून त्यासाठीचे शुल्क रोख भरुन ग्रामपंचायत शिक्क्यानिशी मिळू शकेल. अर्जासोबत घ्यावयाची इतर कागदपत्रे वा त्यांच्या नकला अर्जदाराने अर्जासोबत स्वखर्चाने घ्यावयाच्या आहेत. अर्जाचा विहित नमुना सोबत दिलेला अहे. सदरील अर्ज त्या व्यक्तीस वा कुटुंब प्रमुखास व्यावसायिकाच्या नावाने पुरविण्यात आला असेल, त्याच नावाने खाजगी नळ जोडणी ग्रामपंचायत या नियमाच्या आधीन राहून मंजूर करील.

(३.२) खाजगी नळ पाणी पुरवठा अर्ज ग्रामपंचायतीत संपुर्ण भरुन व सोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती जोडून विहित नमुन्यातील अर्ज तो खरेदी केलेल्या दिनांकापासून एक महिन्यात सादर केला पाहिजे. अर्धवट माहिती असलेला वा चुकीची माहीती असलेला वा अर्जदाराची सही नसलेला अर्ज न स्वीकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीकडे राहील.

(३.३) खाजगी नळ पाणीपुरवठा अर्जासोबत विहित केलेली अनामत रक्कम ॲटॅचमेंट फी इतर देयकाची रक्कम रोख ग्रामपंचायत कार्यालयात भरुन पावती क्रमांक अर्जावर लिहिल्याशिवाय सदर अर्जाचा विचार केला जाणार नाही. नळ जोडण्यासाठी भरावयाची अनामत रक्कम व ॲटॅचमेंट फी ग्रामपंचायतीने या नियमान्वये मंजूर केलेल्या दराप्रमाणे आकारण्यात येईल. तसेच आकरण्यात आलेली अनामत रक्कम बिनव्याज ठेव स्वरुपात ग्रामपंचायत खाती जमा राहील.

(३.४) वरीलप्रमाणे अर्ज ग्रामपंचायतीकडे आल्यावर तो प्राप्त झालेल्या दिनांकापासून एक महिन्यात त्याला ग्रामपंचायत मंजुरी देईल. कुठलाही अर्ज विवक्षित कारणासाठी नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने या नियमानुसार स्वतःकडे राखून ठेवलेला आहे.

(३.५) खाजगी नळ जोडणी ग्रामपंचायत वितरण नलिकेवर ज्या महिन्यात जोडली जाईल, त्या महिन्याच्या एक तारखेपासून सदर नळ जोडणी दिल्याचे सर्व कारणांसाठी समजण्यात येईल. विशेष वार्षिक पाणीपट्टी त्या महिन्यापासून हिशोबात धरली जाईल.

(४)सार्वजनिक नळ कोंडाळे

(४.१) ग्रामीण नळ योजनेमधून जे नळ कोंडाळे सार्वजनिक जागी पुरवठा करण्यासाठी बांधले आहेत व ज्यांची मालकी ग्रामपंचायतीकडे आहे अशा सर्व नळ कोंडाळ्यांतून घरगुती वापरासाठी पाणी घेण्याचा अधिकार ग्रामपंचायती हद्दीतील सर्व रहिवाश्यांना आहे. त्यासाठी घालून दिलेल्या अटी व त्यासाठीचे ठरवून दिलेले साधारण पाणीपट्टीचे वार्षिक दर हे सर्व कुटूंबांना लागू असतील. मात्र ज्या कुटूंबांना शासनाने पाणीपट्टीची सवलत दिली असेल अशाच कुटूंबाना साधारण पाणीपट्टी भरण्यापासून सवलत देण्यात येईल. अशा कुटुंबाना त्यासाठी तलाठी कार्यालयाकडून सत्यप्रतचा दाखला मिळविणे बंधनकारक आहे

(४.२) सार्वजनिक नळ कोंडाळ्यामधून जे कुटूंब घरगुती वापरासाठी पाणी वापरते त्यांच्याकडून (कुटूंबप्रमुखाकडून) साधारण पाणीपट्टीची मागणी वार्षिक दराने वसूल करण्यात येईल. त्यासाठी १ एप्रिल ते पुढील वर्षाचे ३१ मार्च अखेर अशा बारा महिन्यांचा कालावधी वर्ष म्हणून धरण्यात येईल. जे कुटूंब वर्षातून किमान (३) तीन महिने किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी सार्वजनिक नळ कोंडाळ्यामधून पाण्याचा वापर करील त्या कुटूंबाकडून

(४.९) [illegible] आणखी एखादे सार्वजनिक नळकोंडाळे बंद केल्यास त्या नळ कोंडाळ्यातून पाणी [illegible] व्यक्तीस अथवा कुटुंबास अन्य सार्वजनिक नळकोंडाळ्यामधून पाणी [illegible] मुभा राहील. एखादे नळकोंडाळे ग्रामपंचायतीने बंद केले या सबबीखाली [illegible] व्यक्तीस अथवा कुटुंबास साधारण पाणीपट्टी भरण्यास सवलत मागण्याचा अधिकार [illegible] नाही. अशा व्यक्तीकडून अथवा कुटुंबप्रमुखाकडून संपुर्ण साधारण पाणीपट्टी वसूल करण्याचा ग्रामपंचायतीस संपुर्ण अधिकार राहील व ती वसूल करण्यास ग्रामपंचायतीस कायदेशीर हक्क राहील.

(४.१०) कुठल्याही सार्वजनिक नळ कोंडाळ्यामधून सोईनुसार पाणी भरण्याचा समान हक्क सर्व [illegible]/कुटुंबियांना राहील व त्यासाठी राहण्याचे क्षेत्र, धर्म व जात हे आडवे येऊ शकणार नाहीत वा कुणाही व्यक्तीस अगर कुटूंबास कुठल्याही नळकोंडाळयामधून पाणी [illegible] कायदेशीर हक्क राहील व त्याला विरोध करणा-या व्यक्तीविरुध्द गुन्हा [illegible].

(५) खाजगी नळ जोडणी अटी व नियम :-

(५.१) ज्या व्यक्तीचे अथवा कुटुंबप्रमुखाने अथवा व्यावसायिकाच्या नावे खाजगी नळ जोडणी मंजूर झालेली असेल, अशा नळजोडणी धारकास सदर नळ जोडणी मधून त्या एकाच कुटुंबास अथवा व्यावसायिकास पाणी वापरण्याचा अधिकार राहील.

(५.२) खाजगी नळजोडणीधारकास स्वतःच्या खाजगी नळातून स्वतःच्या कुटूंबाव्यतिरिक्त इतर कुटुंबासाठी अथवा दुस-या व्यवसायासाठी हंगामी अथवा कायमस्वरुपाचे पाणी पुरविणे व त्यापोटी स्वतः पाणी पट्टी रोख अथवा अन्य स्वरुपात स्वीकारणे बेकायदेशीर राहील. अशा प्रकारे स्वतःच्या उपयोगासाठी घेतलेल्या खाजगी नळजोडणीचा गैरवापर वा गैरव्यवहार खाजगी नळजोडणीधारकाने केल्याचे आढळून आल्यास अशा खासगी नळ जोडणी धारकाविरुध्द कायदेशीर कारवाई करण्याचा संपूर्ण अधिकार ग्रामपंचायतीस राहील. तसेच पूर्व सूचना देऊन सदर खाजगी नळजोडणी तोडण्याचा अधिकार ग्रामपंचायतीस राहील. त्यापोटी कुठल्याही प्रकारची नुकसानभरपाई मागण्याचा अधिकार अशा खाजगी नळजोडणीधारकास राहणार नाही. अशा प्रसंगी सदर खाजगी नळ धारकाने नळजोडणी मंजूर करतेवेळी भरलेली अनामत रक्कम संपुर्णपणे जप्त करुन ग्रामपंचायत उत्पन्नात जमा करण्याचा संपूर्ण अधिकार ग्रामपंचायतीस राहील.

(५.३) खाजगी नळजोडणीसाठी ठरवून दिलेली वार्षिक विशेष पाणीपट्टी ही १ एप्रिल, ते पुढील वर्षाच्या 31 मार्च अखेर या १२ महिन्याचा संपूर्ण कालावधीसाठी असेल. नळजोडणी ज्या आर्थिक वर्षात मंजूर केली असेल त्या आर्थिक वर्षाच्या उर्वरित कालावधीसाठी विशेष पाणीपट्टी खालीलप्रमाणे वसूल करण्यात येईल.

१ ते ३ महिन्यांसाठीचा वापर वार्षिक विशेष पाणीपट्टी आकारणीच्या ३० टक्के इतकी रक्कम.

३ ते ६ महिने पर्यंतचा वापर-वार्षिक विशेष पाणीपट्टी आकारणीच्या ५० टक्के इतकी सवलत

६ ते ९ महिन्यापर्यंत वापर-वार्षिक विशेष पाणीपट्टी आकारणीच्या ८० टक्के इतकी रक्कम.

९ महिन्यांपेक्षा जास्त परंतु-संपूर्ण वार्षिक विशेष पाणीपट्टी.

संपूर्ण वर्षाची साधारण पाणीपट्टी वसूल करण्यात येईल व ते कुटुंब संपूर्ण वार्षिक साधारण पाणीपट्टी भरण्यास, पात्र राहील.

(४.३) जी कुटुंबे सार्वजनिक नळ कोंडाळ्यामधून पाणी घरगुती वापरासाठी घेत असतील परंतु नंतर त्याच चालू वर्षात अशा कुटुंबांना खाजगी नळ जोडणी मंजूर करण्यात आली असेल अशा कुटुंबाकडून साधारण पाणीपट्टी त्या वर्षासाठी पहिल्या १ ते ६ महिन्यासाठी ५० टक्के व ६ महिन्यापेक्षा जादा कालावधी असल्यास ७५ टक्के इतकी देय राहील.

(४.४) सार्वजनिक नळ कोंडळ्यावर व त्याभोवती मोकळ्या जागी भांडी घासणे, धुणी धुणे, जनावरे धुणे अथवा त्यांना पाणी पाजणे, तसेच स्नान करणे, इत्यादी नळ कोंडळ्याच्या जागेवर केल्यास ती व्यक्ती सार्वजनिक मालमत्तेचा दुरुपयोग या कलमाखाली दंडास पात्र राहील. या नियमानुसार ठरवून दिलेला दंड वसूल करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीकडे राहील. अशा प्रसंगी करावयाचे दंडाचे दर प्रपत्र-४.४ मध्ये विहित करण्यात आले आहेत.

(४.५) सार्वजनिक नळ कोंडाळ्याव्दारे सकाळ-संध्याकाळ अशा दोन ठरवून दिलेल्या वेळेत पाणी सोडण्यात येईल. अशा सार्वजनिक नळ कोंडाळ्यामधून सर्वांनी क्रमाक्रमाने आवश्यक तेवढे पाणी भरावे. सार्वजनिक नळ कोंडाळ्यामधून पाणी घेणा-या व्यक्तीने अथवा कुटुंबाने सदर पाण्याचा गैरवापर केल्यास त्याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार ग्रामपंचायतीला या नियमांना धरुन राहतील. तसेच सार्वजनिक नळकोंडाळ्याचे नळ चालू ठेवून पाण्याचा अपव्यय एखाद्या व्यक्तीने हेतुपूर्वक केल्याचे आढळून आल्यास, त्या व्यक्तीविरुध्द दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार या नियमानुसार ग्रामपंचायतीस राहतील. तसेच सार्वजनिक नळकोंडाळ्यातून पुरविण्यात येणारे पाणी विकणे व विक्रीव्दारे पैसे जमा करणे हा या अधिनियमानुसार गुन्हा समजण्यात येईल.

(४.६) ज्या वाडीतील अथवा विवक्षित भागातील सार्वजनिक नळ कोंडाळ्याव्दारे पुरविण्यात येणा-या पाण्याचा दुरुपयोग सातत्याने होत असल्याचे अथवा निष्काळजी राहून त्याव्दारे सातत्याने पाणी वाया घालविले जात असेल, असे सार्वजनिक नळ कोंडाळे योग्य ते जाहीर प्रगटन, ग्रामपंचायत नोटीस फलकावर जाहीर करुन, १५ दिवसांनंतर तात्पुरते अगर कायमचे बंद ठेवण्याचा अधिकार ग्रामपंचातीस या नियमानुसार राहील.

(४.७) सार्वजनिक नळकोंडाळे ही सार्वजनिक मालमत्ता असल्याने, अशा नळ कोंडाळ्याची स्वच्छता राखणे ही जबाबदारी त्या त्या वाडीतील वा विभागातील नागरीकांची राहील. तसेच अशा सार्वजनिक नळकोंडाळ्याची हेतूपूर्वक मोडतोड करुन नुकसान करणा-या विरुध्द या नियमानुसार योग्य ती नुकसान भरपाई सदरील व्यक्तीकडून वसूल करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीस राहील.

(४.८) नियम (४.६) प्रमाणे ज्या वेळी एखादे नळकोंडाळे ग्रामपंचायतीने बंद केले असेल व ते त्या भागातील नागरिकांनी योग्य ती हमी देऊन पुन्हा चालू करण्याची लेखी विनंती ग्रामपंचायतीस केल्यास, अशा विनंती अर्जाचा विचार सदर नळकोंडाळे बंद केल्यापासून किमान एक महिन्याच्या कालावधीनंतर ग्रामपंचायतीच्या सर्वसाधारण सभेत करण्यात येईल. तसेच सदर बंद सार्वजनिक नळकोंडाळे दंडाची रक्कम वसूल झाल्यावर पुन्हा सुरु करण्यात येईल.

१२ महिन्यापेक्षा कमी वापर - १०० टक्के.

(१.४) एका खाजगी नळजोडणीवर ज्या व्यक्तीसाठी अथवा व्यवसायासाठी सदरील नळजोडणी ज्या जागेसाठी मंजूर करण्यात आली असेल त्या जागेत जास्तीत जास्त १२ एम.एम (१/२ इंच) व्यासाच्या दोन तोट्या पाणी वापरासाठी बसविता येतील. मात्र यापैकी एखादी तोटी उंचावरील पाण्याची टाकी भरण्यासाठी केल्यास सदर पाणी साठवून केलेल्या टाकीतून बाहेर पडणा-या नळावर १ पेक्षा जास्त तोट्या बसविल्यास त्यास ग्रामपंचायतीची हरकत राहणार नाही. मात्र अशा खाजगी टाकीतील पाणी हे स्वतःच्या कुटुंबासाठी अथवा नळजोडणीधारक व्यावसायिक असल्यास त्याला आपल्य व्यवसायासाठीच वापरता येईल. अशा टाकीतील पाण्याचा वापर इतर कुटुंबाना अथवा व्यावसायिक कुठल्याही प्रकरच्या आर्थिक फायद्यासाठी करणे हा गैरउपयोग समजला जाईल. व तो नळजोडणीधारक दंडास पात्र राहील.

(१.४.१) खाजगी नळजोडणीवर घरगुती विद्युतपंप बसवून तयाव्दारे गच्चीवरील अगर पोटमाळा व इतरत्र उंचावर साठवण टाकी बसवून त्यात पाणी घेणे नियमबाह्य राहील. या नियमांचा भंग करणा-या खाजगी नळ धारकाच्या विरुध्द दंडात्मक कारवाई करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीस राहील. मात्र खाजगी नळजोडणीतून उपलब्ध होणारे पाणी जमिनिवरील वा घरातील नळ मजल्यावरील हौदात जमा करुन तेथून ते उंचावरील साठवण टाकी वा हौदात विद्युत पंपाचे सहाय्याने चढविण्यास ग्रामपंचातीची त्यास हरकत राहणार नाही.

(१.५) खाजगी नळजोडणीधारकाने आपल्या जागेत नळास जोडलेल्या तोट्या शक्यतो पितळी, स्क्रूडाऊन पध्दतीच्या बसवून त्या सुव्यवस्थित ठेवाव्यात. अशा तोट्यामधून पाणी गळत राहणार नाही याची योग्य ती काळजी घेण्यात यावी.नादुरुस्त तोट्या तारित बदलून नवीन तोट्या आवश्यकतेप्रमाणे बसवाव्यात. कुठल्याही कारणास्तव पाण्याचा दुरुपयोग अथवा पाणी वाया घालविणे तसेच, आवश्यक नसेल तेव्हा व परगावी जातांना तोट्या व्यवस्थित बंद ठेवाव्यात. निष्काळजीपणे घरातील नळ उघडे ठेवून पाणी वाया घालविणे हे नियमबाह्य समजण्यात येईल. अशा खाजगी नळ धारकाच्या विरुध्द दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार या अधिनियमानुसार ग्रामपंचायतीस राहतील.

(१.६) एखाद्या घरात मालकाने भाडेकरु ठेवल्यास व त्या घरमालकाने स्वतःच्या कुटुंबाच्या वापरासाठी नळजोडणी घेतली असेल, अशा वेळी भाडेकरुंना स्वतःच्या खासगी नळजोडणीमधून पाणी भरु देता येईल. मात्र अशा भाडेकरु कुटूंबाची संख्या ग्रामपंचातीस लेखी कळवून तशी ग्रामपंचायतीकडून लेखी अनुमती मिळवावी.

(१.६.१) अशा प्रकरणात मुळ घरमालकाने भाडेकरु कुटूंबाकडून साधारण दराने पाणीपट्टी वसूल करुन ती ग्रामपंचायतीकडे विशेष पाणीपट्टीसोबत भरणा करावी. अशा प्रकरणात सार्वजनिक नळकोंडाळ्यामधून पाणी वापर करणा-या कुटुंबासाठी ठरवून दिलेल्या साधारण पाणीपट्टीचे दर व त्यांचे नियम संपूर्णपणे प्रत्येक भाडेकरु कुटुंबास लागू राहतील.

(१.७) जर एखाद्या खाजगी नळजोडणीधारकास स्वतःची खाजगी नळजोडणी बंद करावयाची असल, तेव्हा तशा अर्थाची नोटीस किमान एक महिना आधी ग्रामपंचायतीस देणे

बंधनकारक आहे. एक महिन्याची नोटीस मुदत संपताच ग्रामपंचायत सदरील नळजोडणी ग्रामपंचायत नळापासून तोडील.

(५.७.१) वरीलप्रमाणे नळजोडणी तोडल्यानंतर सदर खाजगी नळजोडणीधारकाकडून येणे असलेली विशेष पाणीपट्टी व इतर पाणी आकारणीची रक्कम खाजगी नळ धारकाने नळजोडणी घेतेवेळी भरलेल्या अनामत रकमेतून ग्रामपंचायत संपूर्ण वसूल करील व उर्वरीत अनामत रक्कम ज्याची त्यास परत करील.

(५.७.२) तसेच विशेष कारणासाठी या नियमांना अनुसरुन जर एखादी खाजगी नळजोडणी ग्रामपंचायतीने केली, तर त्या दिवसांनंतरचे विशेष पाणीपट्टीची थकबाकी व इतर पाणीपट्टी आकरणीची संपूर्ण येणे रक्कम त्याने भरलेली अनामत रक्कमेतून ग्रामपंचायत परस्पर वसूल करील व उर्वरीत अनामत रक्कम ज्याची त्यास परत करील

(५.८) वार्षिक विशेष पाणीपट्टी कर आकारणीचे मागणी पत्र ग्रामपंचायतीकडून खाजगी नळजोडणीधारकास तारखेपासून विशेष पाणीपट्टीची रक्कम तसेच इतर पाणीपट्टीची साधारण आकराणीची लागू असलेली वा केलेली रक्कम संबंधीत खाजगी नळजोडणीधारकाने (१५) पंधरा दिवसांचे आत ग्रामपंचायत कार्यालयात रोखीने भरणा करुन रीतसर पावती घ्यावी.

(५.८.१) वरीलप्रमाणे रीतसर आकरणीच्या रक्कमेचा १५ दिवसांचे आत भरणा न केल्यास ग्रामपंचायत त्या खाजगी नळ-कनेक्शनधारकास पुन्हा एकदाच नोटीसवजा स्मरणपत्र देऊन येणे रक्कम १५ दिवसांचे मुदतीत भरण्याविषयी मिळण्याची विनंती करील. त्याप्रमाणे येणे रक्कमेचा भरणा न केल्यास सदरील खाजगी नळजोडणी ग्रामपंचायत तात्पुरत्या वा कायमच्या ग्रामपंचायत नळावरुन तोडील. त्यास नळधारक स्वतः जबाबदार राहील.

(५.८.२) वरीलप्रमाणे खाजगी नळजोडणी ग्रामपंचायतीने तोडल्यास व त्यानंतर संबंधित नळजोडणीधारकाने संपूर्ण येणे पाणीपट्टीची रक्कम, त्यावरील दंडाच्या रकमेसह ग्रामपंचायत कार्यालयात नळजोडणी तोडल्या तारखेपासून एक महिन्याच्या आत भरल्यास व नळजोडणी पुन्हा सुरु करण्याबाबत लेखी विनंती अर्ज केल्यास ग्रामपंचायत सदरील नळजोडणी ग्रामपंचायत नळावार जोडून देईल. मात्र त्यासाठी नव्याने अटॅचमेंट फी विहित दराने रोख वसूल करील. तसेच ज्या कालावधीसाठी नळजोडणी तोडली असेल त्या कालावधीसाठी पाणीपट्टी दर आकरणी फी कुठलीच सवलत अथवा वजावट विचारात घेतली जाणार नाही.

(५.८.३) थकबाकीदार खाजगी नळधारक यांची नळजोडणी तोडल्यानंतर एक महिन्याच्या कालावधीनंतर जर खाजगी नळधारकास पुन्हा आपला नळ सुरु करण्यासाठी अर्ज करावयाचा असेल तेव्हा त्यास नव्याने खाजगी नळजोडणी अर्ज (नमुना नं.१) मध्येच सादर करावा लागेल व त्यासाठी ह्या नियमानुसार नळ कनेक्शन पुन्हा मंजूर करावे किंवा नाही याबाबत ग्रामपंचायत निर्णय घेईल. अर्जासोबत विहित केलेली अनामत रक्कम, अटॅचमेंट फी इत्यादी नव्याने भरणे आवश्यक राहील. त्यात कुठल्याही प्रकारे अर्जदारास सवलत मागता येणार नाही.

(५.९) खाजगी नळधारक हा ग्रामपंचायतीचा थकबाकीदार असल्यास, अशा नळधारकास थकबाकीची सर्व प्रकारची रक्कम ग्रामपंचायतीने लेखी मागणी केल्या तारखेपासून

जास्तीतजास्त एक महिन्यात भरावी लागेल, अन्यथा अशा खाजगी नळधारकाची खाजगी नळजोडणी तोडण्याचे सर्व अधिकार ग्रामपंचायतीस राहतील.

(५.१०) ज्या वेळी भाडेकरु तो रहात असलेल्या भाड्याच्या जागेत स्वतःच्या कुटुंबाच्या सोईसाठी स्वतंत्र खाजगी नळजोडणी घ्यावयाची असेल, त्यासाठी त्यास रीतसर विहित नमुना १ मध्ये अर्ज ग्रामपंचायतीकडे करता येईल. त्यासाठी खाजगी नळ कनेक्शनसाठी विहित केलेल्या सर्व अटी व नियम त्यास लागू होतील. मात्र अशा भाडेकरुने अर्जासोबत घरमालकाचे ना हरकत प्रमाणपत्र सोबत मूळ प्रतीत जोडणे आवश्यक राहील.

(६) __साधारण पाणीपट्टी :-

(६.१) ग्रामपंचायतीच्या ज्या क्षेत्रात नळ योजनेतून पाणी पुरवठा केला जात आहे, त्या भागातील क्षेत्रातील सर्व कुटुंबाकडून साधारण दराने वार्षिक पाणी पट्टी वसूल करण्याचे अधिकार ग्रामपंचायतीस या नियमानुसार राहतील. सदर सर्वसाधारण पाणीपट्टीची वार्षित आकारणीची देय रक्कम, प्रत्येक कुटुंबाने दरवर्षी १ ते ३० एप्रिल या काळात स्वतःहून ग्रामपंचायत कार्यालयात आणून भरावी.

(६.२) सर्वसाधारण वार्षिक पाणीपट्टी वसुलीमधून खालील व्यक्ती कुटुंबाना व व्यवसायांना या अधीनियमानुसार सूट अगर माफी देण्यात आली आहे.

(६.२.१) शारीरिकदृष्ट्या अपंग, अंध व्यक्ती जिला अन्य कौटुंबिक आधार नाही.

(६.२.२) सार्वजनिक व्यवसाय वा संस्था ज्या जनतेसाठी विनामुल्य भरीव व मान्य स्वरुपाची सेवा उपलब्ध करीत असेल अशा संस्था (उदा. विनाशुल्क वृध्दाश्रम इत्यादी).

(६.२.३) प्राथमिक शिक्षण संस्था, शाळा इत्यादी ज्या ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदेमार्फत चालविली जातात.

(६.२.४) जिल्हा परिषदेमार्फत चालविली जाणारी प्राथमिक वा इतर आरोग्य केंद्र (कर्मचारी निवासस्थाने वगळून).

(६.३) ज्या कुटुंबाकडे साधारण पाणीपट्टीची वार्षिक वर्गणी तीन महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी येणे असेल, व मागणी करुनही ती भरण्यास कुटुंबप्रमुख तयार नसेल, तेव्हा अशा कुटुंबप्रमुखाकडून देय असलेली साधारण पाणीपट्टीची वसूली करण्यासाठी कायदेशीर मार्ग हाताळण्यास ग्रामपंचायतीस संपूर्ण अधिकार राहील. त्यापोटी होणारा न्यायालय खर्च, वकीलाची फी, इत्यादीपोटी झालेला ग्रामपंचायतीचा खर्च अशा थकबाकीदार कुटुंब-प्रमुखाकडून पूर्णपणे वसूल करण्याचा अधिकार ग्रामपंचातीकडे राहील.

(६.३.१) मात्र अशा कुटुंबातील प्रमुख मिळवती व्यक्ती मयत झाल्यास व त्यानंतर जर एकत्र कुटुंबाचे मासिक उत्पन्न घटून ते दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाइतके झाले असेल तर अशा कुटुंबास साधारण पाणीपट्टीची थकबाकी रक्कम भरण्यास योग्य ती सवलत देणे अथवा ती पूर्णपणे माफ करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीस राहील.

(६.३.२) तसेच एखादे थकबाकीदार कुटुंब आकस्मिक नैसर्गिक आपत्तीमुळे सर्वस्वास मुकले असेल तर अशा कुटुंबाकडून साधारण पाणीपट्टीची रक्कम वसूल करणे अगर न करणे, याबाबत ग्रामपंचायतीस पूर्ण अधिकार राहतील.



Ws01/bhosale/pc-1

एच-1101(500-12-98)21-अ

(६.४) जी भाडेकरु कुटुंबे सार्वजनिक नळकोंड्यातून पाणी भरत असतील, अशा भाडेकरु कुटुंबांना साधारण पाणीपट्टीची ठरवून दिलेली वार्षिक रक्कम (परिशिष्ट-१) प्रमाणे ग्रामपंचायत कार्यालयात रोख स्वरुपात भरणे कायदेशीर समजण्यात येईल.

७) वार्षिक पाणीपट्टीचे कर आकारणीचा दर :-

(७.१) साधारण पाणीपट्टी व खाजगी नळजोडणीसाठीची विशेष पाणीपट्टी यांचे वार्षिक दर परिशिष्ट-१ मध्ये नमूद केले आहेत. त्यात दर दोन वर्षांनी सुधारणा करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीस राहील.

(७.२) परिशिष्ट १ मधील सर्व प्रकारचे वार्षिक पाणीपट्टीच्या दरात प्रत्येक दोन आर्थिक वर्षाच्या कालावधीसाठी सुधारित करण्याचा संपुर्ण अधिकार ग्रामपंचायतीच्या सर्व साधारण सभेस राहील. ह्यासाठी सुधारित पाणीपट्टीचे दर ते लागू करण्याचे किमान एक महिना आधी, ग्रामपंचायत कार्यालयाच्या सूचनाफलकावर नागरीकांच्या माहितीसाठी व त्यावरील त्यांच्या हरकती व सूचना करण्यासाठी प्रकाशित करण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीवर राहील. अशा हरकती व सूचना नागरीकांकडून प्रसिध्दीपासून १५ दिवसांच्या आत ग्रामपंचायत कार्यालयात लेखी स्वरुपात कराव्या लागतील. त्यानंतर आलेल्या लेखी हरकती वा सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत. वेळेत आलेल्या हरकती व सूचना स्वीकारण्याचा अगर फेटाळण्याचा संपूर्ण अधिकार ग्रामपंचायतीस राहील.

(८) नळ पाणीपुरवठा योजना ग्रामपंचायतीने गावातील जनसामान्यांच्या सार्वजनिक हितासाठी राबविली असून तिचा फायदा जास्तीत जास्त नागरिकांना व्हावा हे ग्रामपंचायतीचे कर्तव्य राहील. सदरील नळयोजना ही सार्वजनिक मालमत्ता असल्याने तिचे रक्षण करणे वा तिचे नुकसान होण्यापासून रक्षण करणे, ही ग्रामपंचायतीची तसेच प्रत्येक नागरिकाची जबाबदारी राहील. या मालमत्तेची नुकसानी जाणीवपूर्वक वा अनवधानाने कोणी केल्यास ती व्यक्ती नुकसानभरपाईची रक्कम भरण्यास नियमानुसार बांधील राहील अशा व्यक्तीची माहिती ग्रामपंचायतीस पुरविण्या-या कर्तव्यदक्ष नागरिकांना विशेष उल्लेख वा गौरव ग्रामपंचायत प्रसंगानुसार करील.

प्रपत्र-४.३

## ग्रामीण नळ पाणीपुरवठा नियम व अटी
## परिशिष्ट-१

साधारण वार्षिक पाणीपट्टी व खाजगी नळासाठी वार्षिक विशेष पाणीपट्टी वसुलीचे दर दर्शविणारा तक्ता :-

कालावधी

| क्र. १. | पाणीपट्टीचा प्रकार २. | वार्षिक आकारणीचा दर ३. | शेरा ४. |
|---|---|---|---|
| अ) | साधारण वार्षिक पाणीपट्टी सार्वजनिक नळकोंडाळ्यावरुन पाणी भरणाऱ्या प्रत्येक कुटुंबासाठी | प्रत्येक एकत्र कुटुंबास किमान रु.७५/- व कमाल रु.२५०/- व झोपडासाठी रु.१५/- | मात्र सहा महिन्यांकरता जर एखादे कुटुंब ग्रामपंचायत हद्दीबाहेर राहावयास गेले असेल तर अशा कुटुंबाचे बाबतीत निम्मी पाणी पट्टी माफ होऊ शकेल. कृपया नियम (५.३) व (५.४) पहावा. |
| ब) | विशेष पाणीपट्टीचा वार्षिक आकार(मीटरविरहित)<br>१) १/२ इंच (१२ एम.एम.) व्यासाची घरगुती वापरासाठी नळजोडणी. | प्रत्येक खाजगी नळजोडणी धारक एकत्र कुटुंबास (भाडे करु कुटुंब सोडून) किंवा प्रत्येक व्यक्तीस खाजगी नळजोडणीसाठी किमान रु. ३६०/- व कमाल रु.४५०/- | टिप- व्यावसायिक वापरासाठी खाजगी नळ जोडणी द्यावयाची असल्यास घरगूती वापरासाठी देण्यात आलेल्या त्या त्या आकाराच्या नळजोडणी साठी विहीत केलेल्या दराच्या दुप्पट दराने पाणीपट्टी आकारण्यात |

| | | | |
|---|---|---|---|
| | २) ३/४ (२० मि.मि.) व्यासाची नळजोडणी.<br>३) घरमालकाच्या घरगुती पाणी वापराच्या खाजगी नळजोडणी मधून पाणी भरणारी घर मालकाव्यतिरिक्त इतर कुटुंबे वा भाडेकरु कुटुंबे. | किमान रु.७५०/- व कमाल रु.१०००/- प्रत्येक कुटुंबास (सर्वसाधारण पाणीपट्टी दराने) | यावी.<br>कृपया नियम (५.६) पहावे. |
| क. | पाणीपट्टीचा प्रकार | वार्षिक आकारणीचा दर | शेरा. |
| क) | घरगुती नळजोडणी अटॅचमेंट फी (वापरतावा)<br><br>नळ जोडणी अनामत रक्कम | १२ मि.मी. (१/२ इंच) व्यास जोडणीसाठी रु.७५/-.<br>२० मि.मी. (३/४ इंच) व्यास जोडणीसाठी रु.१२०/-<br><br>घरगुती नळजोडणीसाठी रु.५००/- ते १०००/-<br>बिगर घरगुती/व्यावसायिक वापरासाठी रुपये १०००/- ते रुपये १५००/- | यामध्ये नळजोडणीसाठी पी.व्ही.सी. सॅडल अथवा बीडाच्या सॅडलची किंमत व ग्रामपंचायत नलिकेवर सॅडल होल यांचा समावेश होईल. |

(टिप :- वसूल करण्यात येणाऱ्या अनामत रकमेवर नळधारकास ग्रामपंचायतीकडून व्याजाची मागणी करता येणार नाही.)

## प्रपत्र – ४.४

सार्वजनिक नळकोंडाळ्यावर गैरवर्तन वा गैरवापर करण्यात लागू असलेली दंडाची रक्कम खालीलप्रमाणे निर्देशित केली आहे. दंडात्मक कारवाईचा वापर जनहितासाठी कठोरपणे केला जाईल.

| अ.क्र. | दंडाचे कारण | दंडाची रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १. | सार्वजनिक नळकोंडाळ्यावर भांडी घासणे, धुणी धुणं, अथवा नळाखाली बसून स्नान करणे की जेणेकरुन त्याचा इतरांना त्रास होत असेल अशी व्यक्ती. | रु.१०/- | अशा प्रसंगी वारवार सूचना देऊनही जी व्यक्ती नियमाचे उल्लघन हेतुपुरस्सर वा जाणीवपूर्वक करीत असल्याचे आढळून आल्यास अशा व्यक्तीस, अशा प्रकारचा दंड आकारण्यात यावा. |
| २. | सार्वजनिक नळकोंडाळ्याची मोडतोड करणे. | रु. २५ किमान रु.३०० कमाल | जास्तीत जास्त दंड आकारणीची रक्कम ग्रामपंचायतीची पाणी पुरवठा कमिटी बहुमताने ठरवील. |
| ३. | सार्वजनिक नळकोंडाळ्यावर जनावरे धुणे. | रु.१०/- | अ.क्र.१ प्रमाणे. |
| ४. | नळ कोंडाळ्याच्या कायदेशीर वापरास इतरांना प्रतिबंध करुन सार्वजनिक अशांतता निर्माण करणे. | रु.२५/- किमान | अ.क्र.२ प्रमाणे या व्यतिरिक्त अशा व्यक्तीविरुध्द कायदेशीर कारवाई करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीस व शासनास घटनेनुसार राहील. |
| ५. | खाजगी नळजोडणीवर परस्पर घरगुती विद्युत पंप बसवून पाणी खेचून ते उंचावरील टाकी अथवा हौदात पाणी साठविणे. | रु.२५०/- | नियम ५.४.१ मधील तरतुदी पाहाव्यात. |

…/46

प्रपत्र-४.५

ग्रामपंचायत कार्यालय

तारीख - - - - - - - - - - - - - - - - - - जिल्हा - - - - - - - - - - - - - -

## खाजगी नळधारकांची नोंदवही

| अ.क्र. | नळधारकाचे संपूर्ण नाव | घरांक | पेठ गल्ली | नळ जोडणी आकार | नळ जोडणी तारीख | नळजोडणी घरगुती/ बिगर घरगुती | प्रकार जलमापक यंत्रासहित/ विरहित | भाडेकरु कुटुंबाची संख्या (असल्यास) | अनामत रक्कम जमा | ग्रामसेवक सही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. |
| | | | | | | | | | | | |

टिप - १) नळजोडणी शुल्क व अनामत रक्कम यासाठी स्वतंत्र पावत्या देण्यात याव्यात.

२) नळजोडणी बंद केल्यास त्याचे कारणे, दिनांक, अनामत रक्कम परतावा वा जमा इत्यादी माहिती रकाना १२ मध्ये द्यावी.

३) अनामत रक्कम जमा पावती क्रमांक व दिनांक रकाना १० मध्ये रक्कमेचे खाली लिहावा.

ग्रामपंचायत कार्यालय

तालुका .................. जिल्हा .................. आर्थिक वर्ष ........ (१)

पाणीपट्टी महसूल जमा नमुना नोंदवही (२)

(३)

| क्र. | खाजगी नळ धारकाचे नाव | नळ जोडणी प्रकार | नळ जोडणी क्रमांक | अनामत रक्कम जमा (रु.) | वार्षिक पाणी पट्टी आकारणी दर (रु.) | वार्षिक आकारणी चालू वर्ष | मागील वर्ष थकबाकी | एकुण आकारणी चालूसाली | जमा रुपये: १ ली तिमाही | २ री तिमाही | ३ री तिमाही | ४ थी तिमाही | एकुण जमा वर्ष अखेर | वर्ष अखेर थकबाकी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११ | १२. | १३. | १४. | १५. | १६. |
| १. | श्री. सखाराम बापु नेनाने<br><br>वर्ष-<br>१९ ...<br>१९....<br>१९.... | घरगुती | ४' | १५०/- | १४८/- | १४८/- | ३६/- | १८४/- | ३६/-<br>पा.क्र.<br>तारीख | ७२/-<br>पा.क्र.<br>तारीख | ३६/-<br>पा.क्र.<br>तारीख | ३६/-<br>पा.क्र.<br>तारीख | १८४/- | नाही | |

टिप - १) सार्वजनिक नळकोंडाळ्यांचा वापर करणाऱ्या व साधारण दराने पाणीपट्टी रक्कम भरण्यास पात्र असलेल्या कुटुंबाची नोंद या नोंदवहीत करु नये अशा कुटुंबातील पाणीपट्टी रक्कम वसुली घरपट्टी वसुली देयकात अंतर्भूत करावी.

२) ग्रामीण भागात जलमापक यंत्राचा वापर गैरसोईचा व खर्चिक ठरत असल्याने जलमापक यंत्र बसविण्याबाबत शिफारस करण्यात येत नाही.

३) जलमापक यंत्र बसविले असल्यास रकाना (६) मध्ये दरहजारी लीटर्सचा पाणी दर नमूद करावा. तसेच, दर तिमाहीच्या अखेरीस जलवापराची नोंद करुन देयक आकारणी करावी व ती रकाना (७) मध्ये एका खाली एक अशी चारही तिमाहींची नमूद करावी.

४) या नोंदवहीच्या एका पानावर जास्तीतजास्त २ अगर ३ नळधारकांची नोंद घ्यावी. तसेच एका नोंदवहीचा वापर तीन वर्षांसाठी करावा. नोंदवहीची छपाई करतांना तशी तरतुद करण्यात यावी.

Ws-01/bhosale-1/psl

48



1.0

## प्रपत्र - ४.७

## घरगुती नळजोडणीच्या अर्जाचा नमुना

ग्रामपंचायत कार्यालय

मु.पो. - - - - - - - - - - - - तालुका - - - - - - - - - - - अर्ज क्र. - - - - - - - - - - -
जिल्हा - - - - - - - - - - - - तारीख - - - - - - - - - - -

ग्रामसेवक सही

### घरगुती नळजोडणीसाठी अर्ज

प्रती,
मा.सरपंच,
- - - - - - - ग्रामपंचायत,
मु.पो. - - - - - - - - - - -,
तालुका - - - - - - - - - - जिल्हा. - - - - - - - - - -

अर्जदार :- श्री./श्रीमती - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -
राहणार घर क्र. - - - - - - - गल्ली - - - - - - - - - -

विनंती अर्ज करते/करतो की, - - - - - - - - - ग्रामीण नळपाणी पुरवठा अधिनियमांच्या अधीन राहून मला - - - - - - - - - - ग्रामपंचायत हद्दीतील माझे स्वतःचे/भाड्याचे घर क्र. - - गल्ली - - - - - - वस्ती - - - - - येथे घरगुती पाणी वापरासाठी नळजोडणी माझ्या स्वतंत्र कुटुंबाच्या वापरासाठी खालील तपशीलाप्रमाणे मंजूर करावे, ही. विनंती.

(अ) नळ जोडणीचा आकार : १२ मि.मी. व्यास/२० मि.मी.व्यास
(ब) पाणी वापराचा तपशील : (१) घरगुती वापरासाठी कुटुंबाची संख्या (भाडेकरुंच्या संख्येसह)
(२) बिगर घरगुती वापरासाठी व्यवसायाचे स्वरुप
(क) बसविण्यात येणा-या नळतोट्याची संख्या.
(ड) जलमापक यंत्रासहित/यंत्रवरहित दोन पेक्षा अधिक नळतोट्या बसविल्यास नियमानुसार अधिक नळतोट्यांचा जादा वार्षिक दर आकरणी रक्कम देण्यात तयार आहे. (जलमापक यंत्र बसविल्यास अट शिथिल)

नळजोडणी मंजूर झाल्यास नळजोडणी आकारणीची रक्कम नियमानुसार भरण्यास मी तयार आहे. नळजोडणीचे काम अनुज्ञाप्राप्त अनुमती प्लंबरकडून करुन घेण्याचे बंधन माझ्यावर राहील.

खालील अटींची पूर्तता करण्यास मी बांधील आहे.

१) पाणीपट्टी आकारणी देयकाची रक्कम ग्रामपंचायतीच्या मागणी दिनांकापासून १५ दिवसांच्या आत भरण्यास तयार आहे. तसेच विलंब शुल्काची मागणी झाल्यास ती रक्कम भरणे माझ्यावर बंधनकारक राहील.

२) भाडेकरुकडील पाणीपट्टीची रक्कम वसूल करण्याची व तिचा भरणा ग्रामपंचायतीकडे करण्याचे बंधन माझ्यावर राहील.

३) सांडपाणी ग्रामपंचायत गटारापर्यंत वाहून नेण्याची व्यवस्था मी माझ्या खर्चाने करण्यास तयार आहे.

४) नळ पाणीपुरवठा अधिनियमातील संपूर्ण तरतुदी मी वाचल्या असून त्या मला मान्य असून त्या मला बंधनकारक राहतील. तसेच प्रचलित अधिनियमात तसेच पाणीपट्टी दरात सुधारणा करण्याचे संपूर्ण अधिकार आपल्या ग्रामपंचायतीस आहेत. हे मला मान्य असून ते माझ्यावर बंधनकारक राहतील.

तारीख
ठिकाण

अर्जदाराची सही
संपूर्ण नांव

(ग्रामपंचायतीने भरावयाची माहीती)

- - - - - - - - - - - - - - - ग्रामपंचायतीचे नोंदणी रजिस्टरमध्ये दिनांक - - - - - - - - - रोजी नोंद केली आहे.

दिनांक

ग्रामसेवकाची सही

वरील विनंती अर्ज ग्रामपंचायत पाणी पुरवठा कमिटी अध्यक्ष यांना दिनांक - - - - - - - रोजी खालीलप्रमाणे मंजूर केला आहे.

१) नळजोडणीचा आकार
२) बसविण्यात येणा-या नळतोट्यांची संख्या
३) पाणी वापर करणा-या कुटुंबाची एकुण संख्या (घरमालक, भाडेकरु कुटुबांची संख्या)
४) विशेष पाणी पट्टीची आकारणी वार्षिक दर
५) भरावयाची एकुण अनामत रक्कम रुपये
६) नळजोडणी शुल्क रक्कम (ना परतावा) रुपये.

सही/-
ग्रामसेवक

सही/-
अध्यक्ष, पाणीपुरवठा कमिटी

अर्जदारास मंजूरी कळविण्यात आली असे दि. - - - - - - - - - चे पत्र क्र. - - - - - - -
खालील रक्कम अर्जदाराकडून वसूल करण्यात आली आहे.
अनामत रक्कम रुपये
नळजोडणी रुपये
खर्च आकारणी
एकुण रुपये

पावती क्र. - - - - - - - - - - - - - - - - दिनांक - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -
नळजोडणीचा प्रत्यक्ष दिनांक - - - - - - - - - - - - - - -
नळजोडणी क्रमांक - - - - - - - - - - - - - -
(पुस्तकातील नोंदीनुसार)
अर्जपूर्तीनंतर अर्ज नळजोडणी रेकॉर्ड
फाईलमध्ये मूळ प्रतीत ठेवला आहे.

दिनांक

सही/-
ग्रामसेवक

प्रपत्र-४.८

विविध आकाराच्या वितरण नलिकेत किती नळजोडण्या मंजूर करण्यात याची माहिती दर्शविणारा तक्ता

विविध व्यास उपनलिका व नळजोडणी संख्या.

| वितरण नलिकेचा व्यास | १०० मि.मी. | ९० मि.मी. | ८० मि.मी. | ६५ मि.मी. | ५० मि.मी. | ४० मि.मी. | ३२ मि.मी. | २५ मि.मी. | २० मि.मी. | १५ मि.मी. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १०० | १ | १ | २ | ३ | ६ | १० | १७ | ३२ | ५३ | ११३ |
| ९० | — | १ | १ | २ | ४ | ८ | २३ | २५ | ४३ | ८८ |
| ८० | — |  | १ | २ | ३ | ६ | १० | १८ | ३२ | ६६ |
| ६५ | — |  | — | १ | २ | ३ | ६ | ११ | १९ | ३९ |
| ५० | — | — | — | — | १ | २ | ३ | ६ | १० | २० |
| ४० | — | — | — | — | — | १ | २३ | ३ | ६ | १२ |
| ३२ | — | — | — | — | — | — | १ | २ | ३ | ७ |
| २५ | — | — | — | — | — | — | १ | २ | ३ | ४ |
| २० | — | — | — | — | — | — | — | — | १ | २ |
| १५ | — | — | — | — | — | — | — | — | — | १ |

52

Ws-01/bhosale-1/pol

एफ-1101(500-12-96)26-अ.

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम -
साध्या विहिरी, विंधण विहिरी आणि नळ
योजना यांची देखभाल व दुरुस्ती

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
निर्णय क्र.ग्रापापु-१०९८/प्र.क्र.२११/पापु-०७,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक : १४ डिसेंबर,१९९८.

संदर्भ - (१) शासन आदेश, ग्राम विकास विभाग, क्र.ग्रापापु-१०८५/सीआर-७८०३/३९, दिनांक १७ नोव्हेंबर,१९८६.
(२) शासन पत्र, ग्राम विकास विभाग, क्र.ग्रापापु-१०८५/सीआर-७८०३/३९, दिनांक १७ नोव्हेंबर,१९८६.
(३) शासन पत्र, ग्राम विकास विभाग, क्र.ग्रापापु-१०८९/सीआर-८९९९/३९, दिनांक ५ जानेवारी,१९८९.
(४) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग, क्र.ग्रापापु-१०८७/सीआर-८५२३/३९, दिनांक ३१ जानेवारी,१९८९.
(५) शासन पत्र, ग्राम विकास विभाग, क्र.ग्रापापु-१०८९/सीआर-२६/३९-अ, दिनांक २७ फेब्रुवारी,१९८९.
(६) शासन पत्र, ग्राम विकास विभाग, क्र.ग्रापापु-१०८९/सीआर-६१/३९-अ, दिनांक १२ फेब्रुवारी,१९९०.
(७) शासन पत्र, ग्राम विकास विभाग, क्र.ग्रापापु-१०९०/सीआर-६७/३९-अ, दिनांक ३ मार्च,१९९०
(८) शासन पत्र, ग्राम विकास विभाग, क्र.ग्रापापु-१०९०/सीआर-५३०/३९-अ, दिनांक ५ फेब्रुवारी,१९९१.
(९) शासन पत्र, ग्राम विकास विभाग, क्र.ग्रापापु-१०९१/सीआर-४७२/३९-अ, दिनांक १६ एप्रिल,१९९१.
(१०) शासन पत्र, ग्राम विकास विभाग, क्र.ग्रापापु-१०९१/सीआर-२०२/३९-अ, दिनांक ३ मे,१९९१.
(११) शासन परिपत्रक, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र.ग्रापापु-१०९३/सीआर-८३१/३९-अ, दिनांक ११ जानेवारी,१९९४.
(१२) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र.ग्रापापु-१०९३/सीआर-८१७/३९-अ, दिनांक २२ मार्च,१९९४.
(१३) शासन पत्र, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र.ग्रापापु-१०९४/सीआर-८९३/३९-अ, दिनांक ७ जून,१९९४.
(१४) शासन परिपत्रक, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र.ग्रापापु-१०९३/सीआर-४४८/३९-अ, दिनांक १५ सप्टेंबर,१९९४.

(१५) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र.ग्रापापु-१०९३/ सीआर-४४८/३९-अ, दिनांक २७ सप्टेंबर,१९९४.

(१६) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र.ग्रापापु-१०९५/ सीआर-१०८२/३९-अ, दिनांक १ डिसेंबर,१९९५.

(१७) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.ग्रापापु-१०९५/सीआर-१०९५/ ३९-अ, दिनांक ९ जानेवारी,१९९६.

(१८) शासन परिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.ग्रापापु-१०९६/ सीआर-१२०७/पापु-०७, दिनांक २३ ऑगस्ट, १९९६.

(१९) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.ग्रापापु-१०९६/ सीआर-१२५६/पापु-०७, दिनांक ११ ऑक्टोबर,१९९६.

(२०) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.ग्रापापु-१०९६/ सीआर-१२८०/पापु-०७, दिनांक २८ नोव्हेंबर, १९९६.

(२१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.ग्रापापु-१०९८/ सीआर-१७६/पापु-०७, दिनांक २४ ऑगस्ट, १९९८.

**प्रस्तावना :-**

संदर्भाधीन अ.क्र.(१) वरिल आदेशांनुसार, जिल्हा पातळीवर, ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या विविध पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी निधी आस्थापित करण्याचे आदेश काढण्यात आले होते. या निधीत जिल्हा परिषदेच्या प्रतिवर्षीच्या उत्पन्नापैकी विशिष्ठ बाबींवरील एकुण उत्पन्नाच्या किमान २० टक्के रक्कम आणि सदर निधीसाठी शासन प्रतिवर्षी मंजुर करील ती रक्कम भरावयाचेहि आदेशित करण्यात आले आहे. पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी उक्त निधीतून द्यावयाच्या सहाय्याबाबत जिल्हा परिषदांनी परिस्थितीनुरुप नियम तयार करावेत, अशा सूचना संदर्भाधिन अ.क्र.(२) वरील पत्रानुसार देण्यात आले आहेत. तदनंतरच्या कालावधीत पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी अधिक निधी उपलब्ध व्हावा व या निधीवर सर्वतोपरी ताण पडू नये म्हणून पाणी पट्टीची वसुली मोठ्या प्रमाणावर व्हावी यासाठी वेळोवेळी सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तसेच योजनांची देखभाल व दुरुस्ती योग्य प्रकारे व परिणामकारकरित्या व्हावी यासाठी अनेक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. कार्यान्वयन यंत्रणांच्या सोयीसाठी विषयाधीन सर्व सूचना एकत्रित करणे, शासनाच्या विचाराधीन होते.

**निर्णय** - संदर्भाधीन सर्व सूचना अधिक्रमित करुन हे एकत्रित आदेश काढण्यात येत आहे.

(१) जिल्हास्तरीय देखभाल व दुरुस्ती निधीत राज्य शासनाकडून देण्यात येणा-या अनुदानात वाढ :-

जिल्ह्यातील नळ योजना, विंधण विहिरी व साध्या विहिरी या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची, देखभाल व दुरुस्ती योग्य प्रकारे व वेळीच होण्यासाठी हातभार लागावा म्हणून प्रत्येक जिल्हास्तरावर देखभाल व दुरुस्ती निधी स्थापन करण्यात आला आहे. सदर निधीमध्ये राज्य शासनाकडुन ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या राज्य तरतुदीच्या ५ टक्के निधी दरवर्षी देण्यात येत होता. राज्यातील योजनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली असून योजनांच्या



Ws01/bhosale/pc-1

एच-1101(500-12-98)1-अ

देखभाल व दुरुस्तीवर स्थानिक स्वराज्य संस्थांना मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो व यासाठी जास्त प्रमाणात निधीची गरज भासते, जिल्हयातील पाणी पुरवठा योजनांची देखभाल व दुरुस्ती योग्य प्रकारे होण्यासाठी जिल्हास्तरावर अधिक निधी उपलब्ध व्हावा, याकरिता शासनाने संदर्भित अ.क्र.१४ अन्वये असा निर्णय घेतला आहे की, ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत राज्य स्तरावर करण्यात येत असलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम योजनांतर्गत तरतूदीच्या १० टक्के निधी जिल्हास्तरीय देखभाल व दुरुस्ती निधीत दरवर्षी देण्यात यावा, सदर निर्णयाची अंमलबजावणी सन १९९६-९७ या अर्थिक वर्षापासुन करण्यात यावी. याशिवाय, संदर्भाधीन अ.क्र. (४) वरील निर्णयानुसार केंद्रशासन पुरस्कृत वर्धित वेग पाणी पुरवठा कार्यक्रमाखाली मंजुर करण्यात येत असलेल्या अनुदानाच्या १० टक्के रक्कम प्रतिवर्षी उक्त निधीसाठी शासन जिल्हा परिषदांना उपलब्ध करील, मात्र त्याकरिता जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे वर्धित वेग पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत उक्त निधीमध्ये जमा होणा-या रकमेचे लेखे स्वतंत्र ठेऊन त्यासंबंधीचे मागील वर्षाच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र शासनाकडे पाठविण्याकरिता आताच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडे दरवर्षी ३० एप्रिल पूर्वी सादर करतील.

(२) **जिल्हास्तरीय देखभाल व दुरुस्ती निधीत जिल्हा परिषदेने जमा करावयाची रक्कम :-** वर उल्लेखित जिल्हास्तरीय देखभाल व दुरुस्ती निधीमध्ये केंद्र शासन व राज्य शासनाकडून कांही प्रमाणात निधी दिला जातो व जिल्हा परिषदांनी त्यांच्या प्रतिवर्षीच्या उत्पन्नापैकी विशिष्ठ बाबींवरील एकूण उत्पन्नाच्या किमान २० टक्के रक्कम सदर निधीत टाकणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. जिल्हयातील पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी जास्त प्रमाणात निधी उपलब्ध व्हावा याकरीता सदर २० टक्के रक्कम देखभाल व दुरुस्ती निधीत भरण्यासाठी जिल्हा परिषदेचे एकूण उत्पन्न काढताना, एकूण उत्पन्नात पिण्याच्या पाण्यावरील पाणी पट्टी व त्याअनुषंगाने वसूल केलेल्या रक्कमेचा अंतर्भाव करु नये पिण्याच्या पाण्यावरील पाणी पट्टी व त्या अनुषंगाने जमा होणारी रक्कम वगळून जो उर्वरित निधी असेल त्याच्या २० टक्के रक्कम जिल्हास्तरीय देखभाल व दुरुस्ती निधीत जमा करावी,त्याचप्रमाणे पिण्याच्या पाण्यासंबधीतील पाणी पट्टी व त्या अनुषंगाने जमा होणारी संपुर्ण रक्कम व विंधण विहिरींच्या देखभाल व दुरुस्तीकरिता ग्रामपंचायतीकडून वसूल करण्यात येणारी वर्गणी ही संपूर्ण रक्कम जिल्हास्तरीय देखभाल व दुरुस्ती निधीत जमा करावी.

(३) जिल्हातील प्रादेशिक नळ योजनांच्या बाबतीत पाणी पट्टीची ८० टक्के रक्कम जिल्हा परिषदेकडे व उर्वरीत २० टक्के रक्कम ग्राम पंचायतीकडे तर स्वतंत्र योजनांच्या बाबतीत २० टक्के जिल्हापरिषदेकडे व ८० टक्के रक्कम ग्रामपंचायतीकडे योजनांच्या देखभाल व दुरुस्तीकरीता याबाबतच्या संबंधीत निधीत ठेवण्यात यावी. प्रादेशिक नळ योजनांच्या बाबतीत गावाला पाणी पुरवठा करणा-या टाकीजवळ स्वतंत्र मीटर बसवून, गावास विहीत प्रमाणात पाणी पुरवठा केला जात आहे याची खात्री झाल्यावरच, जिल्हा परिषदेने संबंधित ग्राम पंचायतीकडून एकूण वार्षिक पाणीपट्टीच्या ८० टक्के रक्कम वसूल करावी. मात्र, मिटरनुसार गावास विहित प्रमाणापेक्षा कमी पाणी पुरवठा झाल्यास पाणीपट्टीची रक्कम ही ग्राम पंचायतीकडून त्या प्रमाणात कमी घेण्यात यावी.

(४) योजनांच्या देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी :-

अ) प्रादेशिक योजनांच्या बाबतीत ही जबाबदारी पिण्याच्या पाण्याच्या उद्‌भवापासून ते पाणी वितरणाच्या टप्प्यापर्यंत जिल्हा परिषद किंवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची राहील,तर पाणी वितरणाच्या टप्प्यापासून ते गावांतर्गत पाणी पुरवठ्याची जबाबदारी संबंधीत ग्राम पंचायतीची राहील.

ब) स्वतंत्र नळ योजनेच्या बाबतीत तसेच विंधण विहिरी व साध्या विहिरीच्या देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी संबंधीत ग्रामपंचायतीची राहील.

(५) ग्राम पाणी पुरवठा कर्मचा-यांचे प्रशिक्षण :- गावातील योजनेची दुरुस्ती वेळीच व स्थानिकरित्या व्हावी यासाठी ग्राम पंचायतीनी त्यांचेकडील २ कर्मचा-यांना योजनेच्या देखभाल व दुरुस्तीचे प्रशिक्षण द्यावे.

(६) नियंत्रण :- जिल्हास्तरावरील देखभाल व दुरुस्ती निधीवर जिल्हा पाणी पुरवठा अधिका-याचे नियंत्रण राहील. जिल्ह्यातील सर्व पूर्ण झालेल्या पाणी पुरवठा योजनांची वक्तशीर व सुयोग्यरित्या देखभाल व्हावी, याबाबत जिल्हा पाणी पुरवठा समितिने दक्षता घ्यावी. यासाठी सर्व पूर्ण व कार्यान्वित झालेल्या पाणी पुरवठा योजनांबाबत समितीने आढावा घ्यावा व आवश्यकते नुसार त्यांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी सूचनावजा शिफारशी कराव्यात असाच आढावा कार्यकारी समितीने त्यांच्या बैठकीत दरमहा घ्यावा.

(७) सर्वेक्षण :- शासनाने जनतेला पिण्याचे पाणी योग्य प्रमाणात व शुध्द स्वरुपात मिळावे म्हणून गावोगावी निरनिराळ्या प्रकारच्या पाणी पुरवठा योजना पूर्ण केलेल्या आहेत. या योजनांची विशेषत्वाने नळ पाणी पुरवठा योजनांची नियमित पहाणी करुन वेळीच दुरुस्ती व देखभाल करण्यात येत नसल्यामुळे, सदर योजनांचा अपेक्षीत लाभ जनतेला मिळत नाही असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. सर्व पाणी पुरवठा योजना सक्षम व चालू स्थितीत राहाव्यात म्हणून त्यांची नियमितरित्या तपासणी करुन आवश्यकतेनुसार त्यांची वेळीच दुरुस्ती करणे आवश्यक आहे. याकरीता पुर्ण झालेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे सर्वेक्षण दरवर्षी ऑक्टोंबर ते जानेवारी या कालावधीत करण्यात यावे व आवश्यकतेनुसार त्यांची वेळीच दुरुस्ती करण्याकरिता शासन परिपत्रक, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांक ग्रापापु-१०९३/ सीआर-८३१/३९-अ, दिनांक ११ जानेवारी,१९९४ नुसार विहीत करण्यात आलेल्या कार्यपध्दतीचे सोबत जोडलेल्या विवरणपत्र (१) प्रमाणे सर्व संबधितांनी काटेकोर पालन करावे, तसेच उक्त सोबतच्या परिपत्रकासमवेत विहित केलेल्या विविध प्रपत्रांमध्ये तपासणी अहवालाची आवश्यक माहीती भरुन संबंधित यंत्रणेकडे/अधिका-यांकडे नियमितपणे सादर करावी.

(८) दुरुस्ती कामाना मंजुरी देण्याचे अधिकार :-

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या दुरुस्तीच्या कामाना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हा परिषदेच्या समित्या/अधिकारी यांना, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता, १९६८ नुसार, खाली निर्देशिल्याप्रमाणे आहेत. त्यानुसार दुरुस्तीचा कार्यक्रम हाती घेण्यात यावा.

| अ.क्र | जिल्हा परिषदेचे अधिकारी/समिती | खर्च मंजूरीची मर्यादा |
|---|---|---|
| ०१. | उप अभियंता | रुपये २०,०००/- |
| ०२. | कार्यकारी अभियंता | रुपये ५०,०००/- |
| ०३. | मुख्य कार्यकारी अधिकारी | रुपये १,००,०००/- |
| ०४. | विषय समित्यांचे सभापती | रुपये २,००,०००/- |
| ०५. | विषय समिती | रुपये ३,५०,०००/- |
| ०६. | स्थायी समिती | रुपये ५,००,०००/- |
| ०७. | जिल्हा परिषद | रुपये ५,००,०००/-पेक्षा जास्त |

**(९) वर्धित वेग पाणी पुरवठा कार्यक्रमाखालील पुर्ण झालेल्या अहस्तांरीत योजनांच्या दुरुस्ती वरील खर्च :-**

केंद्र पुरस्कृत वर्धित वेग पाणी पुरवठा कार्यक्रमाखाली पुर्ण करण्यात आलेल्या परंतू स्थानिक संस्थांनी हस्तांतरीत करुन न घेतलेल्या राज्यस्तरीय नळ योजनांची देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला करावी लागते. त्यासाठी प्राधिकरणाला शासन वेगळे अनुदान मंजुर करीत नाही. केंद्र पुरस्कृत वर्धित वेग पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत मागील लगतच्या आर्थिक वर्षाअखेरपर्यंत प्रत्येक जिल्हयात पुर्ण करण्यात आलेल्या नळ योजनांच्या एकुण किमंतीच्या प्रमाणात उक्त कार्यक्रमांतर्गत देखभाल व दुरुस्तीसाठी राखून ठेवलेल्या १० टक्के निधीचे वाटप सर्व जिल्ह्यासाठी करण्यात येते. प्रत्येक जिल्हास देखभाल व दुरुस्ती निधीसाठी वर्धित वेग पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत अनुदानातून अनुज्ञेय असलेल्या रक्कमेतील उक्त कार्यक्रमांतर्गत प्राधिकरणाने पुर्ण केलेल्या परंतू जिल्हा परिषद/ग्राम पंचायतींनी ताब्यात न घेतलेल्या नळ योजनांच्या किमंतीच्या प्रमाणात निधी प्राधिकरणाचा हिस्सा म्हणून प्राधिकरणास अनुज्ञेय राहील. प्राधिकरणास अनुज्ञेय सदर अनुदान पुढील आदेश होईपावेतो संबंधित जिल्हा परिषदेच्या देखभाल व दुरुस्ती निधीत जमा करण्यासाठी जिल्हा परिषदेला वितरीत करण्यात यावे. जिल्हा परिषदेच्या देखभाल व दुरुस्ती निधीत जमा झाल्यावर, प्राधिकरणास अनुज्ञेय असलेली रक्कम संबंधित जिल्हाच्या अधिक्षक अभियंत्यांकडे वर्ग करण्यात यावी. अधीक्षक अभियंत्यांनी सदर रक्कम स्वतंत्र खात्यात जमा करुन तिचा विनियोग वर्धित वेग पाणी पुरवठा कार्यक्रमाखाली पुर्ण केलेल्या व प्राधिकरण चालवीत असलेल्या अहस्तांतरीत पुर्ण योजनांच्या देखभाल व दुरुस्तीवरच करावा.

देखभाल व दुरुस्ती निधीत वर्धित वेग पाणी पुरवठा कार्यक्रमाखाली देण्यात येणारे अनुदान जमा करण्यात आलेल्या रक्कमेतून प्राधिकरणाने सदर कार्यक्रमाखाली पुर्ण केलेल्या परंतु स्थानिक संस्थानी ताब्यात न घेतल्या योजनांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी प्राधिकरणाकडे

वर्ग करण्याबाबतचे सदर आदेश महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम २६१ (१) खाली देण्यात आले आहेत.

**(१०) नळ योजनांची विशेष दुरुस्ती व पुनर्वसन यांत अंतर्भूत होणारी कामे :-**

(अ) नळ योजनांची विशेष दुरुस्ती यात योजनेतील निकामी/नादुरुस्त झालेले पंपिंग मशिनरी बदलणे/दुरुस्त करणे किंवा योग्य त्या क्षमतेची पंपिंग मशिनरी बसविणे, ऊर्ध्वनलिका/गुरुत्वनलिका इत्यादीमधील निकामी झालेली/फुटलेली पाईपलाईन बदलणे किंवा पुरेसा पाणी पुरवठा होण्याच्या दृष्टीकोनातून योग्य व्यासाची पाईप लाईन टाकणे, साठवण टाकीची गळती दुरुस्ती करणे किंवा साठवण टाकीचे बळकटीकरण करणे किंवा योग्य दाबाने/पुरेसा पाणी पुरवठा होण्यासाठी नवीन साठवण टाकी बांधणे, वितरण व्यवस्थेतील निकामी झालेली पाईप बदलणे किंवा मोठ्या व्यासाचे पाईप टाकणे किंवा ज्या ठिकाणी वितरण व्यवस्था नाही, त्या ठिकाणी वितरण व्यवस्था टाकणे, उद्भवाचे पाणी कमी झाल्यास उद्भवाची खोली वाढविणे किंवा इनवेल (उभे/आडवे) बोअर घेवून, उद्भवातील पाण्याचे प्रमाण वाढविणे किंवा नवीन उद्भव आवश्यक उपांगासह हाती घेणे, वितरण व्यवस्थेतील नळ कोंडाळी दुरुस्त करणे किंवा नवीन नळ कोंडाळी बांधणे, ज्या ठिकाणी विद्युत दाबाची अडचण असेल त्या ठिकाणी स्वतंत्र ट्रान्सफॉर्मर बसविणे इत्यादी कामे मोडतील. नळयोजनेचे पुनर्वसन करणे यांत जुन्या योजनेतील काही उपांगे नादुरुस्त झाल्यामुळे त्यांची दुरुस्ती करणे किंवा नवीन उपांगे घेऊन, योजना सक्षमपणे कार्यान्वित करणे इत्यादींचा समावेश होईल.

**(ब) विशेष दुरुस्ती व पुनर्वसन करण्याकरिता करावयाची कार्यवाही :-**

(१) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.ग्रापापु-१०९३/सीआर-८३१/३९-अ, दिनांक ११ जानेवारी,१९९४ अन्वये जिल्ह्यातील सर्व पुर्ण व कार्यान्वित पाणी पुरवठा साधनांचे नियमित सर्वेक्षण करण्याबाबतचे आदेश दिलेले आहेत.सदर सर्वेक्षण दरवर्षी सर्वसाधारणपणे ऑक्टोबर महिन्यात करावयाचे असून, सर्वेक्षणातील माहितीच्या आधारे सोबतच्या प्रपत्र १:४, १:५ व १:६ मधील माहितीचा विचार करुन कोणकोणत्या गावात/वाड्यात अस्तित्वात असलेल्या नळ योजनांची दुरुस्ती करुन पाणी पुरवठा चालू करता येईल हे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यांनी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याशी विचार विनिमय करुन ठरवावे.

(२) त्यानंतर ज्या गावात/वाड्यात नळ योजनांची विशेष दुरुस्ती वा पुनर्वसन करावयाचे आहे, त्याचा वार्षिक कृती आराखडा तयार करुन त्यास जिल्हा पाणी पुरवठा समितीची मान्यता घेण्यात यावी.

(३) प्रथमत नळ योजनांची विशेष दुरुस्ती / पुनर्वसन जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून घेता येईल किंवा कसे हे पडताळून पाहण्यात यावे व जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीत, निधी उपलब्ध असल्यास त्यातून कामे घेण्यात यावीत.

(४) जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून जेवढ्या नळ योजनाची विशेष दुरुस्ती/पुनर्वसन करणे शक्य आहे. त्याचे नियोजन केल्यानंतर इतर नळ योजनांची विशेष दुरस्ती वा पुनर्वसनाचे प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी प्रशासकीय मान्यतेसाठी विहित सक्षम प्राधिका-याकडे पाठवावेत, अशा प्रकारे प्रस्ताव पाठवितांना सदर काम जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून घेणे जिल्हा परिषदेला निधी अभावी



एच-1101(500-12-98)3-क.

शक्य नाही व कामाचा अंतर्भाव टंचाई कृती आराखड्यात करण्यात आलेला नाही, असे प्रमाणपत्र सोबतच्या प्रपत्र २ प्रमाणे प्रस्तावासोबत जोडावे. संबंधित सक्षम प्राधिका-याने जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीत सर्व मार्गांनी उपलब्ध होणारा निधी, त्यातून करावयाची कामे, त्यांचा अंदाजित खर्च व टंचाई निवारण यासाठी उपलब्ध निधी यामधून सदर कामे घेण्यास वाव नाही, याची सविस्तर माहिती घेतल्यानंतर व याची खात्री पटवुन घेतल्यानंतर अशा दुरुस्तीच्या/पुनर्वसनाच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता द्यावी.

**(क) प्रस्ताव मंजुर करण्यासाठी पूर्तता करावयाच्या बाबी :-**

नळ योजनांची विशेष दुरुस्ती वा पुनर्वसनाचे प्रस्ताव मंजुर करताना प्रस्तावासोबत खालील मुद्यांची पूर्तता झालेली आहे, किंवा कसे याकडे संबंधितांनी विशेष लक्ष द्यावे.

(१) संबंधित उपअभियंता,पाणी पुरवठा उपविभाग, जिल्हा परिषद/महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम उपविभाग यांनी स्वतः निरीक्षण करुन द्यावयाचा स्थळ निरीक्षण अहवाल.

(२) विशेष दुरुस्तीची/पुनर्वसनाची सविस्तर अंदाजपत्रके (प्रस्तावातील प्रस्तावित खर्च याजवी आहे किंवा कसे याबाबतची खात्री अंदाजपत्रकाची पडताळणी करुन करणे आवश्यक आहे.)

(३) विशेष दुरुस्ती वा पुनर्वसन कोणत्या परिस्थितीमुळे उद्भवले त्याची कारणमिमांसा देण्यात यावी. उदा. कामाच्या अंमलबजावणीमध्ये उणीवा होत्या किंवा कसे, योजनेच्या व्यवस्थापनेत हलगर्जीपणा इत्यादी.

(४) अशा प्रकारे विशेष दुरुस्ती किंवा योजनांचे पुनर्वसन करताना त्यावरील खर्च जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून करता येईल किंवा कसे, याबाबत सदर निधीतील शिल्लक रक्कमेच्या तपशिलासह स्पष्ट अभिप्राय देण्यात यावे.

(५) योजनेच्या विशेष दुरुस्तीचे काम टंचाई निवारण निधीतून घेण्यास वाव नाही/टंचाई कृती आराखड्यात अंतर्भूत नाही.

**(ड) प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी देणारे सक्षम प्राधिकारी व काम करणा-या यंत्रणा :-**

नळ योजनांची विशेष दुरुस्ती/पुनर्वसनाबाबत प्रशासकीय मंजूरी देण्याचे अधिकार व कामे करणा-या यंत्रणा यांचा तपशिल सोबतच्या प्रपत्र ३ मध्ये देण्यात आलेला आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

**(ई) नळ योजनांची विशेष दुरुस्ती व पुनर्वसन यावर करावयाचा खर्च :-**

वरील प्रमाणे नळ योजनांची विशेष दुरुस्ती वा पुनर्वसन यावर होणारा खर्च हा जिल्ह्या-कडे उपलब्ध असलेल्या ग्रामीण राज्ययोजनांतर्गत नळ योजनेकरिता उपलब्ध असलेल्या तरतूदीतून करण्यात यावा व तो त्यावर्षी जिल्ह्याकडे नळ योजनांसाठी उपलब्ध असलेल्या तरतूदीच्या २० टक्के पेक्षा जास्त असू नये, याची दक्षता घ्यावी.

**(११) नळ योजनांसाठी जादा स्टँडबाय विद्युतपंप खरेदी करण्याबाबत :-**

नळ योजनांवर बसविण्यात आलेले विद्युत पंप नादुरुस्त झाल्यामुळे योजना प्रदीर्घ कालावधीपर्यंत बंद पडते, परिणामी लाखो रुपये खर्चून कार्यान्वित केलेल्या योजनातून ग्रामस्थाना नियमितपणे लाभ (पाणी) मिळु शकत नाही. सबब नळ योजनांवरील विद्युत पंप नादुरुस्त झाल्यास सदर पंप दुरुस्त करी पर्यंत ग्रामस्थाना दैनंदिन पाणी पुरवठ्यात खंड पडू नये म्हणून, जिल्हा परिषदांनी, जिल्हा स्तरावरील देखभाल व दुरुस्ती निधीतून वेगवेगळ्या आवश्यकत्या अश्र्वशक्तीचे सुमारे १० ते १५ विद्युत पंप विकत घेऊन ठेवावेत. एखाद्या गावातील नळ योजनेचा विद्युत पंप नादुरुस्त झाल्यास, ग्रामस्थाच्या पाणी पुरवठ्यात खंड पडू नये म्हणून जादा खरेदी केलेल्या पंपातील योग्य पंप त्या नळ योजनेवर बसवावा. नादुरुस्त झालेला/काढून घेतलेला विद्युत पंप सत्वर दुरुस्त करुन घ्यावा व आवश्यकतेनुसार इतरत्र वापरण्यासाठी स्टॅंडबाय पंपसाठीच ठेवावा असे शासनाचे आदेश आहेत.

## १२) नळ योजनांच्या विद्युत मोटारीवर रोबोट बसविणे :-

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाखाली कार्यान्वित केलेल्या नळ योजनांच्या विद्युत मोटारी विजेच्या कमी अधिक दाबामुळे जळुन जाऊ नयेत आणि त्या चालविण्यासाठी खास पंप ऑपरेटरची नियुक्ती करावी लागू नये व परिणामी परिरक्षणाच्या खर्चात बचत व्हावी, या उद्देशाने राज्यातील काही नळ योजनांच्या विद्युत मोटारीवर जीवन प्राधिकरणाने रोबोट यंत्र बसविले आहे. सदर यंत्रे उत्तम प्रकारे काम देत असून त्यामुळे योजनावरील विद्युत मोटारी नादुरुस्त होण्याचे प्रमाणही कमी झाले आहे, व खर्चातही बचत झाली आहे, असे निदर्शनास आले आहे. सबब जिल्हा परिषदांनी जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून जीवन प्राधिकरणाच्या अधिका-याच्या सल्ल्याने काही रोबोट यंत्रे खरेदी करुन जिल्ह्यातील नळ योजनांच्या मोटारीवर बसवून घ्यावीत.

(१३) योजनांची देखभाल व दुरुस्ती व व्यवस्थापन खाजगी यंत्रणा/कंत्राटदार यांचेकडून करुन घेण्यास मुभा :-

(अ) ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजना पूर्ण झाल्यानंतर व यशस्वी चाचणी घेतल्यानंतर योजना एका गावांची असल्यास संबंधित ग्राम पंचायतीकडे व ती दोन वा त्यापेक्षा जास्त गावांची असल्यास संबंधित जिल्हा परिषदेकडे पुढील देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापनासाठी सोपविली जाते व तशी कायद्यात तरतूदही करण्यात आलेली आहे. मात्र शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, अनेक स्थानिक स्वराज्य संस्था या योजनांची देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापन योग्य प्रकारे करीत नाहीत. या संदर्भात संबधित स्थानिक संस्थाकडे योजना चालविण्यासाठी कुशल व अनुभवी कर्मचारी नसल्याचे कारण सांगण्यात येते. त्याचप्रमाणे स्थानिक लोकांकडून योग्य प्रमाणामध्ये पाणी पटटी वसूल करुन त्यातून योजनेची देखभाल व दुरुस्ती व व्यवस्थापन करणे ब-याच स्थानिक संस्थांना झेपत नाही असेही दिसून आलेले आहे. सदर बाब लक्षात घेऊन स्थानिक संस्थांना संबधित नळ पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती व व्यवस्थापन खाजगी यंत्रणा/कंत्राटदार यांचेकडून करुन घ्यावयाची झाल्यास तशी मुभा खालील अटींना अधीन राहून देता येईल.

(१) योजना खाजगी यंत्रणा किंवा कंत्राटदाराकडे सोपविण्यासाठी संबंधित स्थानिक संस्थेच्या प्रशासकीय प्रमुखाने त्याबाबतचे करारपत्र करावे.

(२) करारपत्रात कोणत्या बाबींची जबाबदारी, किती कालावधीसाठी व कोणत्या अटीस अधीन राहून खाजगी संस्थेकडे वा कंत्राटदाराकडे देण्यात आलेली आहे याचा स्पष्ट उल्लेख असावा.

(३) योजना चालविण्यासाठी लागणा-या खर्चाचा कोणताही अतिरिक्त भार शासनावर पडणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

**(ब) योजनांच्या देखभाल दुरुस्ती व व्यवस्थापनाची जबाबदारी माजी सैनिकांच्या संस्थाकडे सोपविणे :-**

जर स्थानिक स्तरावर माजी सैनिकांच्या संस्था वा माजी सैनिक योजनेच्या देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापनाचे काम करण्यास तयार असतील तर, त्यांना वरील अटीच्या अधीन राहून योजना देखभाल,दुरुस्ती व व्यवस्थापनेसाठी प्राधान्य देण्यात यावे.

**(क) देखभाल, दुरुस्ती करीता स्वतंत्र अर्थसंकल्प करणे :-**

योजनांच्या देखभाल दुरुस्ती करीता पंचायत राज संस्था त्यांच्या अर्थसंकल्पात ढोबळ मानाने रक्कम धरतात, मात्र देखभाल व दुरुस्ती करीता वेगळा अर्थसंकल्प सादर करीत नाहीत. पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापनासाठी पुरेसा निधी उपलब्ध व्हावा व याकडे लक्ष देता यावे यासाठी योजनांच्या देखभाल व दुरुस्ती करीता योजनानिहाय सविस्तर अर्थसंकल्प तयार करण्यात यावा.

(१४) ग्राम पंचायत पाणी पुरवठा निधी :-

महाराष्ट्र ग्राम पंचायत पाणी पुरवठा निधी, नियम १९९७, मधील तरतुदीनुसार, प्रत्येक ग्राम पंचायतीने "ग्राम पंचायत पाणी पुरवठा निधी", ग्रामस्तरावर स्थापन करावयाचा असून, त्या निधीमध्ये खालील निधींचा समावेश असेल.

(अ) मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) अधिनियम, १९९६, अस्तित्वात येण्यापूर्वी ग्रामसेवायोजन निधीमधील शिल्लक असलेली रक्कम.

(ब) कलम १३१ च्या उप कलम (१) अन्वये ग्रामपंचायतीला दरवर्षी मिळणा-या एकूण जमिन महसूल अनुदानापैकी ३५ टक्के रक्कम.

(क) कलम १२४ च्या पोट कलम (१) आणि खंड आठ व बारा अन्वये सर्वसाधारण तसेच विशेष दरानुसार जमा झालेली पाणी पट्टीची रक्कम.

(ड) घरगुती (खाजगी) व अन्य वापरासाठी पुरविण्यात आलेल्या खाजगी नळजोडणीसाठी जमा झालेली ठेव रक्कम.

या निधीची माहिती सोबतच्या प्रपत्र क्र.४:६ मध्ये ठेवण्यात यावी.

उक्त निधीतील रक्कम कृषी व उद्योग वगळून घरगुती पाणी पुरवठा व जनावरांसाठी पाणी पुरवठ्याच्या योजनांच्या देखभाल व दुरुस्तीसाठीच वापरण्यात यावी.

(१५) ग्रामीण नळ योजनांच्या देखभाल-दुरुस्तीसाठी वाहन खरेदी व कर्मचा-यांच्या नेमणुका :-

जिल्हा परिषदांकडे असलेल्या देखभाल व दुरुस्ती निधीतून देखभाल व दुरुस्तीसाठी वाहन खरेदी करण्यास व कर्मचा-यांच्या नेमणूका करण्यास जिल्हा परिषदा सक्षम आहेत. त्यासाठी शासनाची पुर्वानुमती घेण्याची आवश्यकता नाही. तसेच, एका गावाच्या नळ योजनेची

देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी ग्राम पंचायत पाणी पुरवठा निधीतून कर्मचा-यांच्या नेमणुका करण्यास ग्राम पंचायती सक्षम आहेत, त्यासाठी शासनाची पुर्वानुमती घेण्याची आवश्यकता नाही.

(१६) पाणी पट्टी - ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी अधिक प्रमाणात निधी उपलब्ध व्हावा यासाठी पाणी पट्टीचे प्रमाण वाढविणे आवश्यक आहे. ग्रामीण नळ योजना पुर्ण होऊन ताब्यात घेतल्यावर, खाजगी नळ जोडण्या देण्याकरीता ग्राम पंचायतीने अवलंबवयाची कार्यपध्दती व नियम, सार्वजनिक/खाजगी पाणीपट्टीचे दर, सार्वजनिक नळ कोंडाळ्याचा गैरवापर करणा-यांवर करावयाची दंडात्मक कार्यवाही, खाजगी नळ धारकांची नमुना नोंदवही, खाजगी नळ जोडणीच्या अर्जाचा नमूना इत्यादी बाबी विहित करण्यात आल्या असून, त्या सोबतच्या प्रपत्र - (४) मध्ये निर्देशिण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने खाजगी नळजोडण्या देताना आवश्यक कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांनी जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतीना द्यावेत. तसेच वसुलीचे प्रमाण वाढविण्याचे दृष्टीने खालील प्रमाणे उपाययोजना करण्यात याव्यात.

(अ) स्थानिक जनतेने पाणी पट्टी नियमित भरावी या हेतूने लोकशिक्षण देऊन जनतेची मानसिक तयारी करणे आवश्यक आहे. शेती, कारखाने इत्यादिमधून रोख उत्पन्न वैयक्तिकरित्या मिळत असल्यामुळे, त्यासाठी अधिक दराने पैसा मोजून पाणी विकत घेण्याची तयारी असते. पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत मात्र अत्यल्प विहित पाणी पट्टी सुध्दा भरली जात नाही. वस्तुतः शुध्द व पुरेशा पाण्यामुळे आरोग्य टिकुन राहून वैद्यकीय खर्चात बचत होते. तसेच पाण्याकरीता कराव्या लागणा-या वणवणीअभावी श्रम वाचतात. परिणामी, तोच वेळ अन्य कामासाठी उपयोगात आणून कुटुंबाच्या उत्पन्नात वाढ करता येते. याबाबी लक्षात घेता, अल्पशी पाणी पट्टी भरणे आपले कर्तव्य आहे ही भावना लोकशिक्षणातून जनमानसात रुजविणे आवश्यक आहे. यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-

(१) दुरचित्रवाणी,रेडिओ, वृत्तपत्रे इत्यादी प्रसिध्द माध्यमातून जनतेला पाणीपट्टी नियमितणे भरण्याबाबत जन शिक्षण देण्यात यावे. तसेच सभा,शिबिरे, मेळावे यातूनही ही बाब नियमितपणे जनतेच्या मनावर बिंबवण्यात यावी.

(२) जनशिक्षणाकरिता स्वयंसेवी संस्था, लोकप्रतिनिधी यांचा सक्रीय सहभाग घेऊन याकामी प्रयत्न करावेत.

(ब) वरील प्रमाणे जनशिक्षणासाठी प्रयत्न करण्याबरोबर पाणीपट्टी न भरणा-या व्यक्तीवर कायद्यानुसार वेळेवर परिणामकारक कार्यवाही देखील करणे अत्यावश्यक आहे .सध्या गावक-यांनी पाणी पट्टी न दिल्यास व त्यापोटी थकबाकी असल्यास थकबाकीदारांवर संबंधित ग्रामपंचायतीचे सचिव अर्थात ग्रामसेवक यांच्या स्वाक्षरीने कारणे दाखवा नोटीस बजावण्याबाबतची व थकबाकी वसूल करण्याच्या दृष्टीने योग्य ती सक्तीची कार्यवाही करण्याबाबतची तरतूद मुंबई ग्रामपंचायत (थकबाकी वसुली) नियम, १९६०, मध्ये करण्यात आली आहे. त्यानुसार सर्व ग्रासेवकांनी पाणीपट्टी वसूली संदर्भात बजावण्यात येणा-या कारणे दाखवा नोटीसा स्वतःच्या स्वाक्षरीने सर्व थकबाकीदारांवर वेळेवर बजाविणे अनिवार्य आहे, या तरतूदीच्या अनुषंगाने सर्व ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकांना सर्व पाणीपट्टी थकबाकीदारांवर

कोणताही अपवाद न ठेवता वेळेवर नोटीसा बजाविण्याबाबत सूचना देण्यात याव्यात, अशा कारणे दाखवा नोटीसा देण्यापुर्वी, संबंधित ग्रामसेवकाने सदर बाब ग्रामपंचायतीच्याहि निदर्शनास आणून द्यावी व ग्रामपंचायतीच्या सदस्यांना देखील थकबाकीदारांकडून पाणीपट्टी वसूल करण्याकामी आवश्यक तसा पाठपुरावा करण्याविषयी विनंती करावी, सर्व गट विकास अधिकाऱ्यांनी त्यांच्या पंचायत समिती क्षेत्रातील ग्रामपंचायतीमध्ये सर्व पाणी पट्टी थकबाकीदारांना संबंधित ग्रामसेवकांकडून वेळेवर नोटीसा देण्यात आल्या/येत आहेत याचा नियमित आढावा घ्यावा.

(क) ग्रामपंचायत स्तरावर स्वतंत्र ग्राम पंचायत पाणी पुरवठा निधी स्थापन करण्यात आलेला असल्यामुळे नळ योजनांच्या पाणीपट्टीच्या वसुलीकरीता, स्वतंत्र पावती पुस्तक ठेवण्यात यावे व त्या पावती पुस्तकावर वसूल करण्यात आलेल्या पाणी पट्टीची रक्कम ग्रामपंचायत पाणी पुरवठा निधीत टाकून तिचा स्वतंत्र हिशेब ठेवण्यात यावा.

(ख) आदेशित नळ योजनांच्या संदर्भात संबंधित ग्रामपंचायतीने पाणी पट्टी पोटी जिल्हा परिषदेला किती रक्कम द्यावयाची आहे याचे पत्र जिल्हा परिषदेकडून ग्रामपंचायतींना वेळीच दिले जात नाही. त्यामुळे संबंधित ग्रामपंचायतीस याची कल्पना नसते, तरी यापुढे सर्व नळ पाणी पुरवठा योजनांचे संदर्भात संबधित ग्रामपंचायतीने पाणीपट्टीपोटी किती रक्कम जिल्हा परिषदेला भरावयाची आहे, याबाबतचे सुचना पत्र जिल्हा परिषदेने ग्रामपंचायतीला नियमितरित्या देणे बंधनकारक करण्यात येत आहे.

त्याप्रमाणे जिल्हा परिषदांनी नळ योजनांच्या बाबतीत पाणीपट्टी वसूलीचे प्रमाण व उद्दीष्ट ग्रामपंचायतींना ठरवून द्यावे, जिल्हा परिषदेने ठरवून दिल्याप्रमाणे, पाणीपट्टी वसूल केली जाईल याबाबत संबंधित ग्राम पंचायतीच्या सरपंचाने योग्य तो पुढाकार घ्यावा.

(ग) संदर्भाधीन अ.क्र.(२७) अन्वये असे आदेशित करण्यात आले आहे की, ज्या तयार नळ पाणी पुरवठा योजना, ग्रामपंचायती/जिल्हा परिषदा ह्या देखभाल व व्यवस्थापनासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून हस्तांतरीत करुन घेत नाहीत अशा अहस्तांतरीत योजनांवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून जो देखभाल व दुरुस्तीवर खर्च करण्यात येतो त्या योजनांच्या बाबतीत परिच्छेद ५ मध्ये नमुद केल्याप्रमाणे जिल्हा परिषदांना देय ठरणाऱ्या अनुदानातून अहस्तांतरीत योजनांच्या देखभाल व दुरुस्ती पोटी त्या विशिष्ट जिल्हापरिषदेच्या एकूण देय ठरणाऱ्या अनुदानातून २० टक्के इतकी रक्कम शासन स्तरावर वळती करुन ती थेट महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास द्यावयाची आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने अशा अहस्तांतरीत योजनांच्या तपशिल आणि अशा अहस्तांतरीत योजनांवरील थकबाकीचा तपशिल हा त्या वर्षाच्या ऑक्टोबर महिन्याअखेर संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी

याच्याकडून प्रमाणीत करुन पुढील वर्षाच्या जानेवारीमध्ये शासनाकडे वजातीसाठी सादर करावयाचा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल आदेशानुसार व नावाने,

ISSUED
Date १९/१/९९

(रु.न.देशमुख)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
१. विभागीय आयुक्त, (सर्व)
२. अपर मुख्य सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग ,मंत्रालय, मुंबई.
३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
४. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.
५. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,(सर्व).
६. अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,(सर्व).
७. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, (सर्व)
८. कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद, (सर्व)
९. उप अभियंता, पाणी पुरवठा व स्वच्छता उप विभाग, जिल्हा परिषद, (सर्व)
१०. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई ( लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता).
११. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर ( लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता).
१२. जिल्हा कोषागार अधिकारी, (सर्व).
१३. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.
१४. उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, (सर्व).
१५. वित्त विभाग,(व्यय-३, अर्थसंकल्प-१६)
१६. ग्राम विकास व जल संधारण विभाग,(जल-२ व जल-४ कार्यासन क्र.२५ व २७)
१७. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासन अधिकारी.
१८. निवड नस्ती (पापु-०७)

कोणताही अपवाद न ठेवता वेळेवर नोटीसा बजाविण्याबाबत सूचना देण्यात याव्यात, अशा कारणे दाखवा नोटीसा देण्यापुर्वी, संबंधित ग्रामसेवकाने सदर बाब ग्रामपंचायतीच्याहि निदर्शनास आणून द्यावी व ग्रामपंचायतीच्या सदस्यांना देखील थकबाकीदारांकडून पाणीपट्टी वसूल करण्याकामी आवश्यक तो पाठपुरावा करण्याविषयी विनंती करावी, सर्व गट विकास अधिकाऱ्यांनी त्यांच्या पंचायत समिती क्षेत्रातील ग्रामपंचायतीमध्ये सर्व पाणी पट्टी थकबाकीदारांना संबंधित ग्रामसेवकांकडून वेळेवर नोटीसा देण्यात आल्या/येत आहेत याचा नियमित आढावा घ्यावा.

(क) ग्रामपंचायत स्तरावर स्वतंत्र ग्राम पंचायत पाणी पुरवठा निधी स्थापन करण्यात आलेला असल्यामुळे नळ योजनांच्या पाणीपट्टीच्या वसूलीकरीता, स्वतंत्र पावती पुस्तक ठेवण्यात यावे व त्या पावती पुस्तकावर वसूल करण्यात आलेल्या पाणी पट्टीची रक्कम ग्रामपंचायत पाणी पुरवठा निधीत टाकून तिचा स्वतंत्र हिशेब ठेवण्यात यावा.

(ख) प्रादेशिक नळ योजनांच्या संदर्भात संबंधित ग्रामपंचायतीने पाणी पट्टी पोटी जिल्हा परिषदेला किती रक्कम द्यावयाची आहे याचे पत्र जिल्हा परिषदेकडून ग्रामपंचायतींना कधीच दिले जात नाही. त्यामुळे संबंधित ग्रामपंचायतीस याची कल्पना नसते, तरी यापुढे सर्व नळ पाणी पुरवठा योजनांचे संदर्भात संबंधित ग्रामपंचायतीने पाणीपट्टीपोटी किती रक्कम जिल्हा परिषदेला भरावयाची आहे, याबाबतचे सुचना पत्र जिल्हा परिषदेने ग्रामपंचायतीला नियमितरित्या देणे बंधनकारक करण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे, जिल्हा परिषदांनी नळ योजनांच्या बाबतीत पाणीपट्टी वसूलीचे प्रमाण व उद्दीष्ट ग्रामपंचायतींना ठरवून द्यावे, जिल्हा परिषदेने ठरवून दिल्याप्रमाणे, पाणीपट्टी वसूल केली जाईल याबाबत संबंधित ग्राम पंचायतीच्या सरपंचाने योग्य तो पुढाकार घ्यावा.

(ग) संदर्भाधीन अ.क्र.(२५) अन्वये असे आदेशित करण्यात आले आहे की, ज्या तयार नळ पाणी पुरवठा योजना, ग्रामपंचायती/जिल्हा परिषदा ह्या देखभाल व व्यवस्थापनासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून हस्तांतरीत करुन घेत नाहीत अशा अहस्तांतरीत योजनावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून जो देखभाल व दुरुस्तीवर खर्च करण्यात येतो त्या योजनांच्या बाबतीत परिच्छेद ५ मध्ये नमुद केल्याप्रमाणे जिल्हा परिषदांना देय ठरणाऱ्या अनुदानातून अहस्तांतरीत योजनांच्या देखभाल व दुरुस्ती पोटी त्या विशिष्ट जिल्हापरिषदेच्या एकूण देय ठरणाऱ्या अनुदानातून २० टक्के इतकी रक्कम शासन स्तरावर वजावट करुन ती थेट महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास द्यावयाची आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने अशा अहस्तांतरीत योजनांच्या तपशिल आणि अशा अहस्तांतरीत योजनावरील थकबाकीचा तपशिल हा त्या वर्षाच्या ऑक्टोंबर महिन्याअखेर संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी

यांच्याकडून प्रमाणीत करुन पुढील वर्षाच्या जानेवारीमध्ये शासनाकडे वजातीसाठी सादर करावयाचा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल आदेशानुसार व नांवाने,

ISSUED
Date २९/२/९९

(रु.न.देशमुख)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
१. विभागीय आयुक्त, (सर्व)
२. अपर मुख्य सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग ,मंत्रालय, मुंबई.
३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
४. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.
५. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,(सर्व).
६. अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,(सर्व).
७. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, (सर्व)
८. कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद, (सर्व)
९. उप अभियंता, पाणी पुरवठा व स्वच्छता उप विभाग, जिल्हा परिषद, (सर्व)
१०. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई ( लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता).
११. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर ( लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता).
१२. जिल्हा कोषागार अधिकारी, (सर्व).
१३. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.
१४. उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, (सर्व).
१५. वित्त विभाग,(व्यय-३, अर्थसंकल्प-१६)
१६. ग्राम विकास व जल संधारण विभाग,(जल-२ व जल-४ कार्यासन क्र.२५ व २७)
१७. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासन अधिकारी.
१८. निवड नस्ती (पापु-०७)

(२) करारपत्रात कोणत्या बाबींची जबाबदारी, किती कालावधीसाठी व कोणत्या अटीस अधीन राहून खाजगी संस्थेकडे या कंत्राटदाराकडे देण्यात आलेली आहे याचा स्पष्ट उल्लेख असावा.

(३) योजना चालविण्यासाठी लागणा-या खर्चाचा कोणताही अतिरिक्त भार शासनावर पडणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

**(ब) योजनांच्या देखभाल दुरुस्ती व व्यवस्थापनाची जबाबदारी माजी सैनिकांच्या संस्थाकडे सोपविणे.:-**

जर स्थानिक स्तरावर माजी सैनिकांच्या संस्था या माजी सैनिक योजनेच्या देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापनाचे काम करण्यास तयार असतील तर, त्यांना वरील अटीच्या अधीन राहून योजना देखभाल,दुरुस्ती व व्यवस्थापनेसाठी प्राधान्य देण्यात यावे.

**(क) देखभाल, दुरुस्ती करीता स्वतंत्र अर्थसंकल्प करणे :-**

योजनांच्या देखभाल दुरुस्ती करीता पंचायत राज संस्था त्यांच्या अर्थसंकल्पात ढोबळ मानाने रक्कम दाखवितात, मात्र देखभाल व दुरुस्ती करीता वेगळा अर्थसंकल्प सादर करीत नाहीत. पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापनासाठी पुरेसा निधी उपलब्ध व्हावा व याकडे लक्ष देता यावे यासाठी योजनांच्या देखभाल व दुरुस्ती करीता योजनानिहाय सविस्तर अर्थसंकल्प तयार करण्यात यावा.

**(१४) ग्राम पंचायत पाणी पुरवठा निधी :-**

महाराष्ट्र ग्राम पंचायत पाणी पुरवठा निधी, नियम १९९७, मधील तरतुदीनुसार, प्रत्येक ग्राम पंचायतीने "ग्राम पंचायत पाणी पुरवठा निधी", ग्रामस्तरावर स्थापन करावयाचा असून, त्या निधीमध्ये खालील निधींचा समावेश असेल.

(अ) मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) अधिनियम, १९९६, अस्तित्वात येण्यापूर्वी ग्रामसेवायोजन निधीमधील शिल्लक असलेली रक्कम.

(ब) कलम १३१ च्या उप कलम (१) अन्वये ग्रामपंचायतीला दरवर्षी मिळणा-या एकूण जमिन महसूल अनुदानापैकी ३५ टक्के रक्कम.

(क) कलम १२४ च्या पोट कलम (१) आणि खंड आठ व बारा अन्वये सर्वसाधारण तसेच विशेष दरानुसार जमा झालेली पाणी पट्टीची रक्कम.

(ड) घरगुती (खाजगी) व अन्य वापरासाठी पुरविण्यात आलेल्या खाजगी नळजोडणीसाठी जमा झालेली ठेव रक्कम.

या निधीची माहिती सोबतच्या प्रपत्र क्र.४:६ मध्ये ठेवण्यात यावी.

उक्त निधीतील रक्कम कृषी व उद्योग वगळून घरगुती पाणी पुरवठा व जनावरांसाठी पाणी पुरवठ्याच्या योजनांच्या देखभाल व दुरुस्तीसाठीच वापरण्यात यावी.

**(१५) ग्रामीण नळ योजनांच्या देखभाल-दुरुस्तीसाठी वाहन खरेदी व कर्मचा-यांच्या नेमणुका :-**

जिल्हा परिषदांकडे असलेल्या देखभाल व दुरुस्ती निधीतून देखभाल व दुरुस्तीसाठी वाहन खरेदी करण्यास व कर्मचा-यांच्या नेमणूका करण्यास जिल्हा परिषदा सक्षम आहेत. त्यासाठी शासनाची पुर्वानुमती घेण्याची आवश्यकता नाही. तसेच, एका गावाच्या नळ योजनेची

देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी ग्राम पंचायत पाणी पुरवठा निधीतून कर्मचा-यांच्या नेमणुका करण्यास ग्राम पंचायती सक्षम आहेत, त्यासाठी शासनाची पुर्वानुमती घेण्याची आवश्यकता नाही.

(१६) पाणी पट्टी - ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी अधिक प्रमाणात निधी उपलब्ध व्हावा यासाठी पाणी पट्टीचे प्रमाण वाढविणे आवश्यक आहे. ग्रामीण नळ योजना पुर्ण होऊन ताब्यात घेतल्यावर, खाजगी नळ जोडण्या देण्याकरीता ग्राम पंचायतीने अवलंबवयाची कार्यपद्धती व नियम, सार्वजनिक/खाजगी पाणीपट्टीचे दर, सार्वजनिक नळ कोंडाळ्याचा गैरवापर करणा-यांवर करावयाची दंडात्मक कार्यवाही, खाजगी नळ धारकांची नमुना नोंदवही, खाजगी नळ जोडणीच्या अर्जाचा नमूना इत्यादी बाबी विहित करण्यात आल्या असून, त्या सोबतच्या प्रपत्र - (४) मध्ये निर्देशित करण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने खाजगी नळजोडण्या देताना आवश्यक कार्यवाही करण्याबाबतचे निदेश सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांनी जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींना द्यावेत. तसेच वसुलीचे प्रमाण वाढविण्याचे दृष्टीने खालील प्रमाणे उपाययोजना करण्यात याव्यात.

(अ) स्थानिक जनतेने पाणी पट्टी नियमित भरावी या हेतूने लोकशिक्षण देऊन जनतेची मानसिक तयारी करणे आवश्यक आहे. शेती, कारखाने इत्यादिमधून रोख उत्पन्न वैयक्तिकरित्या मिळत असल्यामुळे, त्यासाठी अधिक दराने पैसा मोजून पाणी विकत घेण्याची तयारी असते. पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत मात्र अत्यल्प विहित पाणी पट्टी सुध्दा भरली जात नाही. वस्तुतः शुध्द व पुरेशा पाण्यामुळे आरोग्य टिकून राहून वैद्यकीय खर्चात बचत होते. तसेच पाण्याकरीता कराव्या लागणा-या वणवणीअभावी श्रम वाचतात परिणामी, तोच वेळ अन्य कामासाठी उपयोगात आणून कुटुंबांच्या उत्पन्नात वाढ करता येते. याबाबी लक्षात घेता, अल्पशी पाणी पट्टी भरणे आपले कर्तव्य आहे ही भावना लोकशिक्षणातून जनमानसात रुजविणे आवश्यक आहे. यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-

(१) दुरचित्रवाणी,रेडिओ, वृत्तपत्रे इत्यादी प्रसिध्द माध्यमातून जनतेला पाणीपट्टी नियमितपणे भरण्याबाबत जन शिक्षण देण्यात यावे. तसेच सभा शिबिरे, मेळावे यातूनही ही बाब नियमितपणे जनतेच्या मनावर बिंबवण्यात यावी.

(२) जनशिक्षणाकरिता स्वयंसेवी संस्था, लोकप्रतिनिधी यांचा सक्रीय सहभाग घेऊन याकामी प्रयत्न करावेत.

(ब) वरील प्रमाणे जनशिक्षणासाठी प्रयत्न करण्याबरोबर पाणीपट्टी न भरणा-या व्यक्तीवर कायद्यानुसार वेळेवर परिणामकारक कार्यवाही देखील करणे अत्यावश्यक आहे. सध्या ग्राहक-यांनी पाणी पट्टी न दिल्यास व त्यापोटी थकबाकी असल्यास थकबाकीदारांवर संबंधित ग्रामपंचायतीचे सचिव अर्थात ग्रामसेवक यांच्या स्वाक्षरीने कारणे दाखवा नोटीस बजावण्याबाबतची व थकबाकी वसूल करण्याच्या दृष्टीने योग्य ती सक्तीची कार्यवाही करण्याबाबतची तरतूद मुंबई ग्रामपंचायत (थकबाकी वसुली) नियम, १९६०, मध्ये करण्यात आली आहे. त्यानुसार सर्व ग्रामसेवकांनी पाणीपट्टी वसूली संदर्भात बजावण्यात येणा-या कारणे दाखवा नोटीसा स्वतःच्या स्वाक्षरीने सर्व थकबाकीदारांवर वेळेवर बजाविणे अनिवार्य आहे, या तरतूदीच्या अनुषंगाने सर्व ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकांना सर्व पाणीपट्टी थकबाकीदारांवर

शक्य नाही व कामाचा अंतर्भाव टंचाई कृती आराखड्यात करण्यात आलेला नाही, असे प्रमाणपत्र सोबतच्या प्रपत्र २ प्रमाणे प्रस्तावासोबत जोडावे. संबंधित सक्षम प्राधिका-याने जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीत सर्व मार्गानी उपलब्ध होणारा निधी, त्यातून करावयाची कामे, त्यांचा अंदाजित खर्च व टंचाई निवारण यासाठी उपलब्ध निधी यामधून सदर कामे घेण्यास वाव नाही, याची सविस्तर माहिती घेतल्यानंतर व याची खात्री पटवुन घेतल्यानंतर अशा दुरुस्तीच्या/पुनर्वसनाच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता द्यावी.

**(क) प्रस्ताव मंजुर करण्यासाठी पूर्तता करावयाच्या बाबी :-**

नळ योजनांची विशेष दुरुस्ती वा पुनर्वसनाचे प्रस्ताव मंजुर करताना प्रस्तावासोबत खालील मुद्यांची पूर्तता झालेली आहे, किंवा कसे याकडे संबंधितांनी विशेष लक्ष द्यावे.

(१) संबंधित उपअभियंता,पाणी पुरवठा उपविभाग, जिल्हा परिषद/महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम उपविभाग यांनी स्वतः निरीक्षण करुन द्यावयाचा स्थळ निरीक्षण अहवाल.

(२) विशेष दुरुस्तीची/पुनर्वसनाची सविस्तर अंदाजपत्रके (प्रस्तावातील प्रस्तावित खर्च वाजवी आहे किंवा कसे याबाबतची खात्री अंदाजपत्रकाची पडताळणी करुन करणे आवश्यक आहे.)

(३) विशेष दुरुस्ती वा पुनर्वसन कोणत्या परिस्थितीमुळे उद्‌भवले त्याची कारणमिमांसा देण्यात यावी. उदा. कामाच्या अंमलबजावणीमध्ये उणीवा होत्या किंवा कसे, योजनेच्या व्यवस्थापनेत हलगर्जीपणा इत्यादी.

(४) अशा प्रकारे विशेष दुरुस्ती किंवा योजनांचे पुनर्वसन करताना त्यावरील खर्च जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून करता येईल किंवा कसे, याबाबत सदर निधीतील शिल्लक रक्कमेच्या तपशिलासह स्पष्ट अभिप्राय देण्यात यावे.

(५) योजनेच्या विशेष दुरुस्तीचे काम टंचाई निवारण निधीतून घेण्यास वाव नाही/टंचाई कृती आराखड्यात अंतर्भूत नाही.

**(ड) प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी देणारे सक्षम प्राधिकारी व काम करणा-या यंत्रणा :-**

नळ योजनांची विशेष दुरुस्ती/पुनर्वसनाबाबत प्रशासकीय मंजूरी देण्याचे अधिकार व कामे करणा-या यंत्रणा यांचा तपशिल सोबतच्या प्रपत्र ३ मध्ये देण्यात आलेला आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

**(ई) नळ योजनांची विशेष दुरुस्ती व पुनर्वसन यावर करावयाचा खर्च :-**

वरील प्रमाणे नळ योजनांची विशेष दुरुस्ती वा पुनर्वसन यावर होणारा खर्च हा जिल्हा-कडे उपलब्ध असलेल्या ग्रामीण राज्ययोजनांतर्गत नळ योजनेकरिता उपलब्ध असलेल्या तरतूदीतून करण्यात यावा व तो त्यावर्षी जिल्ह्याकडे नळ योजनांसाठी उपलब्ध असलेल्या तरतूदीच्या २० टक्के पेक्षा जास्त असू नये, याची दक्षता घ्यावी.

**(११) नळ योजनांसाठी जादा स्टँडबाय विद्युतपंप खरेदी करण्याबाबत :-**

नळ योजनांवर बसविण्यात आलेले विद्युत पंप नादुरुस्त झाल्यामुळे योजना प्रदीर्घ कालावधीपर्यंत बंद पडते. परिणामी लाखो रुपये खर्चून कार्यान्वित केलेल्या योजनातून ग्रामस्थांना नियमितपणे लाभ (पाणी) मिळु शकत नाही. सबब नळ योजनांवरील विद्युत पंप नादुरुस्त झाल्यास सदर पंप दुरुस्त करी पर्यंत ग्रामस्थांना दैनंदिन पाणी पुरवठ्यात खंड पडू नये म्हणून, जिल्हा परिषदांनी, जिल्हा स्तरावरील देखभाल व दुरुस्ती निधीतून वेगवेगळ्या आवश्यकतेच्या अश्वशक्तीचे सुमारे १० ते १५ विद्युत पंप विकत घेऊन ठेवावेत. एखाद्या गावातील नळ योजनेचा विद्युत पंप नादुरुस्त झाल्यास, ग्रामस्थांच्या पाणी पुरवठ्यात खंड पडू नये म्हणून जादा खरेदी केलेल्या पंपातील योग्य पंप त्या नळ योजनेवर बसवावा. नादुरुस्त झालेला/काढून घेतलेला विद्युत पंप सत्वर दुरुस्त करुन घ्यावा व आवश्यकतेनुसार इतरत्र वापरण्यासाठी स्टॅंडबाय पंपसाठीच ठेवावा असे शासनाचे आदेश आहेत.

**१२) नळ योजनांच्या विद्युत मोटारीवर रोबोट बसविणे :-**

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाखाली कार्यान्वित केलेल्या नळ योजनांच्या विद्युत मोटारी विजेच्या कमी अधिक दाबामुळे जळुन खाक नयेत आणि त्या चालविण्यासाठी खास पंप ऑपरेटरची नियुक्ती करावी लागु नये व परिणामी परिरक्षणाच्या खर्चात बचत व्हावी, या उद्देशाने राज्यातील काही नळ योजनांच्या विद्युत मोटारीवर जीवन प्राधिकरणाने रोबोटयंत्र बसविले आहे. सदर यंत्रे उत्तम प्रकारे काम देत असून त्यामुळे योजनांवरील विद्युत मोटारी नादुरुस्त होण्याचे प्रमाणही कमी झाले आहे, व खर्चातही बचत झाली आहे. असे निदर्शास आले आहे. सबब जिल्हा परिषदांनी जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून जीवन प्राधिकरणाच्या अधिका-याच्या सल्ल्याने काही रोबोट यंत्रे खरेदी करुन जिल्ह्यातील नळ योजनांच्या मोटारीवर बसवून घ्यावीत

(१३) योजनांची देखभाल व दुरुस्ती व व्यवस्थापन खाजगी यंत्रणा/कंत्राटदार यांचेकडून करुन घेण्यास मुभा :-

(अ) ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजना पूर्ण झाल्यानंतर व यशस्वी चाचणी दिल्यानंतर योजना एका गावांची असल्यास संबंधित ग्राम पंचायतीकडे व ती दोन वा त्यापेक्षा जास्त गावांची असल्यास संबंधित जिल्हा परिषदेकडे पुढील देखभाल दुरुस्ती व व्यवस्थापनासाठी सोपविली जाते व तशी कायद्यात तरतूदही करण्यात आलेली आहे. मात्र शासनाच्या असे निर्दशनास आले आहे की, अनेक स्थानिक स्वराज्य संस्था या योजनांची देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापन योग्य प्रकारे करीत नाहीत. या संदर्भात संबंधित स्थानिक संस्थांकडे योजना चालविण्यासाठी कुशल व अनुभवी कर्मचारी नसल्याचे कारण सांगण्यात येते. त्याचप्रमाणे स्थानिक जनतेकडून योग्य प्रमाणामध्ये पाणी पट्टी वसूल करुन त्यातून योजनेची देखभाल व दुरुस्ती व व्यवस्थापन करणे ब-याच स्थानिक संस्थांना झेपत नाही असेही दिसून आलेले आहे, सदर बाब लक्षात घेऊन स्थानिक संस्थांना संबंधित नळ पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती व व्यवस्थापन खाजगी यंत्रणा/कंत्राटदार यांचेकडून करुन घ्यावयाची झाल्यास तशी मुभा खालील अटींना अधीन राहून देता येईल.

(१) योजना खाजगी यंत्रणा किंवा कंत्राटदाराकडे सोपविण्यासाठी संबंधित स्थानिक संस्थेच्या प्रशासकीय प्रमुखाने त्याबाबतचे करारपत्र करावे.

(८) दुरुस्ती कामाना मंजुरी देण्याचे अधिकार :-

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या दुरुस्तीच्या कामाना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हा परिषदेच्या समित्या/अधिकारी यांना, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता, १९६८ नुसार, खाली निर्देशिल्याप्रमाणे आहेत. त्यानुसार दुरुस्तीचा कार्यक्रम हाती घेण्यात यावा.

| अ.क्र | जिल्हा परिषदेचे अधिकारी/समिती | खर्च मंजूरीची मर्यादा |
|---|---|---|
| ०१. | उप अभियंता | रुपये २०,०००/- |
| ०२. | कार्यकारी अभियंता | रुपये ५०,०००/- |
| ०३. | मुख्य कार्यकारी अधिकारी | रुपये १,००,०००/- |
| ०४. | विषय समित्यांचे सभापती | रुपये २,००,०००/- |
| ०५. | विषय समिती | रुपये ३,५०,०००/- |
| ०६. | स्थायी समिती | रुपये ५,००,०००/- |
| ०७. | जिल्हा परिषद | रुपये ५,००,०००/-पेक्षा जास्त |

**(९) वर्धित वेग पाणी पुरवठा कार्यक्रमाखालील पुर्ण झालेल्या अहस्तांरीत योजनांच्या दुरुस्ती वरील खर्च :-**

केंद्र पुरस्कृत वर्धित वेग पाणी पुरवठा कार्यक्रमाखाली पुर्ण करण्यात आलेल्या परंतु स्थानिक संस्थांनी हस्तांतरीत करुन न घेतलेल्या राज्यस्तरीय नळ योजनांची देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला करावी लागते. त्यासाठी प्राधिकरणाला शासन वेगळे अनुदान मंजुर करीत नाही. केंद्र पुरस्कृत वर्धित वेग पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत मागील लगतच्या आर्थिक वर्षाअखेरपर्यंत प्रत्येक जिल्हयात पुर्ण करण्यात आलेल्या नळ योजनांच्या एकुण किंमतीच्या प्रमाणात उक्त कार्यक्रमांतर्गत देखभाल व दुरुस्तीसाठी राखून ठेवलेल्या १० टक्के निधीचे वाटप सर्व जिल्ह्यासाठी करण्यात येते. प्रत्येक जिल्ह्यास देखभाल व दुरुस्ती निधीसाठी वर्धित वेग पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत अनुदानातून अनुज्ञेय असलेल्या रक्कमेतील उक्त कार्यक्रमांतर्गत प्राधिकरणाने पुर्ण केलेल्या परंतु जिल्हा परिषद/ग्राम पंचायतीनी ताब्यात न घेतलेल्या नळ योजनांच्या किंमतीच्या प्रमाणात निधी प्राधिकरणाचा हिस्सा म्हणून प्राधिकरणास अनुज्ञेय राहील. प्राधिकरणास अनुज्ञेय सदर अनुदान पुढील आदेश होईपर्यंत संबंधित जिल्हा परिषदेच्या देखभाल व दुरुस्ती निधीत जमा करण्यासाठी जिल्हा परिषदेला वितरीत करण्यात यावे. जिल्हा परिषदेच्या देखभाल व दुरुस्ती निधीत जमा झाल्यावर, प्राधिकरणास अनुज्ञेय असलेली रक्कम संबंधित जिल्ह्याच्या अधिक्षक अभियंत्यांकडे वर्ग करण्यात यावी. अधीक्षक अभियंत्यांनी सदर रक्कम स्वतंत्र खात्यात जमा करुन तिचा विनियोग वर्धित वेग पाणी पुरवठा कार्यक्रमाखाली पुर्ण केलेल्या व प्राधिकरण चालवीत असलेल्या अहस्तांतरीत पुर्ण योजनांच्या देखभाल व दुरुस्तीवरच करावा.

देखभाल व दुरुस्ती निधीत वर्धित वेग पाणी पुरवठा कार्यक्रमाखाली देण्यात येणारे अनुदान जमा करण्यात आलेल्या रक्कमेतून प्राधिकरणाने सदर कार्यक्रमाखाली पुर्ण केलेल्या परंतु स्थानिक संस्थानी ताब्यात न घेतल्या योजनांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी प्राधिकरणाकडे

वर्ग करण्याबाबतचे सदर आदेश महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम २६१ (१) खाली देण्यात आले आहेत.

**(१०) नळ योजनांची विशेष दुरुस्ती व पुनर्वसन यांत अंतर्भूत होणारी कामे :-**

(अ) नळ योजनांची विशेष दुरुस्ती यात योजनतील निकामी/नादुरुस्त झालेले पंपिंग मशिनरी बदलणे/दुरुस्त करणे किंवा योग्य त्या क्षमतेची पंपिंग मशिनरी बसविणे, ऊर्ध्वनलिका/गुरुत्वनलिका इत्यादीमधील निकामी झालेली/फुटलेली पाईपलाईन बदलणे किंवा पुरेसा पाणी पुरवठा होण्याच्या दृष्टीकोनातून योग्य व्यासाची पाईप लाईन टाकणे, साठवण टाकीची गळती दुरुस्ती करणे किंवा साठवण टाकीचे बळकटीकरण करणे किंवा योग्य दाबाने/पुरेसा पाणी पुरवठा होण्यासाठी नवीन साठवण टाकी बांधणे, वितरण व्यवस्थेतील निकामी झालेली पाईप बदलणे किंवा मोठ्या व्यासाचे पाईप टाकणे किंवा ज्या ठिकाणी वितरण व्यवस्था नाही, त्या ठिकाणी वितरण व्यवस्था टाकणे, उद्भवाचे पाणी कमी झाल्यास उद्भवाची खोली वाढविणे किंवा इनवेल (उभे/आडवे) बोअर घेवून, उद्भवातील पाण्याचे प्रमाण वाढविणे किंवा नवीन उद्भव आवश्यक उपांगासह हाती घेणे, वितरण व्यवस्थेतील नळ कोंडाळी दुरुस्त करणे किंवा नवीन नळ कोंडाळी बांधणे, ज्या ठिकाणी विद्युत दाबाची अडचण असेल त्या ठिकाणी स्वतंत्र ट्रान्सफॉर्मर बसविणे इत्यादी कामे मोडतील. नळयोजनेचे पुनर्वसन करणे यात जुन्या योजनेतील काही उपांगे नादुरुस्त झाल्यामुळे त्यांची दुरुस्ती करणे किंवा नवीन उपागे घेऊन. योजना सक्षमपणे कार्यान्वित करणे इत्यादींचा समावेश होईल.

**(ब) विशेष दुरुस्ती व पुनर्वसन करण्याकरिता करावयाची कार्यवाही :-**

(१) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.ग्रापापु-१०९३/सीआर-८३१/३९-अ, दिनांक ११ जानेवारी,१९९४ अन्वये जिल्ह्यातील सर्व पुर्ण व कार्यान्वित पाणी पुरवठा साधनांचे नियमित सर्वेक्षण करण्याबाबतचे आदेश दिलेले आहेत.सदर सर्वेक्षण दरवर्षी सर्वसाधारणपणे ऑक्टोबर महिन्यात करावयाचे असून, सर्वेक्षणातील माहितीच्या आधारे सोबतच्या प्रपत्र १:४, १:५ व १:६ मधील माहितीचा विचार करुन कोणकोणत्या गावात/वाड्यात अस्तित्वात असलेल्या नळ योजनाची दुरुस्ती करुन पाणी पुरवठा चालू करता येईल हे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यांनी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याशी विचार विनिमय करुन ठरवावे.

(२) त्यानंतर ज्या गावात/वाड्यात नळ योजनांची विशेष दुरुस्ती वा पुनर्वसन करावयाचे आहे, त्याचा वार्षिक कृती आराखडा तयार करुन त्यास जिल्हा पाणी पुरवठा समितीची मान्यता घेण्यात यावी.

(३) प्रथमत नळ योजनांची विशेष दुरुस्ती / पुनर्वसन जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून घेता येईल किंवा कसे हे पडताळून पाहण्यात यावे व जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीत, निधी उपलब्ध असल्यास त्यातून कामे घेण्यात यावीत.

(४) जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून जेवढ्या नळ योजनाची विशेष दुरुस्ती/पुनर्वसन करणे शक्य आहे. त्याचे नियोजन केल्यानंतर इतर नळ योजनांची विशेष दुरस्ती वा पुनर्वसनाचे प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी प्रशासकीय मान्यतेसाठी विहित सक्षम प्राधिका-याकडे पाठवावेत, अशा प्रकारे प्रस्ताव पाठवितांना सदर काम जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून घेणे जिल्हा परिषदेला निधी अभावी

देखभाल व दुरुस्तीवर स्थानिक स्वराज्य संस्थांना मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो व यासाठी जास्त प्रमाणात निधीची गरज भासते, जिल्हयातील पाणी पुरवठा योजनांची देखभाल व दुरुस्ती योग्य प्रकारे होण्यासाठी जिल्हास्तरावर अधिक निधी उपलब्ध व्हावा, याकरिता शासनाने संदर्भित अ.क्र.१४ अन्वये असा निर्णय घेतला आहे की, ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमातर्गत राज्य स्तरावर करण्यात येत असलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम योजनांतर्गत तरतूदीच्या १० टक्के निधी जिल्हास्तरीय देखभाल व दुरुस्ती निधीत दरवर्षी देण्यात यावा, सदर निर्णयाची अंमलबजावणी सन १९९६-९७ या आर्थिक वर्षापासुन करण्यात यावी. याशिवाय, संदर्भाधीन अ.क्र. (४) वरील निर्णयानुसार केंद्रशासन पुरस्कृत वर्धित वेग पाणी पुरवठा कार्यक्रमाखाली मंजुर करण्यात येत असलेल्या अनुदानाच्या १० टक्के रक्कम प्रतिवर्षी उक्त निधीसाठी शासन जिल्हा परिषदांना उपलब्ध करील, मात्र त्याकरिता जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे वर्धित वेग पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत उक्त निधीमध्ये जमा होणा-या रकमेचे लेखे स्वतंत्र ठेऊन त्यासंबंधीचे मागील वर्षाच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र शासनाकडे पाठविण्याकरिता आताच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडे दरवर्षी ३० एप्रिल पूर्वी सादर करतील.

(२) **जिल्हास्तरीय देखभाल व दुरुस्ती निधीत जिल्हा परिषदेने जमा करावयाची रक्कम :-** वर उल्लेखित जिल्हास्तरीय देखभाल व दुरुस्ती निधीमध्ये केंद्र शासन व राज्य शासनाकडून कांही प्रमाणात निधी दिला जातो व जिल्हा परिषदांनी त्यांच्या प्रतिवर्षीच्या उत्पन्नापैकी विशिष्ट बाबींवरील एकूण उत्पन्नाच्या किमान २० टक्के रक्कम सदर निधीत टाकणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. जिल्हयातील पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी जास्त प्रमाणात निधी उपलब्ध व्हावा याकरीता सदर २० टक्के रक्कम देखभाल व दुरुस्ती निधीत भरण्यासाठी जिल्हा परिषदेचे एकूण उत्पन्न काढताना, एकूण उत्पन्नात पिण्याच्या पाण्यावरील पाणी पट्टी व त्याअनुषंगाने वसूल केलेल्या रक्कमेचा अंतर्भाव करु नये पिण्याच्या पाण्यावरील पाणी पट्टी व त्या अनुषंगाने जमा होणारी रक्कम वगळून जो उर्वरित निधी असेल त्याच्या २० टक्के रक्कम जिल्हास्तरीय देखभाल व दुरुस्ती निधीत जमा करावी,त्याचप्रमाणे पिण्याच्या पाण्यासबधीतील पाणी पट्टी व त्या अनुषंगाने जमा होणारी संपुर्ण रक्कम व विंधन विहिरीच्या देखभाल व दुरुस्तीकरिता ग्रामपंचायतीकडून वसूल करण्यात येणारी वर्गणी ही संपूर्ण रक्कम जिल्हास्तरीय देखभाल व दुरुस्ती निधीत जमा करावी.

(३) जिल्हातील प्रादेशिक नळ योजनांच्या बाबतीत पाणी पट्टीची ८० टक्के रक्कम [illegible] परिषदेकडे व उर्वरीत २० टक्के रक्कम ग्राम पंचायतीकडे [illegible] स्वतंत्र [illegible] बाबतीत २० टक्के जिल्हापरिषदेकडे व ८० टक्के रक्कम ग्रामपंचायतीकडे [illegible] देखभाल व दुरुस्तीकरीता [illegible] संबंधीत निधीत [illegible] यावी. [illegible] योजनांच्या बाबतीत गावाला पाणी पुरवठा [illegible], गावास विहीत प्रमाणात पाणी पुरवठा केला जात आहे याची खात्री झाल्यानंतर, जिल्हा परिषदेने संबंधित ग्राम पंचायतीकडून [illegible] वार्षिक पाणीपट्टीच्या ८० टक्के रक्कम वसूल करावी. मात्र, मिटरनुसार गावास विहित प्रमाणापेक्षा कमी पाणी पुरवठा झाल्यास पाणीपटटीची रक्कम ही ग्राम पंचायतीकडून त्या प्रमाणात कमी घेण्यात यावी.

(४) योजनांच्या देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी :-

अ) प्रादेशिक योजनांच्या बाबतीत ही जबाबदारी पिण्याच्या पाण्याच्या उद्‌भवापासून ते पाणी वितरणाच्या टप्प्यापर्यंत जिल्हा परिषद किंवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची राहील,तर पाणी वितरणाच्या टप्प्यापासून ते गावांतर्गत पाणी पुरवठ्याची जबाबदारी संबधीत ग्राम पंचायतीची राहील.

ब) स्वतंत्र नळ योजनेच्या बाबतीत तसेच विंधण विहिरी व साध्या विहिरीच्या देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी संबधीत ग्रामपंचायतीची राहील.

(५) ग्राम पाणी पुरवठा कर्मचा-यांचे प्रशिक्षण :- गावातील योजनेची दुरुस्ती वेळीच व स्थानिकरित्या व्हावी यासाठी ग्राम पंचायतीनी त्यांचेकडील २ कर्मचा-यांना योजनेच्या देखभाल व दुरुस्तीचे प्रशिक्षण द्यावे.

(६) नियंत्रण :- जिल्हास्तरावरील देखभाल व दुरुस्ती निधीवर जिल्हा पाणी पुरवठा अधिका-याचे नियंत्रण राहील. जिल्ह्यातील सर्व पूर्ण झालेल्या पाणी पुरवठा योजनांची वक्तशीर व सुयोग्यरित्या देखभाल व्हावी, याबाबत जिल्हा पाणी पुरवठा समितिने दक्षता घ्यावी. यासाठी सर्व पूर्ण व कार्यान्वित झालेल्या पाणी पुरवठा योजनांबाबत समितीने आढावा घ्यावा व आवश्यकते नुसार त्यांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी सूचनावजा शिफारशी कराव्यात असाच आढावा कार्यकारी समितीने त्यांच्या बैठकीत दरमहा घ्यावा.

(७) सर्वेक्षण :- शासनाने जनतेला पिण्याचे पाणी योग्य प्रमाणात व शुध्द स्वरुपात मिळावे म्हणून गावोगावी निरनिराळया प्रकारच्या पाणी पुरवठा योजना पूर्ण केलेल्या आहेत. या योजनांची विशेषत्वाने नळ पाणी पुरवठा योजनांची नियमित पहाणी करुन वेळीच दुरुस्ती व देखभाल करण्यात येत नसल्यामुळे, सदर योजनांचा अपेक्षीत लाभ जनतेला मिळत नाही असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. सर्व पाणी पुरवठा योजना सक्षम व चालू स्थितीत राहाव्यात म्हणून त्यांची नियमितरित्या तपासणी करुन आवश्यकतेनुसार त्यांची वेळीच दुरुस्ती करणे आवश्यक आहे. याकरीता पुर्ण झालेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे सर्वेक्षण दरवर्षी ऑक्टोबर ते जानेवारी या कालावधीत करण्यात यावे व आवश्यकतेनुसार त्यांची वेळीच दुरुस्ती करण्याकरिता शासन परिपत्रक, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांक ग्रापापु-१०९३/सीआर-८३१/३९-अ, दिनांक ११ जानेवारी,१९९४ नुसार विहीत करण्यात आलेल्या कार्यपध्दतीचे सोबत जोडलेल्या विवरणपत्र (१) प्रमाणे सर्व संबधितांनी काटेकोर पालन करावे, तसेच उक्त सोबतच्या परिपत्रकासमवेत विहित केलेल्या विविध प्रपत्रांमध्ये तपासणी अहवालाची आवश्यक माहीती भरुन संबंधित यंत्रणेकडे/अधिका-यांकडे नियमितपणे सादर करावी.

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम -
साध्या विहिरी, विंधण विहिरी आणि नळ
योजना यांची देखभाल व दुरुस्ती

# महाराष्ट्र शासन
## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
निर्णय क्र.ग्रापापु-१०९८/प्र.क्र.२११/पापु-०७,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक : १४ डिसेंबर,१९९८.

संदर्भ - (१) शासन आदेश, ग्राम विकास विभाग, क्र.ग्रापापु-१०८५/सीआर-७८०३/३९, दिनांक १७ नोव्हेंबर,१९८६.
(२) शासन पत्र, ग्राम विकास विभाग, क्र.ग्रापापु-१०८५/सीआर-७८०३/३९, दिनांक १७ नोव्हेंबर,१९८६.
(३) शासन पत्र, ग्राम विकास विभाग, क्र.ग्रापापु-१०८९/सीआर-८९९९/३९, दिनांक ५ जानेवारी,१९८९.
(४) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग, क्र.ग्रापापु-१०८७/सीआर-८५२३/३९, दिनांक ३१ जानेवारी,१९८९.
(५) शासन पत्र, ग्राम विकास विभाग, क्र.ग्रापापु-१०८९/सीआर-२६/३९-अ, दिनांक २७ फेब्रुवारी,१९८९.
(६) शासन पत्र, ग्राम विकास विभाग, क्र.ग्रापापु-१०८९/सीआर-६१/३९-अ, दिनांक १२ फेब्रुवारी,१९९०.
(७) शासन पत्र, ग्राम विकास विभाग, क्र.ग्रापापु-१०९०/सीआर-६७/३९-अ, दिनांक ३ मार्च,१९९०.
(८) शासन पत्र, ग्राम विकास विभाग, क्र.ग्रापापु-१०९०/सीआर-५३०/३९-अ, दिनांक ५ फेब्रुवारी,१९९१.
(९) शासन पत्र, ग्राम विकास विभाग, क्र.ग्रापापु-१०९१/सीआर-४७२/३९-अ, दिनांक १६ एप्रिल,१९९१.
(१०) शासन पत्र, ग्राम विकास विभाग, क्र.ग्रापापु-१०९१/सीआर-२०२/३९-अ, दिनांक ३ मे,१९९१.
(११) शासन परिपत्रक, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र.ग्रापापु-१०९३/सीआर-८३१/३९-अ, दिनांक ११ जानेवारी १९९४.
(१२) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र.ग्रापापु-१०९३/सीआर-८१७/३९-अ, दिनांक २२ मार्च,१९९४.
(१३) शासन पत्र, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र.ग्रापापु-१०९४/सीआर-८९३/३९-अ, दिनांक ७ जुन,१९९४.
(१४) शासन परिपत्रक, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र.ग्रापापु-१०९२/सीआर-४४८/३९-अ, दिनांक १५ सप्टेंबर,१९९४.

(१५) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र.ग्रापापु-१०९३/ सीआर-४४८/३९-अ, दिनांक २७ सप्टेंबर,१९९४.

(१६) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र.ग्रापापु-१०९५/ सीआर-१०८२/३९-अ, दिनांक १ डिसेंबर,१९९५

(१७) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.ग्रापापु-१०९५/सीआर-१०९५/ ३९-अ, दिनांक २ जानेवारी,१९९६.

(१८) शासन परिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.ग्रापापु-१०९६/ सीआर-१२०७/पापु-०७, दिनांक २३ ऑगस्ट, १९९६.

(१९) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.ग्रापापु-१०९६/ सीआर-१२५६/पापु-०७, दिनांक ११ ऑक्टोबर,१९९६.

(२०) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.ग्रापापु-१०९६/ सीआर-१२८०/पापु-०७, दिनांक २८ नोव्हेंबर, १९९६.

(२१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.ग्रापापु-१०९८/ सीआर-१०६/पापु-०७, दिनांक २४ ऑगस्ट, १९९८.

**प्रस्तावना :-**

संदर्भाधीन अ.क्र.(१) वरिल आदेशानुसार, जिल्हा पातळीवर, ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या विविध पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी निधी आस्थापित करण्याचे आदेश काढण्यात आले होते. या निधीत जिल्हा परिषदेच्या प्रतिवर्षीच्या उत्पन्नापैकी विशिष्ठ बाबींवरील एकूण उत्पन्नाच्या किमान २० टक्के रक्कम आणि सदर निधीसाठी शासन प्रतिवर्षी मंजुर करील ती रक्कम भरावयाचेहि आदेशित करण्यात आले आहे. पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी उक्त निधीतून द्यावयाच्या सहाय्याबाबत जिल्हा परिषदांनी परिस्थितीनुरुप नियम तयार करावेत, अशा सूचना संदर्भाधिन अ.क्र.(२) वरील पत्रानुसार देण्यात आले आहेत. तदनंतरच्या कालावधीत पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी अधिक निधी उपलब्ध व्हावा व या निधीवर सर्वतोपरी ताण पडू नये म्हणून पाणी पट्टीची वसुली मोठ्या प्रमाणावर व्हावी यासाठी वेळोवेळी सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तसेच योजनांची देखभाल व दुरुस्ती योग्य प्रकारे व परिणामकारकरित्या व्हावी यासाठी अनेक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. कार्यान्वयन यंत्रणांच्या सोयीसाठी विषयाधीन स सूचना एकत्रित करणे, शासनाच्या विचाराधीन होते.

**निर्णय -** संदर्भाधीन सर्व सूचना अधिक्रमित करुन हे एकत्रित आदेश काढण्यात येत आहे.

(१) जिल्हास्तरीय देखभाल व दुरुस्ती निधीत राज्य शासनाकडून देण्यात येणा-या अनुदानात वाढ :-

जिल्ह्यातील नळ योजना, विंधण विहिरी व साध्या विहिरी या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची, देखभाल व दुरुस्ती योग्य प्रकारे व वेळीच होण्यासाठी हातभार लागावा म्हणून प्रत्येक जिल्हास्तरावर देखभाल व दुरुस्ती निधी स्थापन करण्यात आला आहे, सदर निधीमध्ये राज्य शासनाकडुन ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या राज्य तरतुदीच्या ५ टक्के निधी दरवर्षी देण्यात येत होता, राज्यातील योजनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली असून योजनांच्या

(०६०

**ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम**
**विंधण विहिरींव्दारे पिण्यासाठी**
**पाणी पुरवठा करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन,**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**शासन निर्णय क्र.भूजल-१०९८/प्र.क्र. ५११/पापु-१५,**
**मंत्रालय, मुंबई :- ४०० ०३२.**
**दिनांक :- १६ डिसेंबर,१९९८.**

**प्रस्तावना :-**

(१) शासन परिपत्रक, ग्राम विकास विभाग, क्र.ग्रापापु.१०८४/सीआर-५९६५/३९, दि.७ मे,१९८४.
(२) शासन परिपत्रक, ग्राम विकास विभाग, क्रमांक भूजल १०८५/१३०५/(६०३)/४३, दिनांक ९ जुलै,१९८५.
(३) शासन निर्णय ,ग्राम विकास विभाग क्र.एनआरई-१०८५/सीआर-४४३/५२, दिनांक २२ ऑगस्ट,१९८५.
(४) शासन पत्र , ग्राम विकास विभाग, क्रमांक भूजल १०८६/सीआर-९८२/४३, दिनांक ३ फेब्रुवारी,१९८६.
(५) शासन निर्णय ,ग्राम विकास विभाग क्र.भूजल-१०८६/सीआर-१३८७/४३, दिनांक २० नोव्हेंबर,१९८६.
(६) शासन निर्णय ,ग्राम विकास विभाग क्र.भूजल-१०८६/सीआर-१३८७/४३, दिनांक २४ डिसेंबर,१९८६.
(७) शासन निर्णय ,ग्राम विकास विभाग क्र भूजल -१०८६/सीआर-१३८७/४३, दिनांक ३१ डिसेंबर,१९८६.
(८) शासन पत्र ,ग्राम विकास विभाग क्र.भूजल-१०८६/सीआर-१४५४/४३, दिनांक ३० जानेवारी,१९८७.
(९) शासन निर्णय ,ग्राम विकास विभाग क्र.भूजल-१०८९/सीआर-२६८५/४३, दिनांक २ जानेवारी,१९९०.
(१०)शासन निर्णय ,ग्राम विकास विभाग क्र.भूजल-१०९०/सीआर-२६८५/४३, दिनांक १८ मे,१९९०.
(११)शासन निर्णय ,ग्राम विकास व जल संधारण विभाग क्र.भूजल-१०९५/प्र.क्र.-२०३/४३, दिनांक १ डिसेंबर,१९९५.
(१२)भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांचे पत्र क्र.एस-१/भू.स.वि.यं/ग्रापापु/२८/१९९६ दिनांक २६ नोव्हेंबर,१९९६ चे पत्र.

**निर्णय :-**

प्रस्तावनेत नमूद केलेले सर्व आदेश अधिक्रमित करुन, विंधण विहिरी कार्यक्रम राबविण्यासाठी लोकसंख्या,अंतर, विंधण विहीर घेण्याच्या जागा व तदनुषंगिक अन्य सूचना, या निर्णयाच्या दिनांकापासून एकत्रितपणे खाली निर्देशिल्याप्रमाणे रहातील असे आदेश शासन देत आहे.

(१) गावठाणात २०० लोकवस्तीमागे एक या प्रमाणात विंधण विहिरी घेण्यात याव्यात.एखाद्या गावठाणात विंधण विहीर घेणे तांत्रिकदृष्ट्या शक्य नसल्यास गावठाणापासून १ किलोमीटरच्या परिसरात विंधण विहीर घेणे तांत्रिकदृष्ट्या शक्य आहे किंवा नाही याची तपासणी करावी. तांत्रिकदृष्ट्या गावठाणाच्या १ किलोमीटरच्या परिसरात विंधण विहीर घेणे शक्य असल्यास, विंधण विहीर घेण्यात यावी. सदर विंधण विहिर उच्च क्षमतेची असल्यास, त्यावर विद्युतपंप बसवुन,पाईपलाईनव्दारे गावात पाणी आणून, सार्वजनिक नळाव्दारे पाणी पुरवठा करण्यात यावा. विद्युत पंप बसविणे, पाईप लाईन टाकणे व सार्वजनिक नळाव्दारे पाणी पुरवठा करण्यासाठी व्यवस्था करण्याबाबतची कार्यवाही जिल्हा परिषदने करावी.

(२) विंधण विहिरी घेण्यासाठी सर्वसाधारणपणे गावाच्या लोकसंख्येचा विचार करण्यात येतो.तथापि गावालगतच्या माध्यमिक शाळा,महाविद्यालये अशा सारख्या ठिकाणी विद्यार्थी व कर्मचारीवृंदास पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध नसेल तर तेथेही एक विंधण विहिर घेण्यात यावी. त्याचप्रमाणे, ज्या सेवाभावी संस्थातर्फे कुष्ठरोगी,अपंग किंवा अन्य सेवा योग्य व्यक्तींना मदत करणे अथवा त्यांचे जीवन विकसित होण्यासाठी परिश्रम करणे अशा प्रकारची कामे केली जातात, अशा सेवाभावी संस्थांच्या परिसरात पिण्यायोग्य पुरेसे पाणी उपलब्ध नसल्यास, विंधण विहिर घेण्याबाबत शासनाने विहित केलेले निकष शिथिल करुन, खास बाब म्हणून, विंधण विहिर खोदण्यास शासनाची अनुमती आहे.

(३) गावठाणाखालील वाडया/वस्त्या/पाडे/तांडे/टोल्यावर खाली निर्देशिलेल्या अटींची पूर्तता होत असल्यास विंधण विहिरी घेण्यात याव्यात.

(अ) संबंधित वाडी/वस्ती/पाडा/तांडा टोल्याची लोकसंख्या किमान ५० असली पाहिजे.

(आ) संबंधित वाडी/वस्ती/पाडा/तांडा टोल्यापासून ०.५ कि.मी. परिसरात पिण्याच्या पाण्याचा उद्भव अस्तित्वात असता कामा नये.

(इ) संबंधित वाडी/वस्ती/पांडा/ तांडा/टोला कायमस्वरूपी असावा व त्याचा निर्देश १९९१ च्या जनगणनेत केलेला असावा .जणगणना पुस्तिकेत तसा उल्लेख नसल्यास, सदर वाडी/वस्ती/पांडा/तांडा/टोला कायमस्वरुपी आंहे अथवा तो जणगणनेनंतर कायमस्वरुपी म्हणून अस्तित्वात आला आहे असे प्रमाणपत्र जिल्हाधिका-यांनी देणे आवश्यक आहे.

(ई) मोठया खातेदारांच्या खाजगी वस्त्यांसाठी विंधण विहीर घेण्यात येऊ नये.

(४) सर्वसाधारणपणे पिण्याच्या पाण्याकरिता विंधण विहिरी या ६० मिटर पर्यंत खोल असाव्यात. ६० मिटरपेक्षा जास्त खोलीची विंधण विहिर ध्यावयाची झाल्यास याबाबत जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक यांनी स्वतः तांत्रिक निकष तपासून व प्रत्यक्ष क्षेत्रिय अभ्यासावरुन निश्चित करुन अधिक खोलीची विंधण विहिर आवश्यक असल्याचे सुचवून प्रस्ताव उपसंचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेकडे पाठवावा व उपसंचालकांची मान्यता घेऊनच अशा विंधण विहिरी घेण्यात याव्यात.

(५) ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत पिण्याच्या पाणी पुरवण्यासाठी घेण्यात आलेल्या विंधण विहिरींपैकी ज्या विंधण विहिरी दगडमाती ढासळून, झाडांची मुळे अथाव पाने कुजून, पाईपलाईन जास्त पडल्यामुळे अथवा अन्य कोणत्याही कारणांमुळे नादुरुस्त होतील व परिणामी त्यांचे पाणी पिण्यासाठी वापरण्यास उपलब्ध होणार नाही, अशा विंधण विहिंरींच्या बदली नवीन विंधण विहिर घेण्यास शासनाची हरकत नाही. मात्र, उक्त कारणांमुळे बंद झालेल्या विंधण विहिरींची जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिकांकडून तपासणी करुन घ्यावी व सदर विंधण विहिरीचे पुनरुज्जीवन करणे शक्य नाही असे त्यांनी प्रमाणित केल्यावर नादुरुस्त विंधण विहिरीऐवजी नवीन विंधण विहिर घेण्यात यावी.

२. विंधण विहिर घेतल्यावर, ती घेतल्याचा दिनांक, खोली, ताशी क्षमता, हातपंप बसविण्याचा दिनांक, विंधण विहिरीचा गावातील क्रमांक, विंधण विहिर खाजगी कंत्राटदाराने घेतली असल्यास त्याचे नांव व पत्ता इत्यादि तपशील विंधण विहीरींजवळ निर्देशिण्यात यावा.

३. विंधण विहिरींवर बसविलेल्या हातपंपाकरिता बांधावयाच्या प्लॅटफॉर्मची कामे राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रमाखाली घेण्यात यावीत. ही कामे सुचविणे मंजूर करणे, त्यासाठी निधी आणि त्यांची अंमलबजावणी याकरीता ग्रामपंचायत क्षेत्रातील इतर प्रकारच्या कामासाठी जी कार्यपध्दती विहीत केली आहे तीच कार्यपध्दती लागू राहील. विंधणविहिरीवर बसविलेल्या हातपंपाकरीता बांधण्यात यावयाच्या प्लॅटफॉर्मसंबंधी मार्गदर्शक सुचना सोबतच्या प्रपत्रात दिल्या आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**(रु.न.देशमुख)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**